# पद भाग क्र.७

१७ :– सत की मेहेमा को अंग
१८ :– माया का बारला पर्चा विषयी अंग
१९ :– महाराज को पराक्रम को अंग
२० :– गुरा का बधावणा करनेको अंग
२१ :– संता की महिमा को अंग
२२ :– संत परीक्षा को अंग
२३ :– नांव की महिमा को अंग
२४ :– भक्ति मे बाधा देनेवाला को अंग
२५ :– जरणा को अंग
२६ :– मन जीता का लक्षण को अंग
२७ :– ब्रम्हज्ञानी की परीक्षा को अंग
२८ :– धिंन धिंनता को अंग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांड्क यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समझन्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

| अ.नं. | पद | पेज नं. |
|---|---|---|
| | पद भाग क्र.७ | |
| | १७ :– सत की मेहेमा को अंग | |
| | १८ :– माया का बारला पर्चा विषयी अंग | |
| | १९ :– महाराज को पराक्रम को अंग | |
| | २० :– गुरा का बधावणा करनेको अंग | |
| | २१ :– संता की महिमा को अंग | |
| | २२ :– संत परीक्षा को अंग | |
| | २३ :– नांव की महिमा को अंग | |
| | २४ :– भक्ति मे बाधा देनेवाला को अंग | |
| | २५ :– जरणा को अंग | |
| | २६ :– मन जीता का लक्षण को अंग | |
| | २७ :– ब्रम्हज्ञानी की परीक्षा को अंग | |
| | २८ :– धिंन धिंनता को अंग | |
| | १७ :– सत की मेहेमा को अंग | |
| १ | बांदा ओ भेद या नही पायो ५२ | १ |
| २ | दिया म्हे हेला सुणो सकळ ११३ | ४ |
| ३ | ग्यानी सब ही सांभळो रे १३८ | ६ |
| ४ | सत्त की बात न मेलो ३८० | ८ |
| | १८ :– माया का बारला पर्चा विषयी अंग | |
| १ | बांदा जुक्त मुक्त परचा सो माया ४० | १३ |
| २ | बांदा केवल को घर न्यारो ४३ | १४ |
| ३ | भाई भेदी हुवे सोई जाणे ७८ | २० |
| ४ | सुण ग्यानी बचन हमारा ३८२ | २२ |
| | १९ :– महाराज को पराक्रम को अंग | |

| | | |
|---|---|---|
| १ | बांदा मोमे ओ गुण आयो ४७ | २३ |
| २ | बांदा ओ नर मोहे न जाणे जी ५५ | २५ |
| ३ | बांदा ओर सकळ पिस्तासी ५७ | २७ |
| ४ | पांडे मै च्यार बरण सुं न्यारा २६३ | ३१ |
| | २० :– गुरा का बधावणा करनेको अंग | |
| १ | गुरू महिमा यूं किजे हो १३३ | ३२ |
| २ | म्हारे पावणा परम गुरु आज २४१ | ३४ |
| | २१ :– संता की महिमा को अंग | |
| १ | धिन्न गुरु ग्यान जो साध ईण जुग मे १०८ | ३५ |
| २ | दोय बिधि संत पिछाणे रे ११४ | ३६ |
| ३ | गलथान मता कब आवेगा १२४ | ३७ |
| ४ | जन सा ठग न कोई हो १६६ | ३८ |
| ५ | समझ समझ हंसा सनमुख रेणा ३२५ | ४२ |
| ६ | सुर जाणे लो सुर जाणे लो ३९४ | ४४ |
| ७ | उन सुरत की बलिहारी हो ४०९ | ४५ |
| ८ | वारी वारी आया हे हंसाँ काज ४१८ | ४६ |
| | २२ :– संत परीक्षा को अंग | |
| १ | हरिजन क्हो किम जाणिये हो १५० | ४६ |
| २ | हरिजन सो इम जाणिये हो १४६ | ४७ |
| ३ | समरथ साहेब नित भजो अे हेली ३२८ | ४८ |
| | २३ :– नांव की महिमा को अंग | |
| १ | अेक घडी आधी घडी ११९ | ४९ |
| २ | कहे गीता हो सुण बेद च्यार १९० | ५२ |
| ३ | मन भजिये हो नित राम नाम २१८ | ५३ |
| ४ | तो भी नही हो इण नांव सम ३९९ | ५३ |

२४ :– भक्ति मे बाधा देनेवाला को अंग

| | | |
|---|---|---|
| १ | हांती हे झुटो हे झुटो १५२ | ५४ |
| २ | जुग बडाई छाड १८२ | ५६ |
| ३ | किस बिध मिलीये हो राम सूं २०३ | ५६ |
| ४ | माधोजी भक्त कोण बिध धारुं २११ | ५८ |
| १५ | नाव न केवळ कोय २५० | ५९ |

२५ :– जरणा को अंग

| | | |
|---|---|---|
| १ | साधो भाई मै तो शीश ऊकरडी कीया ३१४ | ६० |

२६ :– मन जीता का लक्षण को अंग

| | | |
|---|---|---|
| १ | असे क्हे जुग दाय न आवे २० | ६१ |
| २ | वे जन जीता तां कूं मारी ४१३ | ६२ |
| ३ | या पारख बिन भ्रम न तुटो ४२४ | ६३ |

२७ :– ब्रम्हज्ञानी की परीक्षा को अंग

२८ :– धिंन धिंनता को अंग

| | | |
|---|---|---|
| १ | धिन धिन हो धिन राम नाम १०२ | ६५ |
| २ | धिन धिन सो नर नारी जुग मे १०५ | ६६ |
| ३ | धिन सोई हो धिन सोई १०६ | ६७ |
| ४ | धिन धिन सो नर जाणी ये हो १०७ | ६८ |
| ५ | साधो भाई धिन जिण चोळा किया ३१२ | ६९ |

५२

।। पदराग आसा ।।

बांदा ओ भेद यां नही पायो

ब्रम्हा बिस्न महेसर सक्ती ।। नही अवतारा रे आयो ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हरजी भाटीस सांगतात की,अरे बांदा आनंदब्रम्हास पोहचण्याचा भेद ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती तसेच अवतारांनी ही प्राप्त केला नाही.तर त्यांच्या मायावी ज्ञानाच्या सत्तेने म्हणवलेले सतगुरुच्याजवळ हा भेद कसा असेल? ।।टेर।।

सतगुरू बिना कळा ज्यां जागी ।। से जन एसा भाई ।।

अनंत जीव ले उधरे जग मे ।। आड पटक नही काई ।।१।।

असे ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्तीचे भेद दाखवणारे सतगुरुच्या सत्ते शिवाय ज्या सतगुरु मध्ये आनंदब्रम्हची कुद्रतकला जागृत झाली असे सतगुरु अनंत जीवांना होणकाळाच्या जगातून उध्दार करतात जेंव्हा की असे ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्तीचे सत्तेचे अधिकारी सतगुरु एक ही जीवाचा उध्दार करु शकत नाही.असे आनंदब्रम्हचे सत्ताधारी पारब्रम्ह, इच्छामाया तसेच या दोंघापासून उपजलेले ब्रम्हा,विष्णू,महादेव तसेच शक्ती हे कोणी ही आड़पटक म्हणजे अड्थळे उभे करत नाही. ।।१।।

अणंद ब्रम्ह की छायाँ कहिये ।। ज्यां आ सता कहावे ।।

हे अनाद आद सुंई आगे ।। अटळ कोई जन पावे ।।२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जसे हुमायु पक्ष्याच्या छायेत जीव येताच रंकचा राजा होऊन जातो.असेच आनंदबम्हच्या सत्तेच्या छायेमध्ये म्हणजे सतगुरुच्या शरणात येताच हंसाचा होणकाळापासून उध्दार होऊन जातो.हे महासुखाचे पद अनाद आद म्हणजे होणकाळ पारब्रम्हच्या ही पुढे आहे असे अटळपद कोणी विरळा संतच प्राप्त करतो.।।२।।

सुण चोवीस तिथंकर आया ।। ज्याँ रे गुरू कुण होई ।।

ज्यां संग अनंत मिल्या केवळ मे ।। कसर रही नही कोई ।।३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदास सांगतात की,२४ तीर्थंकरांचा ब्रम्हा,विष्णू, महादेव,शक्ती यांचे मायावी सत्ता प्रगट केलेला असा कोणी ही सतगुरु नव्हता.या तीर्थंकरात प्रगट झालेल्या सत्तेच्या आधाराने अनंत जीव होणकाळाच्या दुःखातून निघून नेहमी करीता केवळच्या महासुखात मिळून गेले.ज्यांच्या मिळण्यात जराही कसर राहीली नाही.।।३।।

हुणकाळ लग सबे ऊपायाँ ।। गुरू सिष चलीया आवे ।।

करणी करे जिसा फळ जग मे ।। हंस इधक किम पावे ।।४।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती यांच्या सत्तेचे गुरु करुन शिष्य बनने असे गुरु शिष्य बनण्याचे सर्व उपाय होणकाळापर्यंतच्या पोहचचे आहे.जसे मायावी सतगुरुच्याजवळ करणी राहील. तसे हंस होणकाळात मायेचे फळ प्राप्त करेल.अश्या सतगुरुच्या शरणात आलेल्या हंसाला काळाच्या पुढचे महासुखांचे फळ कधी मिळणार नाही.।।४।।

**सब ही ग्यान बिध्या सब साची ।। होणकाळ लग भाई ।।**
**मोख मिले ज्याँ सता प्रगटी ।। और उपायन काई ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदास सांगतात की,होणकाळापर्यंत पोहचविणारे सर्व ज्ञान तसेच विध्या असत्य नाहीत,सत्य आहे.परंतु होणकाळाच्या पुढचा परममोक्ष प्राप्त करण्याकरीता आनंदब्रम्हच्या सत्ते शिवाय सर्व मायावी सतगुरुचे उपाय खोटे आहे. ।।५।।

**ओर बस्ताँ का बीज जक्त मे ।। कर ऊपाय जगावे ।।**
**मिण के बीज नही पारस के ।। ना कीया बण आवे ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदास सांगतात की,जगात अनेक वस्तु आहेत तसेच त्या वस्तु संपल्या नंतर ही त्या वस्तुचे बीज जगात राहते.परंतु जगात चिंतामणी तसेच पारसचे बीज,चिंतामणी तसेच पारस मिटल्यानंतर राहत नाही.कोणी कृत्रिम रीतीने बनविण्याचा प्रयत्न केला तरीही चिंतामणी किंवा पारस बनत नाही.याचप्रमाणे मायावी गुरु जगातून शरीर सोडल्या नंतर त्यांची रिध्दी सिध्दीची विधी प्रगट करण्याचे अनेक उपाय असतात परंतु कुद्रतकलेचे सतगुरु या जगातून निर्वाण झाल्यावर ती कुद्रतकला प्रगट करण्याचे जगात काही उपाय राहत नाही.।।६।।

**म्हेमा करी बतायो सब ने ।। सिंभु बचन मे भाई ।।**
**आ ज्हाँ हाँ सत्ता प्रगटी ।। क्रणी रहे न काई ।।७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदास सांगतात की,शंकराने आनंदब्रम्हचे सत्ताधारी सतगुरुची खुप महीमा केली तसेच सतज्ञानाच्या न्यायाने जगाला समजून सांगितले की,आनंदब्रम्हची महासत्तेचे परचे संतात प्रगट होण्याच्या पश्चात अश्या संतांमध्ये काळाच्या मुखात राहणारे माया ब्रम्हचे रिध्दी सिध्दींचे परचे चमत्कारांना प्रगट होण्या करीता कोठे जागा राहील?।।७।।

**आ पारख कर देखो जग मे ।। जिण आ कुद्रत पाई ।।**
**आप रहया ज्हाँ लग हंस तीरिया ।। पाछे एक न भाई ।।८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदास तसेच जगातील ज्ञानी,ध्यानींना सांगत आहेत की,तुम्हीच पारखून बघा की जो पर्यंत कुद्रतकला प्राप्त केलेले संत जगात राहतील.तो पर्यंतच भवसागराच्या महादु:खातून हंस तरेल.अश्या संताच्या मोक्ष जाण्याच्या पश्चात

(मागावून)एक ही हंस संत तिरला नाही.।।८।।

**और ग्यान म्हे लारे सुणियो ।। बीज सकळ मे रेहे ।।**
**करणी करर फेर जगावे ।। सिध कळा कोई लेहे ।।९।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदास सांगतात की,त्रिगुणीमायेचे सतगुरु धामात आल्यानंतर जी सिध्दकला,धामात आलेल्या सिध्द सतगुरुच्याजवळ होती ती सिध्दकला त्या संतांनी जसे मायावी करण्यांची साधना केली.त्याच क्रिया करण्याच्या साधनेनंतर तितकीच कलेची सिध्दाई नवे सिध्द संतात प्रगट होऊन जाते.म्हणजेच सिध्दधाम जाण्याच्या नंतरही सिध्दचे बीज जगात राहते असे मी ज्ञानीच्या मुखातून ज्ञान ऐकले. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जसे सिध्दाच्या धामात जाण्याच्या मागून ही साधकांमध्ये सिध्दकला प्रगट होऊन जाते.तसे आनंदब्रम्हचे सत्ताधारी संत अमरधाम जाण्याच्या पश्चात(मागावून)मागच्या हसांमध्ये किती ही प्रयत्न केले तरीही एक ही जीवात कुद्रतकलेची सत्ता प्रगट होत नाही. ।।९।।

**इण तो सता माँय गुण ओई ।। ज्यूं पारस मे होई ।।**
**मिलीया लोहो कनक सब होवे ।। आगे व्हे न कोई ।।१०।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हरजी भाटीस सांगतात की,जसे पारसचे लोखंडाला भेटल्याने लोखंडाचे सोने होऊन जाते आणि पुढे ते पारस मिटून गेल्यावर लोखंडाचे सोने होऊ शकत नाही.या प्रकारचा जो गुण पारसमध्ये असतो तसाच गुण कुद्रतकलेचे सत्ताधारी संतात राहतो.असे कुद्रतकलेचे सतगुरु धामास आल्यावर पुढे एक ही आनंद पदाचा संत उपजत नाही. ।।१०।।

**राज जोग कहीये ओ जग मे ।। और केण सब होई ।।**
**माडाँ उलट चड़े गढ ऊपर ।। अटक्यो रे नही कोई ।।११।।**

असे आनंदब्रम्हात पोहचविणाऱ्या कुद्रतला राजयोग म्हणतात.या कुद्रतला सोडून अन्य सर्व योगांना राजयोग म्हटले तरी ही ते म्हणण्याचे राजयोग आहे.अश्या म्हणण्याच्या राजयोगाने होणकाळातून मुक्त करणारी आनंदब्रम्हची सत्ता प्रगट होत नाही.असली राजयोग प्रगट झाल्याने हंसाचा घट ३ लोक १४ भवन बनतो आणि हंस राजयोगाच्या वंशमध्ये होऊन दहाव्याद्वारात न जाण्याची मन आणि ५ आत्म्याच्या चाहनेला न जुमानता बंकनाळच्या रस्त्याने मनाला त्याच्या चाहने शिवाय,जबरदस्तीने उलटवून हंस त्रिगुटीवर गडावर चढून जातो.हा हंस आजपर्यंत मन आणि ५ आत्मांच्या वंश राहून आनंदब्रम्हात जाण्यास अटकून राहीला होता.तो हंस राजयोगाची सत्ता प्रगट झाल्याने या मन आणि ५ आत्मांनी अटकविला जात नाही. ।।११।।

**तत्त चीन कर थिर नर हूवा ।। राज जोग ओ नाई ।।**

आंतो नकल असल वो कहीये ।। उलट अगम घर जाई ।।१२।।

काही ब्रम्हज्ञानी होणकाळ पारब्रम्हची तत्तची सत्ता प्रगट करुन गर्भात येण्याच्या चक्रातून काही वेळे करीता सुटून स्थिर होऊन जातात आणि असे ब्रम्हज्ञानी स्वत:मध्ये राजयोग प्राप्त झाला असे समजतात.जसे आनंदब्रम्हच्या राजयोगात हंस नेहमीकरीता गर्भात येण्यापासून मुक्त होऊन स्थिर होऊन जातो.तसेच पारब्रम्ह तत्त मिळविणारे ही काही वेळेकरीता स्थिर होतात परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदा आणि ज्ञानींना सांगतात की,हे पारब्रम्हचे संत पारब्रम्हच्या पलिकडे उलटून अगम घरी कधी जात नाही. म्हणून पारब्रम्ह तत्त चिनकर स्थिर होणारा योग हा अस्सल राजयोग नाही.हा योग अस्सल राजयोगाची नक्कल आहे. ।।१२।।

के सुखराम सुणो सब ग्यानी ।। इण बिध समझो आई ।।

जप तप ग्यान बताई कूंच्याँ ।। ज्याँ हां आ सता न पाई ।।१३।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानींना सांगतात की,सर्व ज्ञानी,ध्यानी अस्सल राजयोग आणि नक्कल राजयोगाचा फरक अगमघरी जाण्याच्या विधीने समजा.जो राजयोग अगम घरी पोहचवितो तोच अस्सल राजयोग आहे.तसेच जो राजयोग अगम घरी पोहचवत नाही तो नक्कल राजयोग आहे असे समजणे.ज्या सतगुरुने अस्सल राजयोगाची तर सत्ता सोडून दया नक्कल राजयोग पण मिळविला नाही.असे ब्रम्हा, विष्णू,महादेव,शक्तीच्या सत्तेचे सतगुरु जप,तप,वेदाच्या करण्या तसेच योगाभ्यासाच्या कुंचीने ज्ञान दाखवितात.जर या सतगुरुंजवळ महासुखाची आनंदब्रम्हची सत्ता असती तर जगाला हे सतगुरु जप,तप,भृगुटीचा योग किंवा रिध्दी सिध्दी प्रगट करणारी मायावी विध्या का दाखविल्या असत्या?याचा सर्व ज्ञानी,ध्यानी तसेच बांदा तू सत्तज्ञानाच्या विधीने निर्णय करुन समज.।।१३।।

११३

।। पदराग मिश्रित ।।

दिया म्हे हेला ।।

सुणो सकळ नर नार ।। दिया म्हे हेला ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मी आवाज देऊन राहिलो आहे,त्याला सर्व स्त्री पुरुषांनी ऐका. ।।टेर।।

सूरा तन जब प्रगटे रे ।। सिंधू दिरावे कोय ।।

युं जन गढ चड बोलीयारे ।। नांव ऊदे घट होय ।।१।।

जसे सिंधु राग ऐकल्यावर,शुरवीरात शुरत्व उत्पन्न होते,(तसेच मी पण आवाज देऊन राहिलो आहे)असेच(कोणी जन(संत)गढावर चढून बोलले,तर(त्यांच्याने शिष्याच्या)

घटात नाव उदीत होईल,जसे सिंधु राग ऐकल्याने शुरत्व उत्पन्न होते.तसेच जे संत गढावर चढून बोलतात,त्यांच्या दिले गेलेल्या ज्ञानाने,शिष्यात शुरत्व उत्पन्न होऊन, शिष्याच्या घटात नावाचा उदय होतो. ।।१।।

**पीव आज अब बीछडे. रे ।। जा सत्त आवे जाण ।।**
**जुग आड़ा दिन ब्हो पड़्याँ रे ।। ज्यां मुख सरम न काण ।।२।।**

जसे सती स्त्रीचा पती,जेंव्हा मरतो,तेंव्हा तीच्यात(सतीत)सत येते आणि जिच्या पतीचा मरना नंतर संसारात आडवे दिवस खुप होऊन गेले,त्या स्त्रीच्या मुखावर लाज किंवा मान मर्यादाही राहत नाही,तसेच सतगुरु मिळताच शिष्यात नाव प्रगट झाले नाही आणि मध्येच दिवस व्यतीत होऊन गेले तर त्या शिष्यात गुरुची लाज वा गुरुची मर्यादाही राहत नाही. ।।२।।

**जिनका सतगुरू सूरवाँ रे ।। ऊलट चड्या अकास मान ।।**
**वां सिष के तन जागसी ।। बंदा नांव कळा घट आण ।।३।।**

ज्यांचे सतगुरु शुरवीर आहे(आणि ज्यांचे सतगुरु)उलटून आकाशात(ब्रम्हंडात)चढून गेले आहे,त्यांच्याही शिष्याच्या शरीरात,नावाची कळा जागृत होईल,(ज्यांच्या गुरुमध्ये नाव कळा प्रगट झाली नाही,त्याच्या शिष्यातही नाव कळा,कोठून जागेल.जी वस्तु गुरुच्या जवळ  नाही,ते शिष्याला कोठून मिळेल.)।।३।।

**संत गिगन चड़ बोलीया रे ।। वे तो गया हे सीधाय ।।**
**पीव मुवाँ दिन बोहो  हुवा ।। बंदा सत्त आवे किम माय ।।४।।**

आणि जे संत गगनात चढून बोलले होते,ते संत तर मोक्षास चालले गेले,(आता नंतर स्त्रीचा)पतीला मेल्यानंतर खूप दिवस झाले.(त्या स्त्रीमध्ये,आता नंतर)सत्त कसे येईल? असेच पोहोचलेले संत होते,ते मोक्षाला चालले गेले,त्यांच्या नंतर,त्यांच्या पंथाच्या शिष्यात हे नाव जागृत होणार नाही. ।।४।।

**के सुखदेव ओ भेद हे रे ।। जे समझे नर कोय ।।**
**नांव तबे घट प्रगटे रे ।। वे जन सदेह  होय ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,याचा भेद हा आहे,जे कोणी मनुष्य समजत असतील,तर शिष्याच्या घटात नाव तर तेंव्हाच प्रगट होईल,जेंव्हा(ते पोहोचलेले) जन(संत)येथे सदेह(देहाच्या सोबत)उपस्थित आहे,(तेंव्हा शिष्याचा घटात नाव प्रगट होईल,ते संत मोक्षाला चालले गेल्यावर हे नाव प्रगट होणार नाही.जसे पारस जोपर्यंत अस्तिवात होते तोपर्यंत त्या पारसाने स्पर्श होणाऱ्या लोखंडाचे सोने होऊन गेले,पारस न राहील्याने,त्या पारसाचा स्पर्शाने बनले त्या सोन्यापासून,पुन्हा नंतर लोखंडापासून सोने होत नाही.जसे ज्या स्त्रीचा पती मेला,त्याच दिवशी त्याची पत्नी सती होवून

गेली,नंतर होत नाही,तसेच जे पोहोचलेले संत आहे,त्यांच्या हयातीतच कोणी त्यांचा शिष्य बनून मिळाला,तर त्यांचा उद्धार होईल,नंतर होत नाही,याचा विषयी अगाधबोध ग्रंथात आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्पष्टीकरण केले आहे.।।५।।

१३८

।। पदराग धनाश्री ।।

**ग्यानी सब ही सांभळो रे**

**ग्यानी सब ही सांभळो रे ।। दिया म्हे हेला आय ।।**
**यॉंकी कळ किमत नही रे काय ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जगातील सर्व ज्ञानी ऐका,मी तुम्हाला जे जोर देऊन सांगु इच्छीतो ते समजा.शुर पुरुषात शुरवीरता,सतीमध्ये सत तसेच संतात सतशब्द प्रगट होण्याची कला म्हणजे हिकमत मायेच्या क्रिया करणींमध्ये नाही.।।टेर।।

**सूराँ के सिर गुरू नही रे ।। नही सतीयाँ के होय ।।**
**यांका तो सतगुरू सत्त ही रे ।। दूजो गुरू नही कोय ।।१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,शुरवीरच्या तसेच सतीच्या शिरावर जसे जगाचे वेद,भेद,लबेद इ.ज्ञानींच्या शिष्यांवर क्रिया करणीचे गुरु राहतात तसे क्रिया करणीचे बाहेरचे गुरु नसतात.यांचे सतगुरु यांच्या हंसाच्या घटातच सतच्या रुपात राहतात ।।१।।

**ओर सकळ जहान मेरे ।। कह्याँ करे सब काम ।।**
**युं क्रणी कर राम ने ।। प्रसे नही निजधाम ।।२।।**

जसे संसाराचे लोक करणी क्रिया शिकविल्यास शिकून जातात आणि त्या करण्यांचे गुण त्या साधकांमध्ये प्रगट होऊन जाते.तसे सती स्त्री मध्ये आणि वीरपुरुषात करणीया (करण्या)शिकविल्या सत प्रगट होत नाही.जसे करणीया(करण्या)शिकविल्याने सती स्त्री आणि वीर पुरुषात सत प्रगट होत नाही ठिक त्याप्रकारे संतामध्ये सतशब्द म्हणजे राम करण्या केल्याने प्रगट होत नाही.याप्रकारे संत करणी केल्याने निजधाम म्हणजे महासुखाचे धाम प्राप्त करु शकत नाही.।।२।।

**सूर फिरे बाजार मे रे ।। सतीयाँ घराँ मे होय ।।**
**मोसर बिध बिन बाहेरो रे ।। यां ने सत्त नहि प्रगटे कोय ।।३।।**

शुरवीर पुरुष तसेच सती स्त्री सत प्रगट होण्याची विधी प्राप्त करण्या आधी संसारातील अन्य पुरुष तसेच स्त्री सारखेच जगात राहतात सत प्रगट होण्याच्या आधी शुरवीर पुरुष बाजारात अन्य पुरुषांसारखेच कामधंदा करतो तसेच सती स्त्री अन्य स्त्रीया सारखीच घराच्या काम काजात राहते.या शुरवीर पुरुष तसेच सती स्त्री मध्ये सत प्रगट होण्याची वेळ व विधी आल्यावरच सत प्रगट होते जोपर्यंत सत प्रगट होण्याची वेळ येत नाही

तोपर्यंत सती स्त्री व शुरवीरात सत प्रगट होत नाही.।।३।।

**सतगुरू राजा सुर्वा रे ।। लेण मुलक चड जाय ।।**
**सतसब्द जब प्रगटे रे ।। सूरां सिखा मे आय ।।४।।**

शुरवीर राजा परमुलक घेण्याकरीता चढाई करतो तेव्हा लढाई मैदानात सिंधुराग गायला जातो.हा सिंधुराग ऐकून शुरवीरात विरता जागृत होते आणि तो शूरवीर सतच्या बलाने आपली स्वत:ची मान कापली गेल्यावरही शत्रुपक्षाच्या वीरांना तलवारीने मारुन मारुन नष्ट करुन देतो आणि परीसोबत स्वर्ग लोकात जातो.असेच सती मध्ये तिच्या पतीचा वियोग होतो तेंव्हा त्या स्त्रीमध्ये सत प्रगट होते आणि ती सती स्त्री पतीच्या सोबत अग्नीडाग घेते आणि सतवाड्च्या लोकात जाते.याप्रकारे सतस्वरुप सतगुरु शिष्याला बंकनाळेने ब्रम्हंडाच्या गडावर चढण्याचे ज्ञान सांगतात.तेंव्हा शिष्याच्या घटात सतशब्द उदय होतो आणि शिष्य २१ स्वर्गाच्या रस्त्याने ब्रम्हांडाच्या गडावर दहाव्याद्वारात पोहचतो ।।४।।

**सूरा तन जब प्रगटे रे ।। सिंधु दिरावे कोय ।।**
**यूं जन गढ चढ बोलसी रे ।। नाँव ऊदे घट होय ।।५।।**

शूरवीरामधून जर कोण(सिंधुराग)वीर रस गाईल,तेव्हा शुरवीरात शूरवीरपणा प्रगट होवून जातो.अशाप्रकारे संत गढावर चढून बोलले तेव्हा त्यांच्या शिष्याच्या घटात नाव प्रगट होईल.ज्याचे गुरु गढावर चढले नाही,त्या गुरुकडून त्याच्या शिष्याच्या घटात नाव प्रगट होणार नाही.इकडे वर शब्द चढलेला पूर्ण गुरु पाहिजे.दोघांचा योग होईल तेव्हा शिष्यात नाव प्रगट होईल. ।।५।।

**पीव आज अब बीछडे रे ।। जब सत आवे जाण ।।**
**आडा दिन जुग बोहो पड़े रे ।। ज्यां मुख सरम न काण ।।६।।**

सती स्त्रीच्या पतींचा जेंव्हा वियोग होतो(मृत पावतो,मृत्यु होतो)तेंव्हा त्या स्त्रीमध्ये सती होण्याचे सत प्रगट होऊन जाते आणि सती स्त्री पती सोबत जळून विष्णू लोकाच्या पुढे सतवाड्च्या लोकात जाते.पतीचे शरीर सुटले नाही.याचा तिला धिक्कार वाटतो आणि संसारात पतीशिवाय राहण्याची लाज वाटते.या शरमेने स्त्रीमध्ये पती सोबत जळण्याचे सत प्रगट होऊन जाते आणि पती सोबत जळून जाते.जर पती गेल्यावर सती स्त्री सत आल्यावर पती सोबत जळाली नाही आणि पतीच्या मेल्यावर खुप दिवस झाल्यावर सती होण इच्छिते तर ती स्त्री सती नाही होऊ शकत.सती न होता आल्या कारणाने पतीचे शरीर सुटून गेले आणि माझे शरीर त्यांच्या सोबत सुटले नाही.हे जे सत प्रगट करणारी तोंडाची लाजेची कला दिवसें दिवस,दिवस महिने वर्ष झाल्यावर संपून जाते.याप्रकारे मुलकावर चढाई करते वेळी शुरवीर सिंधुराग ऐकतो ज्याच्याने

त्या शुरवीरामध्ये शुरवीरता प्रगट होते परंतु तो शुरवीर लढत नाही यामुळे त्या शुरवीरामध्ये मान कापल्या नंतर राजा करीता शत्रुला मारण्याची शुरवीरता येत नाही. हा शुरवीर लढाई संपल्यावर काही दिवसांनी किंवा महिन्यांनी ती मान कापल्यानंतर मारण्याची शुरवीरता आणू इच्छितो.तरी ही त्या शुरवीरामध्ये ती शुरवीरता येणार नाही. याप्रकारे सतगुरु शिष्याच्या निजमनाला बंकनाळच्या रस्त्याने ब्रम्हंडाचा गढ चढण्याची चटका लागेल असे तेज ज्ञान ऐकवितात आणि ज्ञान ऐकल्यावर शिष्याच्या निजमनाची चढण्याची चाहणा ही होवून जाते.परंतु तो शिष्य चटका लागल्यावरही चढण्याची विधी धारण करत नाही.काही वेळाने जे ज्ञान ऐकविणारे सतगुरु चालले जातात आणि सतगुरु गेल्यानंतर काही महिने,वर्षाच्या नंतर तोच शिष्य ब्रम्हाडांत चढू इच्छीतो परंतु तो शिष्य चढू इच्छीत असला तरी ही चढू शकत नाही.त्या शिष्याचे निजमन रामजीकडे जाणाऱ्या रस्त्यापासून दूर होऊन गेले असते आणि त्रिगुणीमायेत लागून गेलेले राहते.यामुळे ब्रम्हाडांत चढू शकत नाही. ।।६।।

**के सुखदेव जब भूपही रे ।। मुलक न लेवे कोय ।।**
**तो कांहे कूं जूँझसी रे ।। मुंवाँ बिन सत्ति यन होय ।।७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानींना सांगतात की,जेंव्हा राजाच परमुलक (दुसरे राज्य)घेण्यास जाणार नाही.तर शुरवीर लढणारच नाही आणि परी सोबत स्वर्गाच्या लोकात जाणार ही नाही तसेच सती स्त्रीचा पती मेलाच नाही तर सती स्त्री पती सोबत जळून सतवाड्या लोकात जाणारच नाही.अशाप्रकारे शिष्याला सतगुरु मिळालेच नाही तर शिष्याच्या घटात सत प्रगट होऊन शिष्य रामजीच्या महासुखाच्या निजधामास जाणारच नाही.परंतु आदी सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानींना जोर देऊन देऊन रामजीच्या निजधामाला जाणाची विधी सांगून राहिले आहे.जर आज आपण माझ्या सांगितलेल्या विधीच्या अनुसार नाही चेताल आणि माझ्या पश्चात पुढे त्या देशात जावू इच्छीता तर त्या देशाला कधी नाही जाऊ शकणार.म्हणून आज माझे ज्ञान समजा आणि विधी धारण करुन त्या महासुखाच्या धामास चला.याकरीता आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील सर्व ज्ञानी,ध्यानी,स्त्री-पुरुषांना सांगत आहेत. ।।७।।

३८०

।। पदराग केहरा ।।

**सत्त की बात न मेलो हो साधो ।।**
**मेलो हो साधो ।। सत्त सब्द ले खेलो हो ।।टेर।।**

सत्तची गोष्ट खाली ठेऊ नका.साधो सत्तची गोष्ट टाकू नका.त्या सत्तशब्दास घेऊन खेळा. ।।टेर।।

**सत्त सूं धरण आकास ज थंबिया ।। आकास ज थंबिया ।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

चंद सूर रवि तारा हो ।। साधा चदं सूर रवि तारा हो ।।
सत्त सूं देवळ चड गयो इंडो ।। चड गयो इंडो ।।
सत्त सूं दुस्मण माऱ्या हो ।।१।।

या सतशब्दचा आधाराने धरती स्थीर झाली,आकाश स्थीर झाले,चंद्र स्थीर झाला, स्वर्ग स्थीर झाला,सुर्य स्थीर झाला,तारा स्थीर झाले हे सर्व अस्थीर होते हे सर्व सतचा आधार ने स्थीर झाले.या सतचा योग ने मंदीराचा वर कळश चढला आणि या सतचा योगा ने सावंत शुरविरात सत्त प्रगट होते आणि ते सांवत शुरविर सत्तचा बळा ने दुश्मनाची सर्व फौज मारुन देतात. ।।१।।

सत्त सूं पोळज मेहेरी खोली ।। मेहेरी खोली ।।
सत्त सूं फोज जीवाई हो ।। सत्त सूं शिस मंगायो काने ।।
पांडव गळ्या सब जाई हो ।।२।।

व या सत्तच्या योगे चंपापूर(बीड)मध्ये गावकसूचे दरवाजे सुभद्रेने सत्तच्या योगेच उघडले व सतच्या योगानेच कैकयीने मेलेली फौज जिवंत केली.(चंपापुरामध्ये सुभद्रा नावाची सती स्त्री होती.तेथे एक परमहंस साधू वनात राहणारा भिक्षेकरीता आला. त्या साधूच्या डोळ्यात कचरा पडला असल्यामुळे डोळ्यातून पाणी गळत होते व डोळा उघडत नव्हता.त्या साधूची सुभद्रेस दया येऊन त्याचे डोळ्यातील कचरा सुभद्रेने आपली जीभ फिरवून काढला.साधूच्या डोळ्यात जीभ फिरवीत असताना सुभद्रेच्या कपाळीवरील टिकल्याचा कुंकू साधूच्या मस्तकावर लागून गेला.साधू दुसऱ्या शेजाऱ्याच्या घरी भिक्षेस गेला.ती शेजारीण साधूच्या मस्तकावरील टिकला पाहून म्हणाली की हा टिकला सुभद्रेच्या कपाळाचा दिसतो.म्हणून शेजारीणीने सुभद्रेच्या घराच्या बाजूच्या दुसऱ्या शेजारीणीस जाऊन विचारले की साधू तुझ्या घरी भिक्षेकरीता आला,तेंव्हा त्याच्या मस्तकावर टिकला होता काय.दुसरी शेजारीणी म्हणाली साधूच्या मस्तकावर टिकला नव्हता.हे ऐकून त्या शेजारणीने सुभद्रा व साधू यांनी कुकर्म केल्याचे सिध्द करुन दिले.त्यायोगे सर्व शहरात सुभद्रेची निंदा होऊ लागली.या सुभद्रा सती व साधू यती,या यती व सतीच्या निंदेने शहराचे वेशीचे सर्व दरवाजे आपोआप बंद झाले. शहरातील मनुष्य बाहेर व बाहेरचे मनुष्य शहरात येणे जाणे बंद झाले व दरवाजाजवळ जावे,तर दरवाजातून अग्नीसारखी ज्वाला येऊ लागली.शहराच्या राजाने विचारले (व्यासास)हा काय पाप प्रगटला.आता या शहराचा प्रलय होऊन जाईल.तर,हा काय पाप आहे ते मला सांगा.सर्व शहर दुःखी होऊन राहीले आहे.व्यास म्हणाले शहरात साधू व सतीची निंदा होऊन राहीली आहे.या पापामुळे दरवाजे बंद झाले.तर शहरात कोण सती स्त्री असेल त्याची खबर करावी व त्या सतीपासून गुन्हा माफ करावा.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

(समजवावा)राजाने शहरात दवंडी पिटवीली की कोणी दरवाजे उघडून देणारी सती असेल.तिने दरवाजे उघडून द्यावे. सुभद्रा सासूस म्हणाली तुमची आज्ञा असेल तर मी दरवाजे उघडून देते.सासू म्हणाली रांडे,उगी मुगी रहा.काल तर तू साधूसी कुकर्म केले व आज सती जातेस.ही गोष्ट राजाच्या हेराने ऐकली व राजास जाऊन सांगितली.एक स्त्री दरवाजे उघडून देते म्हणाली.परंतू तिची सासू उघडू देत नाही.तेंव्हा राजा खुद्द तेथे आला व दरवाजे उघडून देण्यास सांगितले. सुभद्रा म्हणाली,मी कच्च्या सुताच्या कांडीने चाळणीस लावून या कच्च्या सुताने चाळणीस बांधून विहीरीतुन पाणी काढते. मी चाळणीने पाणी काढून घेतले तर समजा की दरवाजे उघडून देईन.मग सुभद्रेने चाळणीस कच्च्या सुताचा तार बांधून विहीरीतुन पाणी काढले व ती पाण्याची चाळणी घेऊन घरातून रवाना झाली. तिच्या मागे गावातील लोक तमाशा पाहण्याकरीता आले होते.सुभद्रेने दरवाज्याजवळ जाऊन त्या पाण्यातील चुळ भरुन दरवाज्यावर मारली. दरवाज्यास पाणी लागताच फटकन दरवाजा उघडून गेला.तेथून दुसऱ्या दरवाज्यावर गेली.त्याला चुळाने मारुन उघडून दिला.या प्रकारे शहरातील सहा दरवाजे सुभद्रेने उघडून दिले.राजा सुभद्रेस म्हणाला शहरास एक दरवाजा अधिक उघडण्याचा राहीला आहे.सुभद्रा म्हणाली तोही दरवाजा मी उघडून दिला तर सर्वच बायका म्हणू लागतील की मीही हे दरवाजे उघडून दिले असते.मीही उघडून दिले असते अशा सर्वच बायका म्हणतील.तर हा दरवाजा याकरीता ठेवते की या शहरातील किंवा तुमच्या मुलखातील कोणतीही स्त्री दरवाजा उघडणार अधिकही कोणी आहे काय.हे पाहण्याकरीता दरवाजा न उघडता जसाच्या तसाच ठेवीन.कारण की दरवाजा उघडणारी दुसरी कोणी अधिक स्त्री आहे काय.)व एके दिवशी दशरथ राजा देवासूर संग्रामात देवाची मदत करण्याकरीता राक्षसाशी लढण्याकरीता गेला.सोबत कैकयी राणीही होती.तेथे दशरथ राजाची सर्व फौज मरुन गेली. तेंव्हा राजा उदास होऊन म्हणाला,मला अपयश आले.मला लोकात व परलोकात दोन्ही ठिकाणी तिरस्कार होऊन थट्टा झाली.तेंव्हा कैकयी म्हणाली तुम्ही युध्द करा,मी तुमची फौज जिवंत करते व रथाचे चाक मी हाताच्या आश्रयाने थांबविते. तेंव्हा दशरथ राजाची जय झाली.याप्रकारे कैकयीने आपल्या सत्तच्या योगाने फौज जिवंत केली व तुटलेला रथ चालविला.याच प्रकारे कान्हा(कृष्णाने) बभ्रुवाहनाचे युध्दात अर्जुन व वृषकेतूचे मस्तक बकदालभ्य वनातून कृष्णाने बोलविले.(पांडवाच्या अश्वमेघ यज्ञाचा घोडा बभ्रुवाहनाच्या मनीपूर शहरात पोहोचला व बभ्रुवाहनाचे मनीपुर शहरात सेवक घोड्यास धरुन घेऊन गेले व सभेमध्ये बभ्रुवाहनाच्या समोर घोडा उभा केला.तेंव्हा त्या घोड्याच्या मस्तकावर बांधलेले सुवर्णपत्र सोडून वाचले.त्यात युधिष्ठिरच्या अश्वमेघ यज्ञाचा घोडा व त्याचा रक्षक अर्जुन आहे.हे वाचून बभ्रुवाहनाने आपला प्रधान सुमती

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

यास सांगितले,माझी उत्पत्ती अर्जुनापासून आहे.मी अर्जुनाचा पुत्र आहे.तर हे सेवक माझ्या बापाचा घोडा विचार न करता घेऊन आले.आता याचा काय उपाय करावा ते सांगा.सुमती प्रधान म्हणाला याची काही चिंता करु नका.कारण की हे काम अविचाराने झाले आहे.तर आता तुम्ही अनेक रत्नासहीत घोडा अर्जुनाच्या हवाली करा व जसा अर्जुन घोड्याची रक्षा करतो.तसेच तुम्हीही रक्षा करण्यास सोबत जा.तेंव्हा तुमचे पिता अर्जुन तुमच्यावर खुष होईल.ही सुमती प्रधानाची गोष्ट ऐकून बभ्रुवाहनाने आपले सैन्य व यज्ञाचा घोडा सामने करुन अर्जुनाजवळ गेला व हात जोडून म्हणाला तात मी तुमचा पुत्र आहे व चित्रांगदा माझी माता आहे व माझे नाव बभ्रुवाहन आहे.तर तुमचा संबंध न जाणता माझ्या योध्यांनी तुमचा घोडा हरण करुन आणला.तर हा घोडा तुमच्या समर्पण आहे.हा घोडा घ्यावा व हे माझे राज्य अंगीकार करुन प्रजा पालन करा.हे ऐकून सर्व प्रद्यूम्नादि वीर अर्जुनास म्हणाले,हा बभ्रुवाहन राजा तुम्हास प्रणाम करतो.तर या हितकारी पुत्रास गळ्यास लावून मिळा.अर्जुनाने प्रद्युम्नाची गोष्ट ऐकून बभ्रुवाहनाच्या मस्तकावर जोरात लाथ मारली व म्हणाला तुझी माता गंधर्व राजाची पुत्री घरोघर नाचणारी आहे.अरे भितऱ्या,माझा पुत्र असा भयभीत केंव्हाही होणार नाही. तुझी माय चित्रांगदा वेश्येपासून तुझी उत्पत्ती झाली आहे.तर तू माझ्या विर्यापासून उत्पत्ती दाखवून बखाण करतोस व मला लज्जीत करतो व कोणाच्या बळाने घोडा नेला व आता माझा बाण लागल्याशिवाय घोडा आणून देतो.माझा पुत्र अभिमन्यू होता. त्याने द्रोणासारख्या सात महारथ्यास सातवेळा परास्त करुन चक्रव्युह भेद करुन वष युधिष्टिराचे रक्षण केले.तर तू माझे बाण लागल्याशिवाय व्याकूळ कसा होऊन गेला. तिच्या संगे तुही नाच.या तऱ्हेने अर्जुनाचे बोलणे ऐकून बभ्रुवाहनास क्रोध आला व उपहार देण्याकरीता आणलेली सर्व सामुग्री व घोडा आपल्या नगरीत वापस पाठवून दिला व युध्द करण्याकरीता आपल्या रथावर चढून गेला व अर्जुनास म्हणाला आता माझ्याशी युध्द कर,आता मी तुझा वध केल्याशिवाय रहाणार नाही.बभ्रुवाहनाने अर्जुनाच्या पक्षाचे प्रद्युम्न यांना एका एका बाणातच मुर्छित करुन पृथ्वीवर टाकून दिले.यानंतर वृषकेतू निलध्वज व यौवनाश्व व त्याचा मुलगा हंसध्वज यांनाही मुर्च्छीत करुन टाकले. याशिवाय अनेक वीरास छीन्न विछिन्न करुन पळवून लावले व अर्जुनाचे सर्व हत्ती व दास,दासी धरुन सर्व आपल्या मणीपूर शहरात पाठवून दिले व मागे राहीलेल्या हंसध्वजाचा पुत्र यासही मारुन टाकले.मागे फक्त अर्जुन व वृषकेतू राहीले.परंतू यांना (मेलेल्या वीरास)उळपीने औषधीच्या बळावर जीवंत ठेवले.वृषकेतूस अर्जुनाने म्हटले तु माझे बरोबर राहशील तर तुझे प्राण जातील याकरीता तु हस्तीनापुरास जाऊन भीमास माझ्या मरणाची गोष्ट सांग.वृषकेतू म्हणाला,मी तुम्हास सोडून मृत्यूच्या

भयाने केंव्हाही जाणार नाही.बभ्रुवाहनाने वृषकेतूचे मस्तक कापून अर्जुनाचे पायात टाकून दिले.अर्जुन मुर्छित होऊन जमिनीवर पडून गेला,तेंव्हा बभ्रुवाहनाने अर्जुनास धनुष्याने मारुन उठविले व अर्जुनाचे व बभ्रुवाहनाचे युध्द झाले.त्यात बभ्रुवाहनाने अर्धचंद्राकोर बाणाने अर्जुनाचे मस्तक कापून टाकले.अर्जुनास मेलेला पाहून चित्रांगदा (बभ्रुवाहनाची आई)विलाप रडू लागली.ही आईची दशा पाहून बभ्रुवाहन आत्मघात करु लागला.तेंव्हा उलूपी(उलुपी ही शेषनागाची पुत्री व बभ्रुवाहनाची सावत्र आई होती.) ही उलुपी म्हणाली,माझा बाप शेषनाग पाताळाचा राजा आहे.त्याचे जवळ अमृत आहे ते अमृत येथे आणले तर हे जिवंत होतील.बभ्रुवाहन म्हणाला,मी शेषनागा पासून अमृत बोलावून घेतो.शेषनागने अमृत खुशीने न दिल्यास त्याच्याशी युध्द करुन मी अमृत घेऊन येईन.बभ्रुवाहनाने शेषनागास पत्र लिहीले की नानाजी(आजोबा)तुमचा जावई अर्जुन माझ्या हाताने मारला गेला,तर नानाजी(आजोबा)तुमच्या येथून अमृत लवकर पाठवून द्या.अमृत पाठवत नसाल तर लढाईस तयार व्हा.ते पत्र बाणास बांधून तो बाण बभ्रुवाहनाने पाताळात चालविला.पत्र घेऊन आलेला बाण शेषनागाच्या सभेत पडला.शेषनागाने बाण कोणाचा आला हे पाहण्याकरीता आपल्या दुष्ट बुध्दी प्रधानास सांगितले.प्रधान पत्र वाचून म्हणाला,उलुपीची सवत् चित्रांगदेचा मुलगा बभ्रुवाहनाचे पत्र घेऊन बाण आलेला आहे.अर्जुन मारला गेला म्हणून अमृत पाठविण्याबद्दल लिहीले आहे. शेषनाग म्हणाला अर्जुन माझा जावई आहे.त्याचेकरीता अमृत जरुर पाठविले पाहीजे .दुष्ट बुध्दी प्रधानाने या गोष्टीचा फार विरोध केला की अमृत मृत्युलोकात पाठवू नये. शेष म्हणाला दुसऱ्याकरीता अमृत पाठविला नसता.परंतू माझ्या अर्जुनाकरीता पाठविलाच पाहीजे.ही गोष्ट ऐकून प्रधान तेथून निघाला व मणीपुरात येऊन अर्जुन व वृषकेतूचे मस्तक बकदालभ्य वनात नेऊन लपवुन ठेवून दिला.इकडे कृष्ण,कुंती व भीम हस्तीना–पुराहून मणीपुरास आले व अर्जुन,वृषकेतू व सर्व वीर मेलेले पाहून रडू लागले.तेंव्हा बभ्रुवाहन भीमास म्हणाला काका तुम्ही,आजी व कृष्ण मामा रडू नका.मी पाताळातून अमृत बोलविला आहे.तो अमृत शेषनाग पाठवून देईल,न पाठविल्यास मी युध्द करुन घेऊन येईन व माझा बाप व माझा चुलतभाऊ वृषकेतूस जिवंत करेन.या गोष्टी होत आहेत.इतक्यात पाताळातून शेषनागाने पाठविलेला नाग अमृत घेऊन आला.अमृत पाहून सर्व खुषी झाले व रणभुमीवर जाऊन पहातात तर अर्जुनाचा व वृषकेतूचा मस्तक सापडला नाही.तेंव्हा सर्व चिंतातूर झाले व बभ्रुवाहनही उदास झाला व म्हणाला इतके करुन अमृत बोलाविला व यांचे मस्तक असल्याशिवाय अमृत निरोपयोगी आहे.तेंव्हा कृष्ण म्हणाला,मी माझे सत्तेने मस्तक बोलावून देतो.कृष्ण बोलला की मी सोळा हजार स्त्रीया भोगून ब्रम्हचारी असेन तर मस्तक नेणाऱ्याचे मस्तक तेथे तुटून पडो व

अर्जुनाचा व वृषकेतूचा मस्तक येथे येऊन जावो.इतके म्हटल्याबरोबर शेष नागाच्या प्रधानाचा मस्तक तेथे कापला गेला व अर्जुनाचा व वृषकेतूचा मस्तक मणीपूरास येऊन गेले.)याप्रमाणे कान्हाने (कृष्णाने) सत्तच्या आधारे मस्तक बोलाविले व सत्तनसल्या–कारणाने चार पांडव व द्रौपदी हिमालयात जाऊन गळून गेले व सत्तच्या योगाने युधिष्ठीर गळला नाही. ।।२।।

**सत्त राख्याँ सूं पत्त रहे हे ।। पत्त रहे हे ।।**
**साहाय करे हर आई हो ।। केहे सुखराम जीव तन जाताँ ।।**
**सत्त राखो ऊर माही हो ।।३।।**

सत्त ठेवल्याने पत्त राहते व सत्त ठेवल्यानेच हर(रामजी)येऊन सहाय्यता करतो.या करीता सत्गुरु सुखरामजी महाराज म्हणतात,जीव जाईल तर जाऊ द्या,परंतू सत्त जाऊ देऊ नका.सत्त हृदयात धारण करुन ठेवा. ।।३।।

४०

।। पदराग आसा ।।

**बांदा जुक्त मुक्त प्रचा सो माया**
**तत्त ग्यान सोजी बिना पूरी ।। कोई नही जाण न पाया ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हरजी भाटीस सांगतात की,ज्या संतामध्ये पर्चे चमत्कार प्रगटले म्हणजे युक्ती–मुक्ती प्राप्त झाली म्हणजे नेहमी करीता काळापासून सुटून गेला.असे ज्ञानी,ध्यानी समजतात.पर्चे चमत्कार हा मायेचा गुण आहे.हा तत्त नाही या तत्त ज्ञानीची खरी पूर्ण समज या ज्ञानींना नाही यामुळे माया काय आणि तत्तज्ञान काय याचा फरक या ज्ञानींच्या लक्षात येत नाही.।। टेर ।।

**कत्रस्याम प्रहलाद श्रीया ध्रु ।। सोही बीच लुटाना ।।**
**ओर संत की कुण चलाई ।। ज्यां निजनाव न जाण्या ।।१।।**

कार्तिक स्वामी,प्रल्हाद,श्रीयादे,ध्रूव या संतामध्ये पर्चे चमत्कार प्रगट झाले होते. यांच्यात माया प्रगट झाली होती,निजनाम प्रगट झाले नव्हते.या कारणाने हे संत तत्त मध्ये न पोहचता पर्चे चमत्कार या मायेमध्ये अटकून गेले आणि मोक्षाची इच्छा असूनही मोक्षाला न पोहचता मध्येच लुटले गेले.याप्रकारे निजमन काय आहे हे न समजल्या कारणाने अनेक संत मायेमध्ये लुटले गेले.।।१।।

**जोगी तपी रिषी सन्यासी ।। अे माया का चेला ।।**
**पूजा पाठ ध्यान सक्ति को ।। तत्त तज फिरे अकेला ।।२।।**

जोगी (महादेव, गोरखनाथ, मच्छिंद्रनाथ, पातंजली) तपी (सुकदेव,ध्रूव)ऋषी(मरीची,अत्र अंगीरा,पुलस्त),संन्याशी(दत्तात्रेय,शंकराचार्य)हे सर्व मायेचेच चेले राहिले.तत्तचे ज्ञान नसल्याने तत्तचे चेले नाही बनले.यांनी शक्ती म्हणजे मायेची पुजा केली,पाठ

केले,ध्यान केले आणि तत्त सोडून तत्तच्या सोबत विना एकटेच तत्त प्राप्त करण्या करीता पचले.(थकले) ।।२।।

**आठ सिध नौ निध अे तत्त आडी ।। ग्यान ध्यान सब लोई ।।**
**सतगुरू सरण भेद ओ पावे ।। ओर न जाणे कोई ।।३।।**

अष्ट(आठ)सिध्दी,नऊ निधी,वेदाचे ज्ञान,योगाचे ध्यान आणि मायेमध्ये म्हणजे व्रत, एकादशी,उपवास,क्रिया–कर्मात रचमचलेले स्त्री–पुरुष हे तत्त समजण्याच्या आड्वे येतात.तत्तची समज सतगुरुपासून तत्तचा भेद प्राप्त केल्यानेच येते.अन्य कोणत्याही विधीने तत्तची समज येत नाही ।।३।।

**माया बड़ी अपर बळ साधो ।। सब घट राख्या छाई ।।**
**तत्त भेद ओ प्रगटे न्यारो ।। भ्यास न सक्के माई ।।४।।**

माया लुटण्यात मोठी तरबेज,पराक्रमी आहे.ही माया सर्व स्त्री–पुरुष,ज्ञानी,ध्यानींच्या घटावर भारी पसरलेली आहे ज्याच्यात तत्त भेद प्रगट झालेला आहे तेच फक्त या मायेपासून वेगळे आहे.फक्त त्याच संतामध्ये परचे चमत्कार ही माया प्रगट होत नाही. तत्तभेद सोडून अन्य सर्व संतांना ही माया परचे चमत्कार प्रगट करुन घेऊ न घेते. काळाच्या चपेट मध्ये अटकवून ठेवते.(प्रत्येकाच्या मनात पर्चे चमत्कारांची चाहणा आहे.अश्या प्रत्येकाच्या घटावर ही माया पसरलेली आहे.)आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सर्व ज्ञानी,ध्यानी तसेच स्त्री–पुरुष ब्रम्ह म्हणजे सतस्वरुप तत्त आणि माया असे दोन वेगवेगळे आहे असे सांगतात आणि समजण्याच्या वेळी पर्चे चमत्कारालाच सतस्वरुप तत्त म्हणजे साहेब समजून घेतात. ।।४।।

**के सुखराम ब्रम्ह अर माया ।। दोय कहे सब कोई ।।**
**जो साहेब प्रचा यां देवे ।। माया गुण को मोई ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी,स्त्री–पुरुषांना विचारतात की, परचे चमत्कार हे साहेब आहे तर मायेचे गुण काय आहे?ब्रम्ह आणि माया असे दोन वेगवेगळे आहे असे आपण सर्व सांगतात तर मग मायेचा गुण आणि ब्रम्हचा गुण वेगवेगळा असायला हवा.।।५।।

४३

।। पदराग आसा ।।

**बांदा केवळ को घर न्यारो**

**करामात क्रिया सब झूटी ।। साचो नांव बिचारो ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हरजी भाटीला सांगतात की,हे कैवल्याचे घर ब्रम्हा, विष्णु,महादेव,शक्ती यांच्या मायेच्या घराहून वेगळे आहे,न्यारे आहे म्हणून घटात सतनामाचे विज्ञान ज्ञानाचे पर्चे हे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती या मायेच्या पर्चे

चमत्काराहून न्यारे आहे.करामात क्रिया म्हणजे मायेचे पर्चे चमत्कार हे सर्व मोक्षाला घेऊन जाण्या करीता खोटे आहे म्हणून या मायावी चरीत्रांना त्यागून सतनाम ज्याच्याने आवागमन मिटते त्याला धारण करण्याचा विचार करा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानी,ध्यानी तसेच स्त्री, पुरुषांना समजवित आहे.

जगातील सर्व लोक ब्रम्हाचे घर,विष्णुचे घर,महादेवाचे घर,शक्तीचे घर जाणतात व हे घर प्राप्त केले म्हणजे मी सुखी झालो,माझे आवागमन मिटले असे समजतात तर अशा सर्व ज्ञानी,ध्यानी यांना गुरु महाराज सांगतात की हे सदा सुख देणारे कैवल्याचे घर हे ब्रम्हा, विष्णु,महादेव,शक्ती यांच्या मायेच्या घराहून वेगळे आहे,न्यारे आहे म्हणून घटात सतनामाचे विज्ञान ज्ञानाचे पर्चे हे ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती या मायेच्या पर्चे चमत्काराहून न्यारे आहे म्हणजे या मायेच्या पर्चे चमत्काराने आवागमनाचे दुःख मिटत नाही.घटामध्ये परमात्मा प्रगट होत नाही करामात क्रिया म्हणजे मायेचे पर्चे चमत्कार मोक्षात घेऊन जाण्याकरीता खोटे आहेत.महासुखाचा अमरदेश मिळत नाही, ८४००००० योनीचे दुःख मिटत नाही पर्चे चमत्कार जीवाला मायेतच ठेवतात.म्हणून आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात या मायावी चरीत्रांना त्याग व त्यागून सतनाम ज्याच्याने आवागमन मिटते त्याला धारण करण्याचा विचार करा असे जगाच्या ज्ञानी,ध्यानीना सांगतात.

रामनामाला/सतनामाला धारण करण्याचा विचार करा कारण आतापर्यंत आम्ही हा विचार केला नाही की,मी या मनुष्य देहात काय केले पाहिजे.मी सतनाम कशासाठी धारण केले पाहिजे.आपण फक्त १०० वर्षाचा विचार करतो,१०० वर्षाची सुख दिसतात. हंसाची चाहणा सदाकरीता सुखाची आणि भक्त्या अशा साधतो ज्या जीवाची ही चाहणा पूर्ण करु शकत नाही म्हणजे सुख देणाऱ्या देशात पोहचवू शकत नाही. ।।टेर।।

**करामात सूं सब कोई रीजे ।। ग्यानी द्रसण सारा ।।**
**ओ सुण अरथ न सुझे किस कूं ।। माया चरित्र बिचारा ।।१।।**

संसारात सर्व ज्ञानी आणि दर्शन(जोगी,जंगम,सेवडा,संन्यासी,फकीर,ब्राम्हण)हे सर्व करामात म्हणजे पर्चे चमत्कार प्रगट झाल्यावर खुश होतात परंतु हा अर्थ कोणालाही सुचत नाही म्हणजे दिसत नाही की हे पर्चे चमत्कार मायेचे चरीत्र आहे हे रामजीचे चरीत्र नाही.हे सर्व पर्चे चमत्कार प्रगट झाल्यावर खुश होतात.कोणी आकाशात उडून गेले किंवा समुद्रावर जमीनीसारखे चालू लागले.असे पर्चे पाहून हे खुश होतात परंतु हा अर्थ कोणालाही सुचत नाही म्हणजे दिसत नाही की,हे पर्चे चमत्कार मायेचे चरीत्र आहे रामजीचे चरीत्र नाही.माया ही काळाच्या मुखात ठेवणारी आहे.रामजीचे चरीत्र नाही की तुम्हाला मोक्षाला पोहचवतील महासुखाच्या अमरदेशात घेऊन जातील.म्हणून

महासुखाच्या अमरघरात जायचे असेल तर गुरु महाराज म्हणतात. ।।१।।

**माया जहां राम सुण नाही ।। राम ज्हा नही माया ।।**
**ओ सुण भेद न जाणे कोई ।। प्रचा क्हां सूं आया ।।२।।**

जिथे मायेचे पर्चे चमत्कार आहे तिथे राम नाही आणि जिथे राम आहे तिथे मायेचे पर्चे चमत्कार नाही परंतु हा भेद कोणीही जाणत नाही की,हे पर्चे चमत्कार आले कोठून? जो संत त्रिगुणी मायेचे पर्चे चमत्कार करतो त्याला वाटते माझ्यामध्ये परमात्मा प्रगट झाला मग अशा संताला किंवा जे समजतात की यांना परमात्मा प्राप्त झाला त्यांना आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जिथे मायेचे पर्चे चमत्कार आहे तिथे राम नाही म्हणजे त्यांच्या घटात सतशब्द=सतस्वरुप परमात्मा प्रगट आहे तिथे मायेचे पर्चे चमत्कार नाही म्हणजे तो मायेचे पर्चे चमत्कार प्रगट करत नाही.यांच्यात सतशब्दाचे बीज आहे म्हणून मायेचे पर्चे करत नाही व पर्चे चमत्कार करणाऱ्या संतात मायेचे बीज प्रगट आहे सतशब्द नाही म्हणून मायेचे पर्चे देतो.परंतु हा भेद कोणीही जाणत नाही की,पर्चे चमत्कार आले कोठून?हा विचार कोणीच करत नाही की पर्चे चमत्काराची उपज त्रिगुणी मायेपासून आहे.ही त्रिगुणी माया भ्रम आहे,मृतक आहे काळाच्या जबड्यातच ठेवते ही समज,हा भेद कोणीही जाणत नाही असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.म्हणून या मायेला त्यागा व जो सतशब्द हंसाला केवल पदात पोहचवतो अशा सतशब्दाला धारण करा असे हे केवलचे घर वेगळे आहे त्याला प्राप्तीचा विचार करा. ।।२।।

**देखो भूल ग्यान द्रसण मे ।। प्रचा सकळ सरावे ।।**
**जिण जन कूं माया बिच माऱ्यो ।। तां की सोभा गावे ।।३।।**

पहा ज्ञान्यांमध्ये आणि दर्शनीमध्ये(जोगी,जंगम,सेवडा,संन्यासी,फकीर,ब्राम्हण)कशी भूल पडलेली आहे की जेथे मायेचे पर्चे चमत्कार झाले की हे सर्व त्याची शोभा करायला लागतात अरे,ज्या संतांना मायेने मारले त्यांची तुम्ही काय शोभा करतात?

दर्शनीमध्ये कशी भूल पडलेली आहे की जेथे मायेचे पर्चे चमत्कार झाले की,हे सर्व त्यांची शोभा,महिमा करायला लागतात.

उदा.मुर्द्याला जिवंत करुन दिले किंवा हवेमध्ये उडू लागले,अमेरीकेत काय चालले हे बसल्या बसल्या पाहून सांगितले.

आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात,ज्या संतांना मायेने मारले त्यांची तुम्ही काय शोभा करतात.

हे जगत ज्या संताने मायेचे पर्चे दिले त्यांची शोभा,महिमा करतात.परंतु जगाच्या लोकांना हे समजत नाही की मायेने या सर्व संतांना मोक्षात न जाऊ देता आपल्या

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

चमत्कारात लावून दिले व संत परचे चमत्कार या मायेत असे भिनले की ही मायाच मोक्ष समजू लागले आणि मोक्ष प्राप्ती करता आणलेला मनुष्य देह पर्चे चमत्कारात गमवून दिला काळाच्या मुखातून निघण्या ऐवजी काळाच्या मुखातच अटकून राहिले ज्यात काळाचे जुलूम सहन करावे लागतात ज्या घरात सुखाच्या मागे सुख आहे अशा परममोक्षाच्या घरात नाही पोहचले.जगाचे नर–नारी इतके ही समजत नाही की,हे संत कच्चे आहे,कायर आहे,मोक्ष प्रगट होण्यापासून दूर आहे यांची मिळालेला अमुल्य मनुष्य देह लुटला गेला.आपण ही असे लुटले जाऊ नये म्हणुन आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।३।।

**ब्रम्ह लोक जातां कूं बीचे ।। माया हे बट फाड़ी ।।**
**सतगुरू सरण तत्त ज्या भ्यासे ।। जिण जन पटक पछाड़ी ।।४।।**

अरे,पारब्रम्हच्या लोकात जाणाऱ्यांना रस्त्यात लुटणारी आहे.ही मध्येच लुटून घेते पुढे जाऊ देत नाही.अनेक तऱ्हेचे चमत्कार दाखवून त्या चमत्कारामध्ये भुलवून देते.अशा मोठ–मोठ्या पारब्रम्ही संतांना चमत्कार झाला त्यांच्यात ते भुलून गेले.मायेने त्यांना लुटून घेतले.या लुटलेल्या संतांची तुम्ही काय शोभा गातात?असे जे सतगुरुच्या शरणात गेले आहे त्यांना तेथे तत्त म्हणजे सारब्रम्ह दिसला आहे.त्या जनांनी म्हणजे संतांनी मायेच्या चमत्कारांना पटकून पछाडले म्हणजे थोडेसेही जवळ येऊ दिले नाही.

पारब्रम्हच्या लोकात जाणाऱ्यांच्या रस्त्यात ही माया लुटणारी आहे.जो या पारब्रम्हची भक्ती करतो अशा संताला ही माया रस्त्यात लुटणारी आहे.या पारब्रम्हच्या ज्ञान्यांना माया पर्चे चमत्कार दाखवून लुटून घेते अशी ही माया बटफाडी म्हणजे लुटणारी आहे. अशा संताला पर्चे चमत्कार ६४ स्वभाव तरबेज,पराक्रमी आहे.अशा संताची तुम्ही काय शोभा गातात.अशा मायेला कोणी मारले.

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जो सतगुरुच्या शरणात गेले त्यांना तत्त म्हणजे सारब्रम्ह दिसला.ज्यांना माया काय आहे,होणकाळ पारब्रम्ह काय आहे तसेच सतस्वरुप वैराग्य विज्ञान काय आहे,याचा फरक माहित राहिल तोच पारखी पर्चे चमत्कार या मायेला समजेल.ही माया हंसाला सतस्वरुपात न जाऊ देता होणकाळात अटकविते हे परखेला/पारख करेल दुसरा कोणता ही संत ही पर्चे चमत्कार माया जीवाला मोक्षात जाण्यापासून अटकविते हे पारखू शकणार नाही.अशा पारखी सतगुरुच्या शरणात जो जाईल त्याच संतांनी मायेच्या चमत्काराला पटकून(आपटून)पछाडा म्हणजे थोडेसे ही जवळ येऊ दिले नाही.त्यांना हे समजले की माया ही खोटी आहे ही काळाच्या मुखात अटकवून ठेवते,काळाच्या पलीकडे जाऊ देत नाही. ।।४।।

**माया थूळ ना अटके कांही ।। आंतो उलटो तारे ।।**

करामात प्रच्या जो देवे ।। वां गळ फासी डारे ।।५।।

अरे स्थुल माया आहे ही माया कोठेही अटकवित नाही ही तर उलट तारते.(स्थूल माया स्त्री,पुत्र,पुत्री,धन,घर,दुकान)परंतु ज्या संताने येथे करामात करुन पर्चे दिले आहे (रिध्दी सिध्दीचे पर्चे चमत्कार-आकाश मार्गाने उडून जाणे,सागरावर चालणे,जमीनीत गाडून अनेक कोसावर निघणे,मुर्दयाला जिवंत करणे,पळात सृष्टी मिटविणे,पळात सृष्टी बनविणे,एकाच वेळेस वेगवेगळ्या जागी शरीर धारण करणे,दुसऱ्याच्या मनातील गोष्ट सांगणे,लाख कोसावरची गोष्ट येथे पाहून सांगणे)लोकांना चमत्कार दाखविले आहे त्या संताच्या गळ्यात माया फाशी टाकते.

माया दोन प्रकारची आहे.कोणत्या साधकाला वाटते कुटूंब परीवार ही जी स्थूल माया आहे ती सोडली तर मोक्ष मिळतो मोक्ष मिळण्याच्या ही स्थूल माया आडवी येते असे समजून ही माया त्यागतात अशा साधकाला आदि सतगुरु सुखरामजी महाराज समजवितात माया दोन प्रकारची आहे.१)पर्चे माया २)स्थूल माया-पत्नी,पुत्र,पुत्री,धन, घर,दुकान,गाडी)ही माया अटकवणारी समजते.ही स्थूल माया कोठे ही अटकवित नाही ही उलट तारते.

तारते कशी-भजन करुन घरी गेले तर भूक लागली तर आई किंवा पत्नी खायला देते.

मुलगा-संसाराचे काम करुन देईल तेवढा वेळ आम्ही नामस्मरणात लावू शकतो.

धन संपदा-गुरुकार्यात लावता येते .

गाडी-गुरुकार्याकरीता जाता येते.

पर्चे चमत्कार माया-ज्या मायेला जगत तारणारी माया समजतात ती माया पर्चे चमत्काराची माया जीवाला काळाच्या मुखात ठेवते मायेच्या पर्चे चमत्काराची सत्ता पूर्ण होणकाळ ब्रम्हपर्यंत आहे ती जीवाला त्यांच्या पलीकडे जाऊ देत नाही.ती फाशी सारखी आहे.गळ्यात फाशी टाकते.

जसे-कोणी फाशी घेतली तर ती फाशी देहातून प्राण काढते असेच पर्चे चमत्कार जीवाला काळाच्या मुखातच ठेवते.

म्हणून गुरु महाराज सांगतात यात फसू नका.या काळाच्या पलीकडे अमर घर केवलचे घर प्राप्त करायचे आहे तर कैवल्याचे नामस्मरण करा. ।।५।।

**तत्त ग्यान बिना युं व्हे जग मे ।। जिण आ सोभा गाई ।।**

**जुक्त मुक्त सबही ईण माही ।। जां प्रच्या हूवा भाई ।।६।।**

जगात तत्तज्ञान न मिळणाऱ्या संतांचा हा स्वभाव बनतो त्यांनीच या लुटल्या गेलेल्या संतांची शोभा गायली आहे.ज्या संतांनी पर्चे चमत्कार केले त्यांना मुक्ती मिळून गेली

ते काळापासून सुटून गेले असे तत्तज्ञान न समजणारे संत समजतात.
ज्यांच्या घटात तत्त ज्ञान प्रगट झाले नाही त्यांचा असा स्वभाव बनतो की त्यांनीच या लुटल्या गेलेल्या संतांची शोभा गायली आहे.
उदा.मुर्द्याला जिवंत करुन दिले.म्हणून यांना वाटते की ज्यांनी हे पर्चे चमत्कार केले ते काळापासून सुटून गेले असे तत्तज्ञान न समजणारे संत समजतात. ।।६।।

**मोटा खरा सकळ जग जाणे ।। तत्त पंथ पायो नाही ।।**
**तत्त तो झिण झिण सूंई झीणी ।। माया बडी कवाही ।।७।।**

हे संत जगात मोठे मानले जातात परंतु या संतांनी तत्त पंथ प्राप्त केलेला राहत नाही.तत्त समजण्याकरीता खूप(उंडी)सखोल बुध्दी पाहिजे असते.तत्त हा मायेच्या सारखा राहत नाही.पर्चे चमत्कार म्हणजे माया समजण्याकरीता वर वरची बुध्दी चालते इतकी माया मोठी राहते परंतु तत्त समजण्याकरीता खूप सखोल बुध्दी पाहिजे राहते.हे समजण्याकरीता झिन्याहून झिना राहतो मायेसारखा सहज समजणारा मोठा राहत नाही.
उदा.कोणीही मनुष्य आकाश मार्गाने उडू शकत नाही जास्तीत जास्त१०-१५ फुटाची उडण्याची माया प्रगट केलेला मनुष्य आकाश मार्गाने सहज उडतो.साधू आकाश मार्गाने उडाला आणि स्वत:ला आकाश मार्गाने उडता येत नाही.प्रयत्न केल्यावरही थोडेसेही उडता येत नाही हे समजण्याकरीता सखोल बुध्दीची गरज नाही.दररोजच्या क्रिया कर्मची बुध्दी हा फरक समजवून देते.अशा प्रकारे पर्चे मायेला समजण्याकरीता वर वरची बुध्दी भरपूर घेऊन जाते परंतु कैवल्य हा झिन्याहून झिना आहे.ही कैवल्याची सत्ता मन,५ आत्मा पासून जीवाला मुक्त करविते,त्याची ९ तत्त लिंग काया मिटवित,संचित कर्म मिटविते,होणकाळातून मुक्त करवून देते आणि दिव्य काया प्राप्त करुन अमरलोकास घेऊन जाते हे समजण्याकरीता विशेष ज्ञान-विज्ञान बुध्दी लागते दररोजच्या क्रिया कर्मला समजणारी मायावी बुध्दी काम येत नाही.असेच आदि सतगुरु सुखरामजी महाराजानी पर्चे चमत्काराचे आणखी काही दाखले दिले आहेत.
जसे-सागरावर चालणे,जमीनीत गाडून अनेक कोसावर निघणे,मुर्द्याला जिवंत करणे, पळात सृष्टी मिटविणे,पळात सृष्टी बनविणे,एकाच वेळेस वेगवेगळ्या जागी शरीर धारण करणे,दुसऱ्याच्या मनातील गोष्ट सांगणे,लाख कोसाची गोष्ट येथेच पाहून सांगणे हे सर्व पर्चे समजण्याकरीता(उंडी)सखोल बुध्दीची गरज राहत नाही या प्रकारच्या पर्चे मायेला समजण्या करीता वर-वरची बुध्दी भरपूर होऊन जाते.
संत मोठे मानले जाते-त्यांचे शिष्य लाखोने संख्या राहते.परंतु त्या संतांच्या घटात परमात्मा प्रगट नसतो.उंडी बुध्दी=झिनी=सखोल बुध्दी तत्तपंथ प्राप्त करण्याकरीता सखोल बुध्दी लागते.हिऱ्यात किती माती आहे,कोळसा आहे हे जे सखोल बुध्दी पारखी

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

असेल त्यालाच कळेल.हिऱ्याची पारख करायला पायांचे चिन्ह,नाडी परीक्षणाला जशी झिनी बुध्दी लागते अमरलोक जाण्याकरीता झिनी बुध्दी लागते.आत्म्यात परमात्मा आहे हे समजायला सखोल बुध्दी लागते. ।।७।।

**के सुखराम तत्त ज्या पायो ।। वे प्रच्या नही माने ।।**
**उलटर नाव चढे गड़ ऊपर ।। तत्त समाध बखाणे ।।८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्या संतांनी तत्तला प्राप्त केले आहे ते पर्चे चमत्काराला मानत नाही.ते संत नामाच्या पराक्रमाने बकंनाळेने उलटून गडावर म्हणजे ब्रम्हांडात चढून गेले आहे तेच त्या तत्त म्हणजे सतस्वरुपाच्या समाधी सुखाचे वर्णन करतात.ज्या संताने सतगुरुच्या शरणात जाऊन सतस्वरुप तत्तला घटात प्राप्त केले असे संत चमत्काराला मानत नाही ते संत सतनामच्या पराक्रमाने बकंनाळेने उलटून गडावर वरती म्हणजे ब्रम्हडांत चढून गेले.संखनाळेने उतरुन बकंनाळेने चढले तेच संतच त्या तत्त म्हणजे सतस्वरुप समाधीच्या सुखाचे वर्णन करतो व ज्यांना घटातील सतनामाचे विज्ञान ज्ञानाचे पर्चे मिळाले तेच संत कैवल्याच्या घरात पोहचले या व्यतीरिक्त ज्यांनी घटाच्या बाहेरचे पर्चे दिले ते काळाच्या मुखातच राहिले.या कैवल्य समजण्याचा,प्राप्त करण्याचा,त्या देशात पोहचण्याचा रस्ता वेगळा आहे.।।८।।

७८

।। पदराग मिश्रित ।।

**भाई भेदी हुवे सोई जाणे**

**भाई भेदी हुवे सोई जाणे ।। दूजो नही जाणे रे भाई ।।**
**पारख हुवे सोई प्रखे ।। दूजो क्या प्रखेरे भाई ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना तसेच ज्ञानी,ध्यानींना समजावतात की,ज्याला माया काय आहे,होणकाळ पारब्रम्ह काय आहे,तसेच सतस्वरुप वैराग्य विज्ञान काय आहे?याचा फरक माहीत असेल तोच पारखी पर्चे चमत्कार या मायेला समजेल.ही माया हंसाला सतस्वरुपात न जाऊ देता होणकाळात अटकविते हे पारखेल (समजेल)दुसरा कोणीही संत ही माया जीवाला मोक्षाला जाण्यापासून अटकविते हे पारखु शकत नाही.।टेर।

**मुख सूं सकळ संत सो केहेग्या ।। माया जीते सो गाजी ।।**
**ध्रिग ध्रिग उण अकल मत्त कूं ।। प्रचा हुवां हुवे राजी ।।१।।**

जगातील सर्व संत तोंडाने सांगतात की,जो परचे चमत्कार या मायेला जिंकतात म्हणजे या मायेच्या बीजाला त्यागतो तोच गाजी मर्द आहे.असे मतवालेच ज्ञानी,ध्यानी जे संत परचे चमत्कार करतात त्यांच्याने खुश राहतात आणि जगात त्यांची महिमा करतात असे सांगण्यात आणि समजण्यात अंतर ठेवतात अश्या मताला धिक्कार आहे,धिक्कार

आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात ।।१।।

**माया मार लिया अधबिच ।। ज्यां कूं ज्हान सरावे ।।**
**अेती खबर नही अे कच्चा ।। कायर तंके लुटावे ।।२।।**

मायेने या सर्व संतांना मोक्षास जाऊ न देता आपल्या चमत्कारात लावून दिले आणि संतही परचे चमत्काराच्या मायेत असे भिनून गेले की ही मायाही मोक्ष समजायला लागले आणि मोक्ष प्राप्त करण्याकरीता आणलेला मनुष्य देह मायेच्या पर्चे चमत्कारात गमावून दिला. काळाच्या मुखातून निघण्या ऐवजी काळाच्याच मुखातच अटकून राहिले अश्या संतांची जगातील स्त्री-पुरुष मोक्ष देणारे उच्च संत समजून त्यांची महिमा करतात.जगातील स्त्री-पुरुषांना इतकीही ज्ञानाची समज नाही की,हे संत कच्चे आहेत, काय आहे.मोक्ष प्राप्त होण्यापासून दूर राहीले आहे.यांचा मिळालेला अमुल्य मनुष्य देह लुटला गेला आहे ।।२।।

**रिध सिध मिल्यां मुक्त जो होवे ।। मुवा जिवायां सोई ।।**
**तो सक्ती माहे क्हा क्हो ओगण ।। मोख न पावे कोई ।।३।।**

जगातील ज्ञानी,ध्यानी तसेच स्त्री-पुरुष हे समजतात की,रिध्दी-सिध्दी प्रगट केलेले संत काळापासून मुक्त होऊन जातात.कारण हे संत मेलेल्याला(मुर्द्याला)जिवंत करतात म्हणून यांना काळ खात नाही.हे रिध्दी-सिध्दीची महिमा करणारे संत हे पण सांगतात की शक्तीला काळ खातो म्हणून शक्तीचा शरणा मोक्ष प्राप्त करण्याकरीता व्यर्थ आहे. हे संत हे पण सांगतात की,रिध्दी-सिध्दी शक्तीपासून जन्मली आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ज्ञानी,ध्यानींनी हा भेद जाणला पाहिजे की,जर रिध्दी -सिध्दी शक्ती पासून जन्मली आहे आणि शक्तीला काळ खातो तर शक्ती पासून जन्मलेल्या रिध्दी-सिध्दीला ही काळ खाईलच खाईल.मग रिध्दी-सिध्दी प्रगट केलेले संत मोक्षास कसे जातील?।।३।।

**के सुखराम बन कूं जाता ।। म्हेरी चेन बतावे ।।**
**इऊं रिध सिध सुणो सब प्रचा ।। घेरर घट मे लावे ।।४।।**

जसे कोणी पुरुष संसार त्यागुन(सोडून)बैरागी बनतो आणि वनात जाण्यास निघतो त्यावेळी त्याची पत्नी त्याला संसारात ठेवण्या करीता अनेक प्रकारचे मोहीत चरित्र दाखविते त्याच प्रकारे रिध्दी-सिध्दी ही माया जीव घटातून म्हणजे होणकाळातून निघू नये याकरीता अनेक प्रकारचे परचे चमत्काराचे मोहीत चरित्र करते आणि जीव होणकाळाच्या परे जाण्या पासून(थांबवते)हा भेद ज्ञानी,ध्यानींनी शोधायला पाहिजे. असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व ज्ञानी,ध्यानी तसेच स्त्री-पुरुषांना सांगतात. ।।४।।

३८२

।। पदराग मिश्रित ।।

सुण ग्यानी बचन हमारा ।।

रिध सिध तिका संताँ धारी ।। से नही उतऱ्या पारा रे ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज ज्ञानी,ध्यानींना सांगतात की,माझे ज्ञान वचन लक्ष्य देऊन ऐका ज्या ज्या संतांनी रिध्दी–सिध्दी धारण केली आहे.म्हणजे रिध्दी–सिध्दी पासून प्रगट झालेले परचे चमत्कारांना मानले आहे ते संत आजपर्यंत होणकाळाच्या पलिकडे कोणी ही उतरले नाही.होणकाळातच राहीले आहे.कारण रिध्दी सिध्दी दोघेही होणकाळापासून प्रगट झाल्या आहे.जी वस्तू ज्यापासून प्रगट झाली तेथे शेवटी सामावून जाते.त्याच्या पलिकडे जाऊ शकत नाही.याचप्रकारे होणकाळापासून प्रगट झालेली रिध्दी –सिध्दी होणकाळातच सामावते.ती होणकाळाच्या पलिकडे सतस्वरुपात जात नाही. म्हणून रिध्दी–सिध्दी धारण करणारे संत होणकाळाच्या पलिकडे जात नाही.होणकाळातच काळाचे दुःख भोगत पडलेले असतात.।।टेर।।

सतस्वरूप की सत्ता बिना रे ।। माया जाण न देवे ।।

चोसंट अंग अंत हे झीणा ।। जिऊं तिऊं कर गहे लेवे रे ।।१।।

होणकाळाच्या पलिकडे जायचे आहे तर सतस्वरुपाची सत्ता म्हणजे वैराग्य विज्ञान हवे.वैराग्य विज्ञानाच्या सत्ते शिवाय रिध्दी–सिध्दीपासून प्रगटणारे परचे चमत्कार मायेच्या सत्तेच्या पलिकडे म्हणजे होणकाळाच्या पलिकडे जाऊ देत नाहीत.या माया परचे चमत्काराची सत्ता पूर्ण होणकाळ ब्रम्हपर्यंत आहे.त्याचे बारीक–बारीक चौसष्ट स्वभाव आहे.अश्या ६४ स्वभावाचा उपयोग करुन साधकाला जसे–तसे करुन स्वतःच्या वश करुन होणकाळात ठेवून घेते.जसे घरात माता–पिता तसेच पत्नी वेगवेगळ्या सुखात गुंतवून जीवाला संन्याशी वेदी गुरु जवळ जाऊ देत नाही.तसेच्या तसेच माया जीवाला होणकाळ घरात ठेवते.वैरागी विज्ञान सतस्वरुप सतगुरुंच्या पदाला जाऊ देत नाही. ।।१।।

माया सुणो ब्रम्ह की दासी ।। ब्हो बिध हाजर होई ।।

सतस्वरूप मे जाय न सक्के ।। ना वो चावे कोई रे ।।२।।

माया ही होणकाळ ब्रम्हची दासी आहे.म्हणजे पत्नी आहे.ती जीवाला होणकाळाच्या घरातून काढून सतस्वरुपात जाऊ शकणार नाही म्हणून अनेक प्रकारच्या परचे चमत्कारांच्या सुखा मध्ये जीवाला अटकवून ठेवते.सतस्वरुपाच्या ज्ञानात होणकाळ त्यागेल असे होणकाळ ब्रम्ह आणि माया दोघे ही चाहत नाही.।।२।।

निरगुण भक्त करे जन कोई ।। ज्हां माया चल आवे ।।

कहियेक पकड़ करे बस जन कूं ।। काहियेक बस हूय जावे ।।३।।

कोणी हंस त्रिगुणी मायेची भक्ती सोडून निर्गुण होणकाळ पारब्रम्हची भक्ती करतात अश्या संतात परचे चमत्कार ही माया स्वत: चालून प्रगट होते.अश्या संतांना निर्गुणात स्थिर राहू न देता स्वत:च्या वशमध्ये करुन परचे चमत्कारात लावून देते.जे निर्गुणचे साधक परचे चमत्काराच्या वश होत नाही.त्यांच्या वशमध्ये होऊन जाते आणि जेंव्हा निर्गुणचा संत निर्गुणच्या संतांना घेरुन परचे चमत्कारात लावून देते ।।३।।

**के सुखराम सत्त कूं कोई ।। क्हो कुण फेरे भाई ।।**

**एसी भक्त हमारी संतो ।। कुण डेहेकावे आई रे ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व परचे चमत्कारात अडकलेल्या ज्ञानी,ध्यानी तसेच परचे चमत्काराने आकर्षित झालेले जगातील स्त्री-पुरुषांना सांगतात की जे सत्य आहे म्हणजे जे काल ही होते,आज की आहे आणि उद्या ही राहणार अश्या विज्ञान वैराग्याला हे परचे चमत्काराची माया फिरुन होणकाळात अटकवू शकत नाही. या कारणाने सतस्वरुप विज्ञान वैराग्यचे संत या परचे चमत्कारांच्या बहकाव्यात येत नाही.ती भक्ती माझ्याजवळ आहे.अश्या चमत्कारात लुटल्या जाणाऱ्या संतांना आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगत आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज या पदात बांदाला समजावतांना सर्व जगातील स्त्री-पुरुष,ज्ञानी,ध्यानींना हे समजावणे चाहतात की,(समजावू इच्छीतात)महादु:खातून निघायचे आहे तर परमपदाची प्राप्ती करायला हवी.जर आपल्याला परमपदात जायचे आहे तर सत्ताधारी सतगुरुची आवश्यकता आहे आणि तोच पराक्रम सत्ता त्या सतस्वरुप साईतून माझ्यात आली आहे परंतु हे जग मानत नाही.।।४।।

४७

।। पदराग शब्द ।।

**बांदा मो मे ओ गुण आयो ।।**

**कलब्रछ तळे जाय जिऊं बंछे ।। सोई सोई फळ वाँ पायो ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हरजी भाटीस सांगतात की,हे बांदा मी सतस्वरुप सतगुरुचा शरणा घेतला.जसे जगात अनेक वृक्ष आहे त्यात एक कुद्रती कल्पवृक्ष सुध्दा आहे.या कल्पवृक्षाच्या खाली जाऊ अशी कल्पना कराल तसेच्या तसे मायेचे फळ त्याला मिळेल.अशाप्रकारे मीही तुझ्या आणि जगाच्या लोकांसारखे होणकाळ पारब्रम्हातूनच मायेत आलो.मी माझे कुळ म्हणजे माया-ब्रम्हला त्यागले आणि कुद्रतचे सतगुरु वैराग्य विज्ञान धारण केले.यामुळे माझ्यात कल्पवृक्षासारखे कुद्रती अमरापुरला जाण्याचा गुण आला.।।टेर।।

**निजमन मान अंतर मे लेवे ।। सोई गुण प्रगटे आई ।।**

**दुबध्या माँहे बिकळतां ऊठे ।। सुख नही ऊपजे माही ।।१।।**

निजमन मानून म्हणजे हंसाच्या उरातून मानून हंस मला अंतरात म्हणजे ह्रदयात जसे धारण करेल तसा त्याच्यात गुण प्रगट होईल.जो हंस माझ्यात प्रगट झालेल्या अमरापुरला घेऊन जाण्याच्या गुणाच्या प्रति दुविधे मध्ये राहून म्हणजे विकल्पतेत राहून दूर राहील. त्याच्यात अमरापुरचे सुख उपजणार नाही.तो होणकाळाच्या दु:खात जसाच्या तसा राहील. दुविधामध्ये राहून दूर राहून गेला तर जसाच्या तसा राहून गेला.दुविधामध्ये उलटे दु:ख पडते.।।१।।

**निजमन माँह करारी बेठे ।। जाण अजाण्या काइ ।।**
**सोई गुण आण प्रगटे नर मे ।। कसर न रेहे भाई ।।२।।**

हंसाच्या निजमनात माझ्यात प्रगट झालेल्या त्या गुणाला जाणता किंवा न जाणता मला पक्के धारण करुन बसतो त्याच्यात तसाच गुण प्रगट होतो.त्यात काही कसर राहत नाही. ।।२।।

**जे नर झूट जाणसी मोने ।। से झूटी नर पावे ।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज पुढे सांगतात जे मनुष्य मला खोट जाणता म्हणजे अमरापुरला घेऊन न जाणारा समजून माझ्या शरणात येत नाही.त्याच्यात काळाच्या महादु:खातून निघण्याचा गुण प्रगट होत नाही तसेच जो मला अमरापुरला घेऊन जाणारा खरा समजून माझ्या शरणात येतो.त्याच्यात अमरापूराला जाण्याचा गुण प्रगट होतो आणि तो हंस अमरापुरला जातो ।।३।।

**निंद्या करे तिके नर निंदक ।। से नीचा फळ पासी ।।**
**म्हेमा करे तके नर जुग मे ।। सुण बेकुठा जासी ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जे हंस माझ्यात सतस्वरुपाची सत्ता प्रगट झाली हे न समजता निजमनाने पाखंडी समजतो त्याला नरकादिकाचे निच फल प्राप्त होते तसेच जो हंस माझ्यात सतस्वरुपी सत्ताधारी समजून माझ्या शरणात न येता फक्त महीमा करेल किंवा करतो.तर त्या हंसाला वैकुंठीचे उच्च फळ मिळेल किंवा मिळते आणि तो वैकुंठात जातो. ।।४।।

**निंद्या करे कहे कोई झूटा ।। कोई म्हेमा कर देवे ।।**
**निजमन रे खुंचा बिन योरे ।। अेकी फळ नहि लेवे ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,विना करारी निजमनाने कोणी हंस मला खरा सतस्वरुपी सत्ताधारी न समजता खोटा पाखंडी समजेल किंवा कोणी हंस विना निजमनाने मला खरा सतस्वरुपी सत्ताधारी समजेल असे दोन्ही प्रकारचे हंसाला निच किंवा उच्च असे एक ही फळ मिळणार नाही. ।।५।।

**रोळ भोळ मे कुछ ही केहे जावे ।। तां कूं दोस ना काई ।।**

काठी पकड करे नर काई ।। सोई ततकाळ फळ देखे भाई ।।६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात हसण्यात गंमत करण्यात किंवा गोष्टी–गोष्टीत किंवा भोळेपणात मुर्खता वश काहीही सांगून दिले किंवा मानून घेतले,तर त्याला काहीही दोष लागणार नाही.परंतु जे मनुष्य निजमनाने पक्के बनून काही करतील त्यांना लगेच फळ दिसून येईल.निजमनाने कोणी पक्का समजून चांगले करेल त्याला चांगले फळ दिसून येईल(मिळेल)तर कोणी पक्का समजून वाईट करेल तर वाईट फळ दिसून येईल(मिळेल.)।।६।।

के सुखराम सुणो सब भाई ।। भाव जिसो फळ हे जुग माई ।।७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बांदा तसेच जगातील सर्व बंधुंना सांगतात की,ज्या मनुष्याचा जसा भाव असेल तसेच त्या मनुष्याला फळ मिळेल.जसे कल्पवृक्षाखाली जाऊन उच्च कल्पना करेल तर मायेचे उच्च फळ मिळेल आणि निच(हलकी)कल्पना करेल तर मायेचे हलके फळ मिळेल.याप्रकारे मनुष्याच्या माझ्या प्रती अमरापुर पोहचण्याचा भाव राहील तर तो मनुष्य अमरापुर जाईल मनुष्याला अमरापुर न पोहचविणारे पाखंडी किंवा ढोंगीचा भाव राहील तर त्याला काळाच्या मुखात राहण्याचे निच फळ मिळेल. ।।७।।

५५

।। पदराग शब्द ।।

बांदा ओ नर मोहे न जाणे जी ।।

आगे बस्त ना देखी किसने ।। काना सुणी बखाणे ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज हरजी भाटीस म्हणाले की हे जगाचे नर नारी मी सतस्वरुप आहे असे जाणत नाही.हे मला माझ्या चालण्या–उठण्यावरुन आपल्यासारखे मनुष्यच समजतात.जगातील ह्या नर नारीनी प्रत्यक्ष सतस्वरुपी संताना कधी पाहीले नाही परंतु ज्यांनी स्वत: कधी प्रत्यक्ष पाहीले नाही अशा ज्ञान्याच्या मुखातून डिंगल पिंगल भाषेत सतस्वरुपी संत कसे असतात याचे ज्ञान ऐकले.म्हणुन जगाच्या नर नारीनां अस्सल सतस्वरुपी संत कसे असतात हे समजत नाही म्हणुन हे जगाचे नर नारी मला जाणत नाही. ।।टेर।।

जड़ी सजीवण लाताँ खूंदे ।। खोद कोई नही लावे ।।

युं बिन भेदी मोसूं कर बाताँ ।। खाली ऊट नर जावे ।।१।।

संजीवनी बुटी जंगलात असते.ती मुर्द्याला जिवंत करते.ती बुटी वरुन वरुन अन्य वनस्पती सारखीच दिसते ह्या संजीवनी बुटीची परिक्षा करणे माहीत नसल्यामुळे जगातील मंडळी पायाखाली तुडवितात.खणुन कोणी घरी आणत नाही असेच सतस्वरुपाची ओळख करता येत नसल्यामुळे माझ्या कडुन सतस्वरुपाचे ज्ञान ऐकतात.त्यांना ज्ञान आवडते

परंतु मी सतस्वरुपी संत आहे हे त्यांच्या लक्षात येत नाही म्हणून माझ्याकडुन घटात सतस्वरुप प्रगट न करुन घेता जसे रिकामे आले होते तस तसे रिकामेच राहून उठून चालले जातात.।।१।।

**पारस लेह भीत में चुण दे ।। मिण कूं गेहे ले फोडे ।।**
**यूं बुध हीणा जक्त मे ग्यानी ।। मो सें नेह न जोडे रे ।।२।।**

पारसमणी हा पहाडात दगडामध्ये असतो.त्याचे लोखंडाला स्पर्श होताच ते लोखंड सोने होऊन जाते.हा पारसमणी बाह्यरुपाने अन्य दगडासारखा दगड दिसतो.ह्या पारसमणीची परिक्षा करणे माहित नसल्यामुळे जगातील मंडळी घर बांधताना भिंतीत दगड म्हणून वापरुन घेतात किंवा फोडुन सिंमेट सारखा चुरा करुन टाकतात.असेच सतस्वरुपाची बुध्दी नसलेले ज्ञानी मला जगासारखा मनुष्य समजुन माझ्याशी सतस्वरुप प्राप्त करण्या करीता स्नेह जोडत नाही.।।२।।

**जिऊं मूरख चित्रावण पावे ।। ले कवुवा सिर बावे ।।**
**यूं मद भाग्याँ मोकूं फेंक्यो ।। नेडो कोई हन आवे रे ।।३।।**

मुर्ख,बुध्दीहीन माणसाला चिंतामणी मिळतो.हा चिंतामणी मनात आलेली प्रत्येक चाहणा, चिंतन पुर्ण करतो.हा चिंतामणी बाह्यरुपाने अन्य दगडासारखाच दिसतो ह्या चिंतामणीची मुर्ख लोकास परिक्षा येत नसल्यामुळे हे मुर्ख लोक ह्याचा उपयोग अन्य दगडासारखा करतात.असाच हा चिंतामणी एका मुर्ख माणसाला मिळाला होता तो चिंतामणीच्या गुणास जाणत नव्हता.परंतु त्यांच्या हातात चिंतामणी असल्यामुळे जसे चिंतन करत होता तसे होऊन जात होते.(या मुर्खाच्या हातात चिंतामणी होता व रस्त्यात चालता चालता याला भुक लागली, याने मनात चिंतन केले,काही खाण्यास मिळेल तर चांगले होईल,असे चिंतन केल्याबरोबर तेथे मिठाईचे ताट उत्पन्न झाले.ती मिठाई खाऊन याने चिंतन केले.खाण्यास तर मिळेल परंतू पाणी पाहिजे.असे चिंतन केल्याबरोबर स्वच्छ,निर्मळ, थंड पिण्यासारखे पाणी उत्पन्न झाले.ह्या मुर्खास पाणी पिल्यावर सावलीत बसण्याचे मनात येऊन चिंतन केले.येथे सावलीत बसण्याकरीता मकान असता तर,सावलीत बसलो असतो.येथे मकान पाहिजे,असे चिंतन केल्याबरोबर हवेली(महाल)तयार होऊन गेला.त्या मकानात बसून निजण्याची इच्छा केली,की पलंग व नोकर,चाकर,दास,दासी असते तर सर्व उपभोग घेत असतो तर हे झाले पाहीजे,असे म्हटल्याबरोबर पलंग वगैरे बायका,दास,दासी,नोकर,चाकर सर्व होऊन गेले व हा चिंतामणी आपल्या हातात उडवीत होता व आपल्या हातात घेत होता.अशा चिंतामणीस खडा समजून खोळ करीत होता.इकडे इंद्रास चिंता पडली की या मुर्खाच्या हातात चिंतामणी आहे तो या चिंतामणीच्या गुणास समजून माझे(इंद्राचे)राज्य मिळण्याची इच्छा केली,तर हा इंद्र

होऊन जाईल व मला इंद्रपदावरुन उतरावे लागेल.असा विचार करुन इंद्र डोमकावळा बनुन याच्या महालात आला व इकडे तिकडे उड्या मारीत फिरु लागला व कर्कश शब्दाने बोलू लागला.तेंव्हा या मुर्खास राग येऊन त्या कावळ्यास उडविण्याकरीता हातातील चिंतामणी कावळ्याकडे फेकून दिला तो चिंतामणी कावळा बनुन आलेला इंद्र घेऊन गेला.)ह्याच तऱ्हेने हे भाग्यहिन ज्ञानी मला साधारण मनुष्यासारखे मनुष्य समजतात हे मला सतस्वरुपी संत आहे म्हणून समजत नाही.मी सर्वांचा आवागमन मिटवू शकतो व अनंत सुख देऊ शकतो हे मुर्ख ज्ञान्यानां समजत नाही म्हणून हे मुर्ख लोक मला मनुष्या सारखे समजुन आपल्या पासुन दुर ठेवतात कोणीही आवागमन मिटविण्याकरिता माझ्या जवळ येत नाही. ।।३।।

**के सुखराम सुणो नर नारी ।। यो मेरो अंग होई ।।**
**ज्युँ चिंत्रावण मे गुण प्रगटे ।। निजमन माने सोई ।।४।।**


आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व नर नारीनां मी कोण आहे कसा आहे हे समजण्यास सांगतात.जसे चिंतामणी चिंतन करण्याऱ्या प्राण्यांची सर्व चिंता मुक्त करतात त्याचप्रमाणे मी मला निजमनाने मानल्यास मी सर्वांची जालीम काळाच्या दुःखातुन मुक्त होऊन अखंडीत अनंत सुखामध्ये जाण्याची चिंता मुक्त करतो.।।४।।

५७


।। पदराग शब्द ।।

**बांदा ओर सकळ पिस्तासी ।।**
**मेरी सरण हंस जे आवे ।। से आणंद पद पासी ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील सर्व ज्ञानी,ध्यानी,स्त्री–पुरुषांना बांदा म्हणजे हरजी भाटीला समोर ठेवून जागृत करीत आहे की,अरे बांदा माझ्या शरणात जे हंस येतील तेच महासुखाचे आनंदपद प्राप्त करतील.इतर सर्व हंस काळाच्या मुखात




जसे आता आहे तसे पुढेही राहतील आणि ४३,२०,००० वर्षापर्यत ८४,००००० योनी मध्ये महासुखाच्या आनंदपदात न पोहचल्या कारणाने पल–पल(क्षणोक्षणी)पस्तावा करत महादुःख भोगतील. आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी माझ्या शरणात हा शब्द पदात सांगीतला आहे.त्याकरीता प्रथम माझा शरणा म्हणजे काय ते समजू.





सृष्टीत आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील अन्य लोकांसारखे हंस रुपात तसेच देहरुपात आहे. म्हणजे आदि सतगुरु सुखरामजी महाराज तसेच सर्व जगाचे मनुष्य हंस आणि देहरुपात सारखे आहे.याचा


।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

अर्थ आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी हंसरुप किंवा देहरुपाने माझा शरण हा शब्द नाही सांगितला.


जसे जगातील अन्य लोक आणि आदि सतगुरु सुखरामजी महाराजांमध्ये हंसरुप तसेच देहरुप हे सारखेपण आहे.तसे सारखेपण आदि सतगुरु सुखरामजी महाराजा मध्ये सतस्वरुप आहे.तो काळाच्या पलिकडे आहे.ते सर्व जगाच्या लोगांमध्ये सारखेपणा नाही. इतर सर्व जगातील लोकांमध्ये कर्माच्या रुपात त्रिगुणी माया आहे.जी काळाच्या मुखात आहे हा फरक आहे.

आदि सतगुरु सुखरामजी महाराज तसेच सर्व जगाचे ने:अक्षरी हंस सतस्वरुपी कसे आहेत आणि ने:अक्षरी सोडून इतर सर्व हंस काळाच्या मुखातील माया कसे आहेत?हे समजू.




अ व ब असे दोन हंस आहेत. त्यांचा दोघांचा पिंड खंड–ब्रम्हंड्चा बनला आहे.






अ च्या हंसासोबत ५ आत्मा आणि मन आहे.तसेच संचित कर्म,प्रारब्ध कर्म अ मध्ये





ने: अक्षर प्रगट झाल्याने अ चे शरीर खंड–ब्रम्हंड बनले.अ चा हंस कंठात आहे. हा ने:अक्षर अ चे हंस कंठ कमल मधून हृदय कमल मधून नाभी कमलात घेवून जातो.नाभी कमलात

अ च्या हंसाच्या सोबतचे ९ आत्मा ही माया काढते.





पुढे असे नऊ स्थानापर्यत हंसाला घेऊन चालतो अणि नव्या स्थानात म्हणजे त्रिगुटीत मन मायेला हंसापासून वेगळे करतात.




पुढे १० वे, ११ वे, १२ वे स्थानावर ने:अक्षर हंसाला घेऊन जातो आणि तेथे हंसाला चिकटलेली संचित कर्माची माया भस्म करता आणि पुर्ण घटात स्वयम् ने:अक्षर प्रगट होवून जातो.





म्हणजेच मनुष्याचे सतस्वरुपी संत म्हणजे कोरा होणकाळ मायारहित सतस्वरुप

मनुष्य ब – सतगुरुचा शरणा घेतला नाही.त्याचे मन,५ आत्मा तसेच संचित कर्म ही माया जशीच्या तशीच बनून राहीली.

म्हणजेच मनुष्याच्या सतस्वरुपी संत म्हणजे कोरा होणकाळ मायारहीत सतस्वरुप

मनुष्य ब सतगुरुचा शरणा घेतला नाही त्यामुळे त्याचे मन, ५ आत्मा तसेच संचित कर्म ही माया जशीच्या तशीच बनून राहीली. ।।टेर ।।





।।टेर।।

**अब तो सकळ करत हे हांसी ।। नवी बात आ काँई ।।**
**माया बेद भ्रम में भूला ।। सत्त पिछाणी नाही ।।१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की जेंव्हा मी काळाच्या पलिकडील आनंदपदाचे ज्ञान सांगतो तर जगातील सर्व स्त्री–पुरुष,ज्ञानी,ध्यानी माझी हशी उडवितात,निंदा करतात,थट्टा मस्करी,टिंगल मजाक करतात आणि जगात हास्य


 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

रुपात चर्चा करतात की आजपर्यंत पिढ्यान् पिढ्या पासून चालत आलेले ज्ञान सोडून निराळ्या गोष्टीत जगाला का भरमावून राहीले.अश्या गोष्टी करतात.





आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की त्रिगुणी माया तसेच त्यापासून निर्माण झालेले वेद,शास्त्र,पुराण जे काल ही असत्य होते,आज ही असत्य आहे आणि उद्या ही असत्य राहतील आणि कोणती अशी वेळ नव्हती ते सत्य होते.अश्या असत्य उलझन कारणाने जगातील हंसांनी असत्य मायेला सत्य पकडून घेतले आणि जे काल ही सत्य होते आजही सत्य आहे आणि उद्या ही सत्य राहील त्याला ओळखणे विसरुन गेले. ।।१।।

**सत्त सत्त कहो तिको सत्त ओ हे ।। ने: अंछर सो ओई ।।**
**कुद्रत कळा कहे सो आ हे ।। सुणो सरब नर लोई ।।२।।**




जग सत सत्त म्हणते म्हणजे काल ही सत्य होते,आज ही सत्य आहे आणि उद्या ही सत्य राहील असे सत्य आहे.त्याच्या शरणात गेला तर आनंदपद म्हणजे काळाच्या दु:खातून मुक्त होतात असे सर्व ज्ञानी,ध्यानी सांगतात आणि नाशवान त्रिगुणी माया(जी होणकाळाच्या आधाराने जीवंत दिसते.) जसे शरीर मृतक आहे परंतु हंसाच्या आधाराने चालतो,फिरतो,उठतो,बसतो,अशी जीवंत दिसतो.तसेच त्याला जीवंत पाहून त्यालाच सत्त सत्त समजून भ्रमात पडतात आणि काळाच्या मुखात राहतात.




आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात जे जगत सत्त सत्त म्हणतात ते रजोगुण,सतोगुण,तमोगुण ही त्रिगुणी माया नाही.ती मी जे सांगतो मी ने:अक्षर आहे. ज्याला जगत हसून(हशी करुन)नवी गोष्ट आहे म्हणून संबोधतात.

मी जे सांगून राहीलो ते ने:अक्षर म्हणजे मुखाने न येणारे,कानाने ऐकू न येणारी महासुखाची अखंडीत ध्वनि आहे.ही अखंडीत ध्वनि कुद्रती आहे.त्रिगुणी माये सारखी कृत्रिम रुपाने होणकाळाच्या चेतन आधाराने चेतली नाही.त्या कुद्रती ध्वनिच्या कलेने ही सारी सृष्टी चालत आहे आणि ही ध्वनि हंसाला काळापासून मुक्त करते आणि महासुखाच्या देशात पोहचविते हे सर्व जगाचे स्त्री-पुरुष, ज्ञानी,ध्यानी निरखून पारखून समजून घ्या. ।।२।।

**के सुखराम ताण में केहूं ।। प्रमारथ के ताँई ।।**
**सतस्वरूप की अग्या मोने ।। हंस तारूं जुग माँई ।।३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व(नर-नारी)स्त्री-पुरुषांना,ज्ञानी,ध्यानींना सांगतात

की,मला सतस्वरुपने काळाच्या मुखातून सर्व हंसांना आनंदपदात पोहचविण्याची आज्ञा देऊन मृत्युलोकात(काळाचा संवाद)पाठविले आहे.काळाच्या मुखातून निघण्याचा परमारथ प्रत्येक जीवाने आपल्या जीवावर करावा याकरीता मी सतस्वरुपाच्या आज्ञेने ताणून म्हणजे बजाऊन बजाऊन जगातील सर्व हंसांना ने:अक्षराची विधी दाखवित आहे आणि सतस्वरुपाच्या आज्ञेनुसार सतस्वरुपाची विधी हंसाला देऊन हंसाला जगातून म्हणजे होणकाळातून तारतो. ।।३।।

२६३

।। पदराग सोरठ ।।

**पांडे मै च्यार बरण सुं न्यारा**

**मो कूं लखे को बिरळो जुग मे ।। बोत बसे सेंसारा ।।टेर।।**

अरे पंडित,तुम्ही ब्राम्हण कोणत्या विधीने म्हणविता(बाजूने)ब्राम्हण,क्षत्रिय,वैश्य व शुद्र या चार वर्णाच्या स्त्री–पुरुषांचे नख सारखे आहेत,डोळे सारखे आहेत,कंठ सारखा आहे. कंठातून निघणारा राग सारखा आहे.तर मग चारी वर्णात तुम्हाला शुद्र न म्हणविता ब्राम्हण याचे काय कारण?।।टेर ।।

**बामण वैश नही मै छत्री ।। ना मै सुद्र कहाया ।।**

**तीन लोक तेरे कुळ बारे ।। सो अवस मे भाया ।।१।।**

स्वामी कोणत्या विधीने म्हणविले?जंगम,जोगी कोणत्या विधीने म्हणविले,सहा दर्शन कोणत्या विधीने बनले?चार वर्ण वेगवेगळे कोणत्या विचाराने बनले?त्यागी कसे बनले व भोगी कसे बनले?सर्वात ब्रम्ह तर एक सारखा आहे तर हे वेगवेगळे कसे बनले? ।।१।।

**छ: दरसण छतीसु पाखंड ।। अे सब हद के मांही ।।**

**भेष बणाय फिरे बेरागी ।। मै इनही मे नाही ।।२।।**

राजा कसा झाला,राव कसा झाला व संसारात बादशहा कसा झाला व वेगवेगळे पुजा पाठ कसे बांधले गेले.सर्वात एकच ब्रम्ह आहे.तरी एक मनुष्य एकाची पुजा करतो व एक पुजवितो.सर्वात एकच ब्रम्ह आहे.असे राहील्याने हे कसे बांधल्या गेले.सर्वात एकच ब्रम्ह आहे तर उच निच कसे झाले?स्त्री–पुरुष वेगवेगळे कसे झाले?सर्वात एक सारखा ब्रम्ह आहे तर ब्रम्हला काळाने कोणत्या विधीने खाल्ले ? ।।२।।

**हिंदु तुरक पखा मिल दोई ।। या सम बास न मेरा ।।**

**जन सुखराम मोख मे जाणुं ।। गिगन मंडळ सिर डेरा ।।३।।**

सर्व कुळात ज्या मार्गाने जन्म होतो तो मार्ग सर्वाचा एक आहे व तो मार्ग क्षुद्र आहे. आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की याप्रकारे जन्मण्याच्या मार्गाच्या कारणाने सर्व क्षुद्र आहे कोणी ब्राम्हण नाही.ब्राम्हण तर सतस्वरुप ब्रम्हज्ञान जाणेत तर ब्राम्हण

म्हणवेल(बाजोंगे).।।३।।

१३३
।। पद राग धुन ।।

### ।। गुरू महिमा यूं किजे हो ।।

**गुरू मेहमा युं कीज्यो हो ।। तन धन मन यो दीज्यो हो ।।टेर।।**

(सतगुरुला वंदन,स्वागत करुन,त्यांचा पायाखाली नव्या कपड्याचे थान चालण्याकरीता अंथरुण,त्यांचासमोर जाऊन अभीनंदन करुन,आपल्या घरी आणण्याची रीत),सतगुरुची महीमा या तऱ्हेने करा,सतगुरुला तन,मन व धन सर्व द्या. ।।टेर।।

**प्रथम जाय अराधे हो ।। वां पूजा बिध साधे हो ।।१।।**

सर्व प्रथम सतगुरुच्या येथे जाऊन त्यांची(आपल्या घरी आणण्याकरीता)आराधना करा, तेथे त्यांच्या(सतगुरुच्या),घरीच पुजेची विधी साधा. ।।१।।

**वां सुं गजी बिछाई हो ।। पेंड पांच दस तांई हो ।।२।।**

तेथून(सतगुरुच्या घरुन)पाच दहा पावलापर्यंत,कपड्याचा नवीन थान,सतगुरुला (गाडीत येऊन बसेंपर्यंत)पायघड्या घालावी.(सतगुरु येण्याकरीता नवीन कपड्याचे थान अंथरतात त्याला पायघड्या घालावी म्हणतात.) ।।२।।

**सत्तगुर फिळसे आवे हो ।। सामा जाय बधावे हो ।।३।।**

मग सतगुरु गावाच्या बाहेर(गावाच्या प्रवेशद्वाराच्या बाहेर,गावाचे प्रवेशद्वार नसेल,तर गावाच्या बाहेरचे मंदिर किंवा मंदिर ही नसल्यावर कोणत्याही झाडाखाली),आल्यावर( येथून आपल्या घराकरीता त्यांची)अगवाणीत येऊन(गावाच्या बाहेर)उत्सव करा. ।।३।।

**ढोल निसाण नगारा हो ।। नर नारी सब लारा हो ।।४।।**

सोबत ढोल,निशाण,नगाडे घेऊन घ्या आणि स्त्री पुरुष सर्व सोबत घेऊन(सतगुरुची अगवानी करायला जा.) ।।४।।

**गुर सामा पग दीजे हो ।। किनक डंडोताँ कीजे हो ।।५।।**

गुरुच्या समोर पाय देते वेळी कनक दंडवत(गुरुच्या पुढे अगवानीत जाते वेळी)गुरु समोर गुड्घ्याच्या बळावर दंडासारखे लंबे पडून दंडवत करा.) ।।५।।

**वहाँ प्रेम ब्रेह उठ आवे हो ।। असो प्रेम बधावे हो ।।६।।**

(आणि तेथे गेल्यावर सतगुरु भेटल्यावर)प्रेमाश्रु आणून विरह आणा,अशा प्रेमाने त्यांचा बधावा करा.(त्यांची अगवाणी करुन आणा.) ।।६।।

**जायर चरण छिवीजे हो ।। प्रदिखणा भल दीजे हो ।।७।।**

गुरुच्या समोर जाऊन गुरुचे चरण स्पर्श करा आणि तेथे भली(चांगली)प्रदक्षिणा द्या. ।।७।।

**तिलक सीस पर कीजे हो ।। यूं जन पूज बिचारा हो ।।८।।**

गुरुच्या मस्तकावर टिळा लावा आणि त्यांच्याकडुन आज्ञा घ्या.(होऊ शकेल तर) सोन्याचे ताट असले पाहिजे,(सोन्याचे नसल्यावर चांदीचे असले पाहिजे,चांदीचे नाही मिळाल्यावर जे मिळेल त्या ताटात)रत्न वगैरे द्रव्य(जे मिळेल ते)आणा आणि तेथे त्या जनांची(गुरुची) पुजा करा. ।।८।।

**महा प्रसाद बटीजे हो ।। च्रणा मृत चित्त लीजे हो ।।९।।**

तेथे महाप्रसाद वाटा आणि तेथे त्यांचे चरणामृत,तेथे(प्रत्यक्ष न घेता)चित्तानेच चरणामृत घ्या. ।।९।।

**हरिजस हरि गुण गावे हो ।। यूँ गुर कुँ घर लावे हो ।।१०।।**

तेथून घरी आणते वेळी रस्त्यात,हरीयश(हरी गुणाचे)पद बोला,या तऱ्हेने गुरुला घरी आणा. ।।१०।।

**गजी बासती ल्यावे हो ।। ऊभी गळी बिछावे हो ।।११।।**

नवा कपडा आणा आणि तो कपडा सरळ रस्त्याने अंथरत(त्यावर गुरुला चालवत घरी आणा.)।।११।।

**द्वार घरा लग आवे हो ।। जाजम फेर बिछाई ये हो ।।१२।।**

(मग जेंव्हा गुरु)घरच्या दरवाजापर्यंत येऊन गेले,तर तेथे जाजम अंथरावा. ।।१२।।

**तां पर पिलंग ढळीजे हो ।। वाँ पूजा फिर कीजे हो ।।१३।।**

त्या जाजम वर पलंग टाकावा आणि तेथे पुन्हा आणखी ही पुजा करा. ।।१३।।

**पेफ फूल ले आवे हो ।। गुराँ की सोड़ बिछावे हो ।।१४।।**

पुष्प(फुल)आणा आणि त्या पलंगावर अंथरा. ।।१४।।

**गुराँ कुं सोभा सोवे हो ।। तीन लोक मे होवे हो ।।१५।।**

गुरुची(जितकी शोभा केली पाहिजे तितकी)सर्व शोभा सुशोभीत होते,गुरुची शोभा त्रिलोकीत होत राहते. ।।१५।।

**अगर आरती कीजे हो ।। चरण खोळ वाँ पीजे हो ।।१६।।**

तेथे अगरबत्ती लावा आणि तेथे त्यांचे चरण धुवून त्यांचा चरणोदक प्राशन करा. ।।१६।।

**वेद भागवत गावे हो ।। सत्तगुर सम नहि क्कावे हो ।।१७।।**

वेद व भागवत सर्व सांगतात की,सतगुरुच्या बरोबरीचा कोणालाही सतस्वरुप रामजीलाही म्हणता येत नाही. ।।१७।।

**गुर मेहमा ज्याँ कीनी हो ।। ज्यां सेज मुक्त कुं लीनी हो ।।१८।।**

ज्यांनी(या तऱ्हेने)गुरुची महिमा केली आहे,त्यांनी मुक्ति तर सहजात प्राप्त केली आहे.।।१८।।

सुखदेव कहे ध्रक सोई हो ।। गुर भक्ता धिन्न होई हो ।।१९।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,बाकी जे गुरु भक्त नाही त्या सर्वांना धिक्कार आहे,जे गुरु भक्त आहे,ते धन्य आहे. ।।१९।।

२४१

।। पदराग बधावा ।।

म्हारे पावणा परम गुरू आज

म्हारे पावणा परम गुरू आज ।। संयाँ आवो अे ।।

म्हारे आया अे हरि का जन आज ।। संयाँ आवो अे ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,माझ्या येथे पाहुणे म्हणून माझे परम गुरु आले आहे.माझे परमगुरु हे हरीचे जन(संत)आहे.याकरीता माझ्या सर्व सख्या तुम्ही माझ्या घरी या आपण सर्व त्यांचे स्वागत करु. ।।टेर।।

आवो अे गावो संय्याँ ।। अणंद बधावा ।।

म्हारे आंगणिये अे साधाँरो समाज ।। संयाँ आवो अे ।।१।।

परमगुरुंच्या प्रित्यर्थ आनंद बधावा गाऊ माझ्या अंगणात साधुंचा समाज आला आहे. म्हणून सर्व माझ्या सख्यांनो माझ्या अंगणात या.।।१।।

कथा अे प्रसंग हिल मिल ।। हरि गुण गास्याँ ।।

म्हारे मेहेर करी हे महाराज ।। संयाँ आवो अे ।।२।।

माझे परमगुरु कथा प्रसंग सांगतील व तेंव्हा आम्ही सर्व सख्या(मैत्रिणी)हिळून मिळून (सर्व मिळून)परमगुरु सोबत हरीचे गुण गाणार.याप्रकारे माझ्यावर गुरु महाराजांची मेहेर(कृपा)केली आहे.तर सख्यांनो या. ।।२।।

किणी अेक सुक्रत संयाँ ।। सतगुरजी मीलिया ।।

कोई किणी अे मानव तन साज ।। संयाँ आवो अे ।।३।।

हे माझ्या काही भारी सुकृतामुळे मला सतगुरुजी मिळाले व सोबत मनुष्य तनाची साथ मिळाली.।।३।।

ओ मानव तन ।। ब्रम्हा दिक बंछे ।।

कोई राम सिंवर किज्यो काज ।। संयाँ आवो अे ।।४।।

ह्या मानव तनाचा साज ब्रम्हा,विष्णू,महादेव हे देव चाहणा करतात तरीही त्यांना हे मानव तन मिळत नाही व हे मानव तन आम्हांला मिळाले आहे म्हणून या मनुष्य देहाने आम्ही सर्वांनी रामजीचे भजन करुन भवसागर पार करण्याचे काम करुन घ्यायला हवे. ।।४।।

सोना रो सूरज म्हारे ।। इण पुल ऊगो ।।

म्हारे घर बेठाँ गंगा आई आज ।। संयाँ आवो अे ।।५।।

माझे सतगुरु घरी आले हा क्षण माझ्या करीता सोन्याचा सुर्य उगवल्या सारखा आहे. तसेच गंगा घरी बसून आली आहे असा आहे. ।।५।।

**लख चोरासी संयाँ ।। दु:खडारी फासी ।।**
**कोई हूवे अे बोत अकाज ।। संयाँ आवो अे ।।६।।**

माझ्या सर्व सख्यांनो ऐका,चौऱ्यांशी लक्ष्य योनीत पडणे ही फार भारी दु:खाची फासी आहे.त्या योनींमध्ये जीवाचे फार अकाज होते. ।।६।।

**इण भवसागर म्हारा ।। सतगुरूजी तारे ।।**
**कोई आपरा बिड़द की लाज ।। संयाँ आवो अे ।।७।।**

या भवसागरातून माझे सतगुरु मला तारतील.त्यांचे बिड्दचा शिष्यांना तारण्याचे आहे यामुळेच आम्हां सर्वांना माझे सतगुरु तारतील.।।७।।

**सुखदेव सुख मे म्हारो ।। मन वो जी झूले ।।**
**म्हारे साध सदाई सिरताज ।। संयाँ आवो अे ।।८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सतगुरुंच्या सतज्ञानाच्या सुखामध्ये माझे मन रमून राहीले आहे.हे माझे सर्व संत नेहमीच माझ्या शिराचे मुकूट राहीले आहे. ।।८।।

१०८

।। पदराग चरचरी ।।

**धिन्न गुरू ग्यान जो साध ईण जुग मे**

**धिन्न गुरू ग्यान जो साध ईण जुग मे ।। अनंत ही जीव कूं आण तारे ।।**
**मेरे ही ऊर मन अेसी ही आवे ।। जुगन जुगन रूँला रे ।।टेर।।**

धन्य आहेत ते गुरु,धन्य आहेत ते साधु व धन्य आहे त्यांचे ज्ञान या गुरु व संतांनी युगायुगांपासून अनंत जीव भवसागरातून तारले.माझ्या हृदयात असे वाटते की मी नेहमी त्यांच्या सोबत राहु त्यांच्यापासून दूर जाऊ नये. ।।टेर ।।

**भ्रम तो बोहोत जंजाळ ब्हो घट मे ।। जगत के संगमाँ जाऊँ बूवो ।।**
**किरपाल दयाल मुज आण कर काडीयो ।। भव ही सिंध ते कियो जूवो ।।१।।**

माझ्या घटात भ्रमांचे खुप जंजाळ होते.मी होणकाळाच्या विषय विकारांसोबत वाहत जात होतो.कृपाळू गुरुदेवांनी,दयाळु गुरुदेवांनी माझ्यावर दया करुन मला भवसागरातून वेगळे करुन दिले.।।१।।

**ग्यान तत्त काल मुज आण अेसो दियो ।। अडद ही नांव को भेव आणी ।।**
**जीव उत्पत्त अे आद गुण उपना ।। तीन तिर्लोक सिर गत्त जाणी ।।२।।**

मला तत्काळ वेळ न लावता भवसागरातून तारणारे आर्धा शब्द ररंकारचा भेद दिला या अर्धनावाने जीवाची उत्पत्ती,ब्रम्हा,विष्णू,महादेव या गुणांची उत्पत्ती आणि मृत्यु,स्वर्ग, पाताळ या तीन लोकांची उत्पत्तीचा मर्म मी समजून गेलो.।।२।।

**काळ का मुख सूं आण मुज काढीयो ।। ग्रभही जुण की भ्रांत खोई ।।**

**केत सुखदेव भुः सुरग पाताळ मे ।। नाव गुरू देव सम नाँय कोई ।।३।।**

काळाच्या मुखातून मला काढून गर्भात येऊन चौऱ्यांशी लाख प्रकारच्या योनी धारण करुन दुःख भोगण्याची शंका मिटून गेली.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,भुलोक,स्वर्गलोक व पाताळात गुरुदेवांसारखे ब्रम्हा,विष्णू,महादेव,अवतार इ.कोणीही नाही. ।।३।।

११४

।। पदराग धनाश्री ।।

**दोय बिधि संत पिछाणे रे**

**दोय बिधि संत पिछाणे रे ।। मिथ्या कुछ नेक न जाणो रे ।।**

**इसी उर अंतर ल्यावो रे ।। पाँचा मांहि साहिब पावोरे ।।टेर।।**

सर्व देह हरीच्या आत आहे व सर्व देहात हर आहे.या दोन विधीने संत ओळखा.अन्य विध्या ओळखण्यासाठी खोट्या आहेत.त्याला लेशमात्र ही जागू नका.तसेच सुख प्राप्त करण्यासाठी पारब्रम्ह प्रगट करणे खोटे आहे.त्याला थोडेही शोधू नका.संत ओळखण्याच्या दोन्ही पाच तत्वाच्या विध्या अंतरात लावा.तेंव्हा जसे संताला देहात हर प्राप्त झाला तसे आपल्या ही पाँच तत्वाच्या घटात हर प्राप्त होईल. ।।टेर।।

**गेबी प्रगट पाँच हे रे ।। अेबी अेभी जाण ।।**

**गेबी अेभी बीच मेरे ।। निज तत्त पकड़ो आण ।।१।।**

जसे गेबी म्हणजे परमात्मा पाच तत्वाच्या देहात प्रगट आहे.तसे काळाच्या मुखात टाकणारी माया ही हंसाच्या पाच तत्वाच्या घटात प्रगट आहे.गेबी आणि अेबी म्हणजे विषय विकारांचे सतज्ञानाने विचार करुन महासुख देणारे निज तत्त पाच तत्वाच्या देहात पकडा.।।१।।

**ब्रम्ह का ब्रम्ह सूं सुख लहोरे ।। तत्त तत्त सूं जोय ।।**

**पाचुँ हर के माँय हेरे ।। पाचाँ मे हर होय ।।२।।**

सतस्वरुप ब्रम्हचा जीव ब्रम्हपासून घटात ओळखा व सर्व पाच तत्वाचे देह हरच्या आत आहे व तो हर पाच तत्वाच्या देहात आहे. ।।२।।

**पाँचा सूं सुख ऊपजे रे ।। पांचाँ सुंई दुःख होय ।।**

**छटाँ ज्याँ सुखराम केहे रे ।। सुख दुख अेक न कोय ।।३।।**

ह्या पाच तत्वाच्या देहानेच हर प्राप्त केला तर सुख उपजते व हा पाच तत्वाचा देह

पाच विषय वासनेत लावला तर काळाचे दु:ख उपजते.सतस्वरुप ब्रम्हचे जीवब्रम्हपासून घटात सुख घ्या.सहावा जो पारब्रम्ह होणकाळ आहे.ज्याला जाणूनही सुख ही उपजत नाही व दु:ख ही पड्त नाही.असा पारब्रम्ह प्राप्त करण्यासाठी खोटा आहे.त्याला शोधू नका.।।३।।

१२४

।। पदराग सोरठ ।।

**गळतान मता कब आवेगा**

**जब प्राणी बोहो सुख पावेगा ।। सब संत मता कब आवेगा ।।टेर।।**

परात्परी पासून दोन पद आहेत.एक सतस्वरुपाचे वैराग्य पद व दुसरे मायेचे पद होणकाळ पारब्रम्हपद युगानुयुगापासून हंस पारब्रम्हच्या मायापदात आहे.जो पर्यंत हंसात त्रिगुणी मायेचे बळ राहते तोपर्यंत त्या हंसात मायेचे मगरुर मत राहते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज गलतान मत केंव्हा येईल म्हणजे साहेब न प्राप्त करु शकणाऱ्या मायेचे मगरुरी मत केंव्हा जाईल.याचा विचार करतात.जोपर्यंत प्राण्याला मायेचे मत आहे.तोपर्यंत प्राणी आवागमनाचे दु:ख भोगतो.जेंव्हा प्राण्यात माया मत निघून सतस्वरुप संतमत येते तेंव्हा प्राणी आवागमनाच्या महादु:खातून मुक्त होतो व सतस्वरुप वैराग्याचे खुप सुख प्राप्त करतो.।।टेर।।

**तोटा लावा सुख दु:ख मेहेमा ।। निंद्या सुण मुरझावेगा ।।१।।**

जोपर्यंत प्राण्याचे माया मत आहे.म्हणजे प्राण्याच्या मन व पाच आत्म्यांचा त्रिगुणी मायेच्या सुखाची चाहणा आहे.तोपर्यंत प्राण्याचा तोटा,दु:ख,निंदा होते.तर त्याचा जीव नाराज होतो व नफा,सुख,महीमा होते तर त्याचा जीव फुलतो(आनंदी होतो)जेंव्हा प्राण्याला संतमत येते म्हणजेच मायेच्या मताचा गलतानपणा येतो.तेंव्हा प्राण्याला तोटा, दु:ख,निंदेने त्याचा जीव नाराज होत नाही व नफा,सुख,महिमेने त्याचा प्राण फुलत नाही असे त्याचे मत सुख दु:खाहून वेगळे सतस्वरुपी होते. ।।१।।

**बस्ती ऊजड़ ऊजड़ बस्ती ।। गोतस जगत देखावेगा ।।२।।**

जसे जगातील सर्व स्त्री–पुरुष संसारात गोत परिवाराची मायावी वस्ती पकड्तात.अशी वस्ती प्राणाला गलतान मत म्हणजे संतमन आल्यावर उजडून जाते व त्या उजडलेल्या वस्तीत जगातील सर्व स्त्री–पुरुष जीवब्रम्ह आहे.परमात्म्याचे हंस आहे असे दिसू लागते.त्याला जगातील सर्व जीव जीवब्रम्ह आहे व मी पण जीवब्रम्ह आहे.म्हणून हे सर्व जगातील लोक माझे गोत आहे व त्यांच्यात जे रामस्नेही आहे.तो माझा परिवार आहे असे दिसू लागते.।।२।।

**जीवत मूँवा मूँवा जीवे ।। भरमा की भस्म चढावेगा ।।३।।**

युगानुयुगापासून प्राणी माया गुणांनी जीवंत आहे.त्याला गलतान म्हणजे संतमन आल्यावर त्याचे माया मत मरुन जाते याप्रकारे प्राण जीवंत होऊन ही माया मताने मेलेला राहतो.त्या प्राणात जे संतमन मेलेले होते.ते संत मत संतमत प्राप्त झाल्याने जीवंत होवून जाते आणि ते संत संतमताच्या जोराने मायेचे भ्रम भस्म करुन देतात.।।३।।

**च्यारू खाण बाण सब मांही ।। अेकी ब्रम्ह दिखावेगा ।।४।।**

जेंव्हा प्राण्याला गलतान मत येते म्हणजे संतमत येते तेंव्हा त्याला सर्व जरायुज,अंडज, अंकुर,उद्वीज असे चारी खाणींच्या प्राण्यांमध्ये व परा,पंश्चती,मध्यमा,वैखरी असे चारी वाण्याच्या प्राण्यांमध्ये एक ही सतस्वरुप ब्रम्ह दिसतो. ।।४।।

**तीनुं चूर चढया गढ ऊपर ।। सुंन मे सहर बसावेगा ।।५।।**

संत आल्याने संतमतवाला प्राण मृत्युलोक,पाताळ लोक,स्वर्गलोक सर्वांना छेदून दहावे –द्वाराच्या शुन्य मध्ये शहर बसवितो म्हणजे शुन्य मध्ये घर बसवितो. ।।५।।

**जन सुखराम संत मतवाळा ।। जोत सुं जोत मिलावेगा ।।६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात असे संतमताचे येथे आतासारखे मायेमुळे जीवब्रम्ह व होणकाळ पारब्रम्ह वेगवेगळे राहतात तसे सतस्वरुप ब्रम्हात,जीवब्रम्ह येथील मायेसारखे वेगवेगळे राहत नाही.जसे ज्योती मध्ये ज्योत मिळून गेल्यावर मिळवलेली ज्योत मिळवलेल्या ज्योतीपासून वेगळी राहत नाही.असेच तेथे सतस्वरुप व जीवब्रम्हचा वैराग्य स्वभाव एक सारखा राहतो.तो माये सारखा वेगळा राहत नाही. ।।६।।

१६६

।। पदराग हिन्डोल ।।

**जनसा ठग न कोई हो**

**जनसा ठग न कोई हो ।। साधो जनसा ठग न कोई हो ।।**

**बड़ा पासीगर हो साधो ।। जनसा ठग न कोई हो ।।टेर।।**

आपल्या सुखाकरीता होणकाळ,पारब्रम्ह,इच्छा,मन आणि ५ आत्मा जीव कर्मी बनावे आणि साकारी सृष्टीमध्ये आवागमनाच्या चक्रात अटकून रहावे म्हणून ठगवत राहतात आणि सर्व जीव त्याच्यात ठगले जातात.सतस्वरुपी परमात्म्याला जीव होणकाळ पारब्रम्ह इच्छा,मन आणि ५ आत्मांचे विकार स्वभावाने ठगून जावून राहीला आहे आणि दु:ख प्राप्त करतो याचे दु:ख होते असते म्हणून सतस्वरुपी रामजी शरणात आलेल्या जीवांना या होणकाळ पारब्रम्ह,इच्छा,मन आणि आत्मा अश्या आठ ठगांच्या तावडीतून निघण्याचा भेद देतात.त्या भेदाच्या आधाराने या आठीनी ज्यां ज्या ठगविण्याच्या विध्या बनवल्या. त्या विध्यांचा उपयोग घेऊन जीव हंस त्याच्या समोर त्यांना फसवून त्यांच्या तावडीतून बाहेर निघून जातात आणि महासुखाच्या अमरपदात जातात.याकरीता आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सतस्वरुपी जना सारखा होणकाळात दूसरा होणकाळ

पारब्रम्ह,इच्छा,मन आणि ५आत्म्याला फसवून होणकाळ पार करुन देतात असे संत मोठे फासीगर आहे.जे या ठगांचे फास कापून देतात आणि या ठगांनाच ठगवून घेतात. ।।टेर।।

**तीन लोक बेराटज ठगीयो ।। ममता मंछया सोई हो ।।१।।**

संत कसे फासीगर आहे यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी काही दाखले दिले आहेत.होणकाळ पारब्रम्हाने आणि इच्छेने भोग करुन ज्यातून जीव जन्म घेतील व मरतील अशी मायावी साकारी सृष्टी बनविली.त्या साकारी सृष्टीत मनाची ममता म्हणजे त्रिगुणी मायेपासून उपजल्या वस्तुपासून माझ्या मनाचा लगाव तसेच मनाची इच्छा म्हणजे त्रिगुणी मायेपासून उत्पन्न झालेली वस्तु प्राप्त व्हावी याची चाहणा लागून राहो अश्या विकारी सुखाची ३ लोकांची सृष्टी बनविली.आपल्या सोबत जे मन आणि ५ आत्मा आधीपासून जे जुडलेले होते.त्यांना नेहमीसाठी काढण्याकरीता उपयोगात आणली.या खंडात धरतीवर संतांचे शरीर आहे.संतांना शरीराला होणकाळ पारब्रम्ह आणि इच्छेच्या तावडीतून काढायचे नाही,त्याला त्याच्या हंसाला काढायचे आहे.या समजचा आधार घेऊन सतस्वरुपाच्या भेदाने शरीराला खंड म्हणजे साकारी सृष्टी बनून घेता आपल्या ब्रम्हतत्वाने ५ आत्मा काढून वेगळे करुन देतात आणि पुढे संताचा हंस स्वर्गाच्या रस्त्याने चालून त्रिगुटीत मनाला काढून देते.(मन निघून जाते)याप्रकारे होणकाळ पारब्रम्ह आणि इच्छेने बनविलेल्या साकारी खंडासारखे देहात खंड बनून ज्या मन आणि ५ आत्माच्या आधाराने होणकाळ पारब्रम्ह आणि इच्छा जीवाला युगानुयुग फसवत आले आणि फसवत राहतील.त्या मन आणि ५ आत्मालाही काढून टाकतात.संत सर्व फासीगरांपेक्षा मोठे फासीगर आहे. जीवासोबत मन आधीपासून आहे.मनाला त्रिगुणीमायेशी तसेच त्रिगुणी मायेपासून उपजलेल्या वस्तुशी माझे पणाला लगाव राहतो.जसे–माझे घर,माझे धन,माझी पत्नी, माझा पुत्र,माझे कुळ,माझे राज्य इ.हे घर,धन, पुत्र,पुत्री,राज्य,कुळ सर्व माया आहे.हे सर्व त्रिगुणी मायेपासून बनले आहे.अश्या त्रिगुणी मायेच्या वस्तुंच्या लगावास ममता म्हणतात.ही ममता त्रिगुणी मायेच्या लगावाने हंसाला होणकाळात फसवून ठेवते. याप्रकारे जीवाच्या मनाला त्रिगुणी मायेपासून आणि त्रिगुणी मायेपासून उपजलेली वस्तु ही माझी बनावी ही चाहणा असते.त्याच्या या चाहनेला मंछा(इच्छा)म्हणतात.जसे– कोणाजवळ घर नाही तर माझे घर बनावे.एक घर आहे तर दोन घर बनावेत.धन नाही तर माझ्याजवळ धन यावे,राज्य नाही तर माझ्याजवळ राज्य यावे.मला पत्नी मिळावी, मला पुत्र व्हावा अशी अनेक प्रकारची इच्छा असते.या इच्छेला पूर्ण करण्यात जीव होणकाळात फसलेला राहतो.अशी ही ममता आणि इच्छा मन जो राजा बनून बसला आहे.त्याच्या बलाने जबर बनून राहते.मनाला बळ मिळाला नाही तर ही ममता आणि

इच्छा बळहिन बनून जाते.म्हणजे ममता आणि इच्छा ही मनाच्या आधारावर आहे. ।।१।।

मन सरीसा भूपत ठगीयो ।। चडग्या गढ पर दोई हो ।।२।।

मनाने सर्व जीवांना ५ आत्मांचे ५ विषय या सरदारांमध्ये तसेच आपले काम,क्रोध,लोभ, मोह,मत्सर,अहम स्वभावाने जेर(कैद)करुन ठेवले आहे.या मनाला ५ विषयात तसेच काम,क्रोध,मद,मोह,मत्सर,अहम इ.वस्तुंपासून भारी सुख मिळते.याकरीता हे मन सर्व जीवांना गुलाम बनविते आणि होणकाळात ठेवते आणि सर्व जीवांचा राजा बनून स्वतःच्या मायेच्या सुखाकरीता जीवाला आपल्या हुकुमात ठेवून ठगवित राहतो. खरे तर मन जीवाच्या आधारानेच जींवत आहे आणि जिवंत राहत असा जुलुम करतो. संत सतशब्दाच्या भेदाच्या आधाराने आपल्या देहाला खंड ब्रम्हंड बनवून मनाच्या ५ विषयी सरदारांना नाभीमध्ये तसेच मनाला त्रिगुटीत आपल्या जीवब्रम्ह तत्वाने नेहमी करीता वेगळे करुन संपून देते आणि जेथे मन,५ आत्मा,ममता,इच्छा पोहचत नाही अश्या अमर गडांवर दोन्ही ही म्हणजे सतशब्द आणि स्वयंम संत चढून जातात.हे मन जीवब्रम्हच्या आधाराने जिवंत होते आणि जीवाला ठगवित होते.तो जीव मनाला स्वतःपासून वेगळे करुन गडावर निघून जाण्याने मरुन जाते.ते मरुन जाते म्हणून त्याच्या बळावर जी ममता आणि इच्छा सेठी बनली होती.ती दोन्ही ही मरुन जातात.असे संतजन ज्या मन, ममता,इच्छेने सर्व जगातील जीवांना ठगवून ठेवले आहे.त्यांना सतस्वरुपाच्या आधाराने ठगवून महासुखाचे पद प्राप्त करतात.।।२।।

पाँचाँ कूं ठग राह लगाया ।। पचीसुं सब लोई हो ।।३।।

पाच म्हणजे शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध हे आत्मा हंसाच्या सोबत आधीपासून आहे.तसेच हंसामुळे जिवंत आहे.ह्या आत्मा हंसाला आपल्या वशमध्ये ठेवून आपल्या विकारी सुखाकरीता त्रिगुणी मायेचे कर्म करवितात आणि हंसाला कर्माच्या वश करवितात. ज्याच्याने हंस युगानुयुगापासून आवागमनाच्या चक्रात पडतो.याप्रकारे ह्या ५आत्मा सुखा करीता हंसाला कर्मात टाकून आवागमनाच्या चक्रात फसवत राहतात.संत सतशब्दाच्या आधाराने देहाला ३ लोकाचा बेराट बनवून नाभीमध्ये ५ आत्मांपासून वेगळे होवून ५ आत्म्यांची जी मुल मृतक स्थिती आहे.त्या स्थितीच्या रस्त्यांने लागून हंस अमर गडावर चढून जातो.२५ प्रकृती ५आत्म्यांपासून जनमतात.ह्या २५ प्रकृत्या पण आपल्या सुखाकरीता जीवापासून कर्म करवितात आणि जीवाला होणकाळात फसवितात.संत सतस्वरुपाच्या आधाराने या २५ प्रकृत्या ज्या आत्म्यांपासून जन्म घेतात त्यांनाच संपवून टाकतात.अश्या ५ आत्मा संपल्याने त्यापासून जन्म घेतलेल्या २५ प्रकृत्या आपोआपच संपून जातात.असे संत जे २५ प्रकृत्या हंसाला होणकाळात फसवायला

निघाल्या होत्या, त्यांनाच मुळापासून संपवून देतात असे संत भारी ठग आहे.।।३।।

**अळा पिंगळा सुखमण ठग के ।। दिया आद घर पोई हो ।।४।।**

होणकाळ पारब्रम्ह व इच्छेने ३ लोकांच्या सृष्टीत गंगा,यमुना,सुषमना बनविल्या.ह्या गंगा,यमुना,सुषमना जीवाला,जीव आधीपासून ज्या घरातून जगात आला त्या भृगुटीच्या घरात पोहचवितात.ज्या आदिघर भृगुटीपासून आधीपासून मायेमध्ये जनमण्याची विधी आहे.असे गंगा,यमुना,सुषमना जीवाला फसवितात.संतांनी सतशब्दाच्या आधाराने ज्या होणकाळ ब्रम्ह आणि इच्छेने गंगा,यमुना,सुषमना हंसाला आदि घरी पोहचविण्याकरीता बनविल्या.त्या गंगा,यमुना,सुषमनाचा उपयोग घेऊन गंगा,यमुना,सुषमनाला आदि घरी म्हणजे त्रिगुटीत त्यागुन भृगुटी न जाता सरळ त्रिगुटीतून काढून नेहमी करीता विकारी सृष्टीत येण्याच्या आदि घराला सोडून देतात.असे संत महाठग आहे.जे गंगा,यमुना, सुषमना हंसाला आदि घरी पोहचवून होणकाळात ठेवण्याचे ठग कार्य करीत होती.त्या गंगा,यमुना,सरस्वतीचा उपयोग संतांनी होणकाळ पार करण्याकरीता केला.असे संत मोठे फासीगर आहे.।।४।।

**ओऊँ सोऊँ शक्ति ठग के ।। लीया प्रमपद जोई हो ।।५।।**

होणकाळ पारब्रम्ह आदि इच्छेने ओअम,सोहम आणि साकारी सृष्टी बनविली.जीव ओअम, सोहम म्हणजे श्वासाने जीवंत राहतील आणि जीव,मन व ५ आत्म्यांच्या चाहनेने शक्ती म्हणजे साकारी मायेने वासनीक कर्म करतील आणि होणकाळ पारब्रम्ह मध्ये गुंतून राहतील.संत या ओअम,सोहम म्हणजे श्वासाचा आधार होऊन सतशब्दाची भक्ती करतात आणि कर्म करणारे मन आणि ५ आत्मा काढून देतात.तसेच घटात सतस्वरुप वैराग्य प्रगट करुन,वासनिक शक्तीला मूळापासून मारतात आणि परमपद पोहचून जातात. असे संत मोठे फासीगर आहे.।।५।।

**तीन लोक दस च्यार भवन ले ।। जेसे रेग्या छोई हो ।।६।।**

अनेक प्रकारची होणकाळ पारब्रम्ह आणि इच्छेने बनविलेले ३ लोक,१४ भवनाची हंसाला, जीवाला होणकाळात फसवून ठेवणारी सर्व बलवान विकारी विध्या संतांनी बळहीन करुन दिली.जसे जिवंत मनुष्यातून प्राण निघून जातो आणि देह मृतक होऊन जातो. म्हणजे बिना चेतनचा होतो.तसे होणकाळाने जीवाला फसविण्यासाठी बनविलेला ३ लोक १४ भवन होणकाळाला संताकरीता वाटतो. ।।६।।

**ब्रम्हा बिष्णु महेसर ठगता ।। हर मिल्या हम दोई हो ।।७।।**

होणकाळ पारब्रम्हने जीवाला होणकाळात लागून ठेवण्याकरीता ब्रम्हा,विष्णू,महादेव बनविले.ब्रम्हाने जीवाचे मन आणि ५ आत्मा जे सुख चाहतात(हवे)तशी मायावी सृष्टी बनविली आणि मायेचे विकारी सुख घेण्याकरीता चार वेदांमध्ये अनेक करण्या बनविल्या

आणि जीवाला होणकाळात अटकविले.संत सतस्वरुपाच्या आधाराने ब्रम्हाने बनविलेले सुख चाहणांच्या मन आणि ५ आत्म्यांना जीवापासून वेगळे करुन मारुन टाकतात.ज्याच्याने ब्रम्हाची होणकाळात अटकविण्याची विधी निष्काम होऊन जाते.ब्रम्हाने चार वेद जीवांना अटकविण्याकरीता बनविले.तर संतांनी अनभै ज्ञान होणकाळातून काढण्यासाठी जगात प्रगट केले.ब्रम्हाने रचना विधीने जगात जीवांना जन्म दिला तर संतांनी त्या जन्मलेल्या जीवांना सतस्वरुप विज्ञान समजावून पारब्रम्ह होणकाळ पलीकडील हंस बनविले ब्रम्हाने जीवांना होणकाळात अटकविण्यासाठी सांख्य योग आणला.तर संतांनी सांख्ययोगात अटकलेले तसेच जगाच्या जीवांना होणकाळातून काढण्याकरीता राजयोग प्रगट केला. विष्णू नवविद्या भक्तीत जीवांना लावून होणकाळाच्या विष्णूलोकात पोहचवून होणकाळात अटकवितो.तर संत सतस्वरुपाची दसविद्या(दहा)भक्ती करुन,विष्णूला ठगवून विष्णू लोकाच्या पुढे परमपदात निघून जातात.विष्णू जीवाला होणकाळात अटकविण्यासाठी अवतार पाठवतो.तर संत अवतारांना ही कैवल्य ज्ञान देऊन मोक्षास पोचवितात. (पोहचून देतात)जसे रामचंद्र वशिष्ठ मुनीने होणकाळ पारब्रम्हतून काढून पारब्रम्हच्या परे पोहचविले.शंकर जीवाच्या स्थुल मायावी शरीराला मारण्याच्या विध्या पैदा करतो. जसे रोग इ.आणि होणकाळ चक्रात फसंतो.तर संत सतशब्दाच्या आधाराने आपल्या जीवाच्या घटात मन,५ आत्म्यांना मारण्याची वैराग्य विधी प्रगट करतात आणि आपली मोह,ममता मारतात.मोह,ममता मेली की इच्छा मरते.इच्छा मेली की होणकाळ मरतो. याप्रकारे होणकाळास ही मारतात.याप्रकारे शंकराला ठगवून घटातील शंकराचा काळ गुणाचा उपयोग संत होणकाळला मारण्याकरीता करतात.शंकराने जीवांना अटकविण्या-करीता हटयोग बनविला तर संत जीवांना होणकाळातून काढण्याकरीता प्रेमयोग प्रगट करतात.याप्रकारे आम्ही सतस्वरुपी संतांनी ब्रम्हा,विष्णू,महादेवाला ठगविले आणि ब्रम्हा,विष्णू,महादेवाने बनविलेल्या तीन लोक १४ भवनाचे उल्लंघन करुन पुढे गेले. तेव्हा आम्हा सर्व संतांना हर म्हणजे रामजी मिळाले. ।।७।।

**के सुखराम इसा जन ठग हे ।। सुण लीज्यो सब लोई हो ।।८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे संत असे ठग आहे ते सर्व ज्ञानी ध्यानी जगातील स्त्री-पुरुष ऐका ।।८।।

३२५

।। पदराग जोग धनाश्री ।।

**समज समज हंसा सनमुख रेणा**

**समज समज हंसा सनमुख रेणा ।। ग्यान सुणो सत तोलो बे ।।**

**जे कुछ ओर बणे नहि तुम सूं ।। तो बचन तो सूल्या बोलो बे ।।टेर।।**

अरे जीवा सतपुरुषांना समज व समजून सतपुरुषांच्या सन्मुख रहा.सतपुरुषांचे ज्ञान

ऐका व ते काय बोलत आहे.ते सतज्ञानाने तोला.तुला त्यांचे ज्ञान धारण करायचे नसेल तर धारण करु नकोस.परंतु सतगुरुंशी कमीत कमी गोड तर बोल. ।।टेर।।

**जुग की भीड़ बचन थे बोलो ।। सतगुरू पछ नही लावो बे ।।**
**ज्यांरी तो भक्त पडेली पाछी ।। धक्का गेबका खावो बे ।।१।।**

जगाचा विचार करुन सतगुरुंशी काळाचे बोल बोलून राहीला आहे व जे तुमचे दु:ख मिटवू शकता त्या सतगुरुंशी गोड बोलत नाही.त्यांचा पक्ष घेत नाही.अशा हंसांनी ब्रम्हा, विष्णू,महादेव,शक्ती यांच्यातून कोणाचीही भक्ति कितीही जब्बर केली तरीही ती भक्ति नष्ट होवून जाते व निश्चितच यमाचे भारी भारी धक्के लागतात. ।।१।।

**न्याव कु न्याव देखो मत कोई ।। ना कोई दिष्टंग लावो बे ।।**
**सतपुरसांरी तो म्हेमाई कीजे ।। क्रणी रो तोल न पावो बे ।।२।।**

सतपुरुष न्यायाने बोलत आहे का बिना न्यायाने बोलत आहे.हे बघु नका.ना जगाचा न्याय,अन्यायाचा दृष्टांत दाखवू नका.सतपुरुषांची तर महिमाच करा.त्यांच्यात साहेब प्रगट आहे म्हणून त्यांच्या करण्या चांगल्या आहे किंवा वाईट आहे हे मोजू नका.।।२।।

**सत्त पुरषांरी तो म्हेर गेब की ।। केर गेब होय जावे बे ।।**
**क्रम हुणारत दोनू धूजे ।। काळ निकट नही आवे बे ।।३।।**

सतपुरुषांची मेहेर व कुमेहेर त्यांच्या बिना विचाराने आपोआप होऊन जाते.त्यांची कुमेहेर केंव्हा होईल हे कोणालाही समजत नाही.त्यांना काळ कर्म व होणारथ कर्म दोघे ही घाबरतात.यामुळे होणकाळ पण अश्या सतस्वरुपाशी वैर ठेवित नाही.तर तुम्ही त्यांची करणी तोडून का त्यांची कुमेहेर घेता?।।३।।

**सत्त पुर्सारी तो आस अनादू ।। ब्रम्हा बिस्न सिव चावे बे ।।**
**जो अवतार देही धर आया ।। वे ही सीस निवावे बे ।।४।।**

हे सर्व अनादि काळापासून सतपुरुषांच्या दर्शनाची आशा करतात व त्यांना प्रणाम दंडवत करतात.आजपर्यंत जे-जे विष्णूचे अवतार देह धारण करुन धरतीवर आहे.त्या सर्व अवतारांनी सतपुरुषांना माथा टेकविला आहे.(नमन केले आहे.) ।।४।।

**तीन लोक की कळ सब जाणे ।। ब्रम्हा बिस्न लग सोई बे ।।**
**के सुखराम प्रमपद प्रगट ।। सब सूं न्यारो होई बे ।।५।।**

ब्रम्हा,विष्णू,महादेव हे देवता तीन लोक चौदा भवनाची कला जाणता परंतु सतपुरुषात प्रगट झालेले परमपद थोडेही(लेशमात्रही)जाणत नाही.अश्या सतपुरुषांमध्ये प्रगट झालेली कला होणकाळाच्या कलेपेक्षा वेगळी आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात ।।५।।

३९४

।। पदराग जोग धनाश्री ।।

**सुर जाणे लो सुर जाणे लो**

**सुर जाणे लो सुर जाणे लो ।। जन कूं ब्होत बखाणे रे ।।**
**ज्हाँ ज्हाँ हरजन पाँव धरत हे ।। तहाँ तहाँ रिछया ठाणे रे लो ।।टेर।।**

जनांना(संतांना)सूर(सर्व देवही)जाणतात आणि सर्व देव संताच्या महिमेचे खूप वर्णन करतात.जेथे तेथे हरजन(संत)पाय ठेवतात,तेथे तेथे(संताची सर्व देव रक्षा करतात.) ।।टेर।।

**ज्यूं सुण कंवर फिरे मन जोखां ।। स्हेर नग्र मे आवे रे ।।**
**हाकम राव पटायत सारा ।। सबे जाप तो गावे रे लो ।।१।।**

ज्या प्रकारे राजाचा राजकुमार आपल्या मनाने जोखा(बेजोखम)फिरतो आहे आणि ज्या गाव आणि नगरात राजकुमार जातो त्या त्या गावाचे हाकीम,राव,पटाईत(जहागीरदार) हे सर्व त्या राजकुमाराची जापता(रक्षण)करतात.त्याच प्रकारे संतांची सर्व देव रक्षण करतात ।।१।।

**अणभे सीस बंध्यो प्रवानो ।। सो जन अेधी होई रे ।।**
**वां कूँ भुपत निवे जुग जुग मे ।। जन सूं देव दैत सोई रे लो ।।२।।**

(ज्या ऐधीच्या शिरावर बादशाहाचा परवाना आहे.)पूर्वी लोकांचे पत्र घेऊन जाणारे पत्र वाहक आपल्या फेट्यात किंवा उपरण्यात बांधून पत्र पोहचविण्या करीता घेऊन जात होते आणि आताही मारवाड देशात पत्र घेऊन कोणाला घेऊन जाण्यास सांगितले तर ते पत्र आपल्या डोक्याचा फेट्यात किंवा उपरण्यात बांधून घेऊन जातो.याच प्रमाणे अनुभव परवाना(जीव तारण्याचा हुद्दा)ओहदा ज्यांना मिळाला आहे.)ते संत बादशाहाचे दूता प्रमाणे संत रामजीचे दूत आहे.जसे बादशाहाच्या दूतासमोर युगांयुगापासून राजा लोक झुकत आले,त्याप्रकारे संताना देव,दैत्य सर्व नमन करतात.(यासाठी की,संतजन हे रामजीचे दूत आहेत.) ।।२।।

**ज्यांहाँ ऊर घर मे हर की भक्ति ।। ज्यां सुर पुजन मांगे रे ।।**
**जे जन कूं राकस नही सतावे ।। तां की आण न भांगे रे लो ।।३।।**

ज्या हृदयात किंवा ज्या घरात रामजीची भक्ती आहे.तेथे कोणताही देव आपली पूजा मागत नाही आणि त्या संताची आण(शपथ)तोडीत नाही.(ते देव आणि राक्षस संतांची शपथ दिल्यावर संतांची शपथ तोडत नाही.) ।।३।।

**ज्ञान बिना नर नार कहावे ।। वां ने खबर न कोई रे ।।**
**के सुखराम संताँ की म्हेमा ।। देव लोक मे होई रे लो ।।४।।**

या गोष्टीची जे अज्ञानी स्त्री पुरुष आहेत,त्यांना खबर नाही.(संताची किती महिमा आहे.

हे अज्ञानी जाणत नाही.परंतू देव जाणतात.ते देव संताची महिमा करतात आणि अज्ञानी मनुष्य संताची निंदा करतात.)आदि सत्गुरु सुखरामजी महाराज सांगतात की,संताची महिमा तर देवलोकात होत राहते.(देवतांच्या लोकात संत ज्या लोकात जातात,तेथील देवता संतांची महिमा आगत स्वागत करतात.) ।।४।।

४०९

।। पदराग केहरा ।।

**उन सुरत की बलिहारी हो**

**उन सुरत की बलिहारी हो ।। लगी नॉव उर धारा हो ।।टेर।।**

ज्याच्या ह्रदयात रामनामाची ध्वनी लागून गेली आहे.(त्यांच्यावर मी माझा प्राण ओवाळून टाकतो.)।।टेर।।

**जिण मुख रसना राम केहत हे ।। धिन जन यो सेंसारा हो ।।**
**चरण बंधा सूं पाप झडत हे ।। भागे भरम अंधारा हो ।।१।।**

ज्याच्या तोंडात जीभ रामनाम म्हणते,ते संत संसारात धन्य आहे.अशा संतांच्या चरणाची वंदना केल्यावर,पाप झडून जातात आणि भ्रमाचा अंधार पळून जातो.।।१।।

**सेस महेस बिसन को धन हे ।। सो जन हिरदे धाऱ्या हो ।।**
**वो जन कूं सब देवत बंदे ।। धिन धिन भाग हमारा हो ।।२।।**

जो शेष,महादेव आणि विष्णू या सर्वांचा जे धन आहे(हे शेष महेश व विष्णू ज्या राम नामाची भक्ती करतात.अशा शेष महेश विष्णूच्या धनास)जनाने(संताने)रामनामास ह्रदयात धारण केले.त्या जनास(संतास)सर्व (तेहेतीस कोटी देव)वंदना करतात.ते धन मला मिळाले आहे म्हणून माझेही भाग्य धन्य धन्य आहे. ।।२।।

**धरम पुंन जिन जोगज किरिया ।। वाँ जन के सब लारा हो ।।**
**केवळ राम भजन इधकारी ।। पाँच गिगन चढ माऱ्या हो ।।३।।**

धर्म,पुण्य,यज्ञ,योग व सर्व क्रिया त्या संताच्या मागे आहेत.(या धर्म,पुण्य,यज्ञ,योग व सर्व क्रिया यांच्यापेक्षा ते संत जास्त आहे.संतापेक्षा हे जास्त नाही.)ते संतजन कैवल्य राम नामाच्या भजन करण्याचे अधिकारी आहेत.ते संतजन गगनात(ब्रम्हांडात)चढून पांची इंद्रियाचे विषयास मारुन टाकले. ।।३।।

**के सुखराम आप जन तिरिया ।। ओर अनंता ताऱ्या हो ।।**
**ब्रम्हा बेद भागवत केहे ।। सत्त कर मानो बिचारा हो ।।४।।**

आदि सत्गुरु सुखरामजी महाराज म्हणतात,ते जन(संत)आपण तर तरले आहेच व अधिकही अनंत जीवास तारले आहे आणि तरतील,ही गोष्ट ब्रम्हाने वेदात आणि वेदव्यास भागवतात सांगतो.यास खरी करुन माना व याचा विचार करा. ।।४।।

४१८

।। पदराग केदारा ।।

**वारी वारी आया हे हंसाँ काज**

**वारी वारी आया हे हंसाँ काज ।। संत बड़ा महाराज ।।टेर।।**

सतगुरु संत मोठे महाराज आहे.हे सतगुरु हंसाना तारण्यासाठी वेळोवेळी जगात येतात. असे जीवांना तारणारे संत धन्य आहे,धन्य आहे. ।।टेर।।

**जे जे नर जुग राम पुकारे ।। से मेरा सिरताज ।।**

**बड़ा बड़ा जन संत समाधी ।। तां कूं मेरी लाज ।।१।।**

जे-जे मनुष्य रामनामाचे उच्चारण करतात.ते माझ्या शिराचे मुकूट आहे व जे-जे मोठ मोठे संत रामनामाचे उच्चारण करुन समाधी देशात आदि घरात पोहचून राहतात. तसेच मी काळाच्या दु:ख दरिद्री मध्ये न पडो याची लाज ठेवता म्हणून धन्य आहे,धन्य आहे. ।।१।।

**तन मन धन  सब अर्पण दीजे ।। भजन कीजे बाज ।।**

**सतगुरू बेचे मे बिक जाऊँ ।। परत न आऊं भाज ।।२।।**

असे संत सतगुरुंना तन,मन,धन अर्पण करा व त्यांनी दाखविलेल्या विधी नुसार विलंब (वेळ न घालवता)भजन करा.असे भवसागरातून तारणारे सतगुरु मला विकूनही देतील तर मी विकून जाईल,परत फिरुन कधी ही येणार नाही. ।।२।।

**संत हमारा मात पिता हे ।। कहे ग्यान सब गाज ।।**

**के सुखराम च्रणा को चेरो ।। प्रभुजी तारे म्हाणे आज ।।३।।**

हे संत सर्वांचे माता पिता आहे.असे ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,अवतारांनी ज्ञानात जोर देऊन सांगीतले आहे.अश्या माता-पिता रुपी संताच्या चरणाचा मी चाकर आहे.या संतांच्या कृपेने माझे प्रभुजी मला तारतीलच तारतील,हा मला विश्वास होवून गेला आहे. ।।३।।

१५०

।। पदराग काफी ।।

**हरिजन क्हो किम जाणिये हो**

**हरिजन क्हो किम जाणिये हो ।। तुम सुणज्यो हो ग्यानी पिंडत आण ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,कसा जाणावा की हरीजन आहे?ते सर्व ज्ञानी आणि पंडीत ऐका.हरीजनास कसे जाणले जाईल.।।टेर।।

**करामात सूं पीर  कुहावे ।। बचन फळयां सिध होय ।।**

**सांग बणायां भेष भ्रमना ।। जगत रहयां जुग लोय ।।१।।**

कोणी करमाती झाला तरी तो(हरीजन नाही.)त्याला पीर समजावे आणि जे तोंडाने सांगतो आणि त्याचे वचन खरे होवू लागले.(तो ही हरीजन नाही)त्यास सिध्द समजावे आणि

साधुचे सोंग(वेष)धारण करुन,संसारात भ्रमण करीत राहीला,तरी पण(तो हरीजन नाही.)त्या वेषधारीला,लोकाना भ्रमात टाकणारे,असे म्हणतात आणि संसारात राहणारे (हे ही हरीजन नाही)हे संसारातील,संसारी लोक आहेत. ।।१।।

**टेल कियां सूं दास कहावे ।। तपसूं तपसी जाण ।।**
**इंद्रि दवण जत्ति जुग भाषे ।। मुन मुने सर ठाण ।।२।।**

(साधु संताची किंवा आई,बापाची किंवा आल्या गेलेल्यांची)जो टहल(सेवा)करतात. (ते ही हरीजन नाही)त्यास दास म्हणा आणि तपश्चर्या करतात,(ते ही हरीजन नाही) त्यास तपस्वी जाणा आणि इंद्रियाचे दमन करतात.(ते ही हरीजन नाही)त्यास यती म्हणतात आणि कोणी मौन धारण करुन(कोणासी बोलत नाही,तर ते ही हरीजन नाही.)त्यास मौनेश्वर(मौनी) म्हणतात. ।।२।।

**चरचा ग्यान अरथ ब्हो लखले ।। सो पिंडत जुग होय ।।**
**होण हार होसी सो भाषे ।। जबलग रिष पद जोय ।।३।।**

आणि जे चर्चा करतात आणि पुष्कळ तऱ्हेचा ज्ञानाचा अर्थ समजतात(तर ते ही हरीजन नाही)ते पंडीत आहे आणि जसे होणहार आहे,तसेच होईल,असे जे म्हणतात(ते ही हरीजन नाही)ते ऋषी आहे,असे पहा. ।।३।।

**भांजे मांड घडे. फिर पाछो ।। सो सुण देव कुवाय ।।**
**धारे देहे अनंता अेकी ।। राकस सिध गत थाय ।।४।।**

आणि या पृथ्वीस तोडून पुन्हा पृथ्वी निर्माण करतात.(तेही हरीजन नाही)त्यास देव (शिव व ब्रम्हा)म्हणतात आणि एकटाच,एकसारखा किंवा अनेक तऱ्हेचे अनंत शरीर धारण करतो.(तर तो ही हरीजन नाही.अनेक तऱ्हेचे अनंत देह धारण करणे)ही सिध्दाची किंवा राक्षसाची गती जाणावी. ।।४।।

**उडे. गड़े डूबे जळ माही ।। मन की कहे सब जोय ।।**
**के सुखराम सिध वे कहिये ।। देव कळा क्हे लोय ।।५।।**

आकाशमार्गाने उडून जातात आणि जमीनीत गडून शेकडो कोस पुढे जाऊन निघतात. आणि पाण्यात बुडून,पाण्यात राहतात आणि दुसऱ्याच्या मनातील गोष्ट पाहून,सर्व सांगून देतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,(हे ही हरीजन नाही)परंतू लोक यांना सिध्द म्हणतात आणि कोणी त्यांच्यात देवाची कळा आहे.असे लोक सांगतात.।।५।।

१४६

।। पदराग काफी ।।

**हरिजन सो इम जाणिये हो ।।**
**तुम सुणज्यो हो ग्यानी पिडंत आण ।। हरिजन सो इम जाणिये हो ।।टेर।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हरीजन तर असे असतात त्यासच

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

हरीजन असे समजावे.ते सर्व ज्ञानी व पंडीत येऊन ऐका. ।।टेर।।

**काया खोज सबद तत चीनि ।। उलट आद घर जाय ।।**
**आठ पोहोर साहेब सूं ताळी ।। गरक हुवा पद माय ।।१।।**

ते आपल्या सर्व शरीराला शोधून आणि तत्त शब्द ओळखुन बंकनाळेच्या रस्त्याने उलटून जे आदिघरी पोहोचून गेले आहे,तेच हरीजन आहे.अष्टोप्रहर साहेबासी(मालकासी) टाळी लावून त्या पदामध्ये गर्क होवून गेले आहे.तेच हरीजन आहे. ।।१।।

**नाव न: केवळ बिन नहि माने ।। कोट कळा की बात ।।**
**आसा बिना भजे अबनासी ।। भ्रम कहूं नही जात ।।२।।**

आणि या न केवळ नावाच्या शिवाय,दुसऱ्या कोणत्याही नावाला मानत नाही आणि कोणी करोडो कला दाखविल्या(तरीही न केवळ नावाच्या शिवाय)दुसऱ्या गोष्टीला मानत नाही. तेच हरीजन आहे आणि कोणतीही आशा(कामना)न ठेवता निष्काम होवून(कामना सोडून) अविनाशीची भक्ति करतात आणि(इकडे तिकडे)भ्रमात पडून,ते कोठेही जात नाही. त्यालाच हरीजन समजा.)।।२।।

**दवा बेदवा दे कब नाही ।। मान महोला नाय ।।**
**लागे हे ध्यान ब्रम्ह सूं ताळी ।। दसवे द्वार घर माहे ।।३।।**

आणि ते कोणाला आशिर्वाद किंवा शाप कधीही देत नाही.मनात मान आणि महोला (राजाच्या सभेत सन्मानाची इच्छा कधीही ठेवत नाही.(मनात सन्मानाची बिलकुल ही इच्छा ठेवत नाही,की माझा सन्मान झाला पाहिजे)आणि त्यांचे ध्यान लागुन ब्रम्हसी ताळी लागुन जाते.दहाव्याद्वाराचा घरात(शब्द व श्वास)जाऊन राहतात. ।।३।।

**लागे हे धुन्न नाद सो गाजे ।। अखंड खंडे नही कोय ।।**
**के सुखराम संत सो कहिये ।। रता हे ब्रम्ह सूं जोय ।।४।।**

आणि शब्दाची ध्वनी लागुन जाते व शब्दाचा नाद गरजु लागतो.तो अखंडीत गरजतो. तो कधीही खंडीत होत नाही,हे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,त्यालाच संत म्हणा.जो ब्रम्हसी लागलेला आहे, तेच हरीजन आहे. ।।४।।

३२८
।। पदराग भवन ।।

**समरथ साहेब नित भजो अे हेली**
**समरथ साहेब नित भजो अे हेली ।। हर भजियाँ डर सब जाय ।।टेर।।**

हे हेली(सुरत)जीवाला काळापासून मुक्त करणारे समर्थ साहेबाला नित्य(नेहमी)भजा हरला भजल्याने काळाची पूर्ण भीती चालली जाते. ।।टेर।।

**आठ पोहोर चोसट घड़ी अे हेली ।। नाँव रहे दिल माय ।।**
**सो साधु जन धिन्न हे हेली ।। वाँरा चरण छिंवीजे जाय ।।१।।**

आठो प्रहर,चौसष्ट घडी म्हणजे चोवीस घंटे(तास)साधुच्या ह्दयात नाम राहते अश्या साधुंचे चरण स्पर्श करा.।।१।।

**ध्यान लग्यो ब्रम्हंड मे अे हेली ।। त्रिकुटी सेर मंझार ।।**
**सो साधु जन राम हे हे हेली ।। वाँ रे नित डोली जे लार ।।२।।**

ज्या सांधुचे त्रिकुटीच्या परे ब्रम्हांडात ध्यान लागले आहे त्या संतांच्या नेहमी सोबत रहा.ते साधु,ते संत रामजीच आहेत.।।२।।

**नव दर्वाजा लांग के अे हेली ।। दसवाँ उघाड़े जाय ।।**
**वे साधु जन केवळी अे हेली ।। वाँरा च्रणा रहो लपटाय ।।३।।**

नऊ दरवाजे पार करुन दहावे द्वार उघड्ले आहे ते साधु केवली आहे त्यांच्या चरणात पडा(त्यांचे चरणात रहा).।।३।।

**तीन ताप जन जीतिया अे हेली ।। नव तत्त लिंग सरीर ।।**
**सो जन अवगत आप हे अे हेली ।। वाँ सूँ मिलत न किजे धीर ।।४।।**

आधी,व्याधी,उपाधी हे तीन ताप जिंकून गेले व नऊ तत्त लिंग शरीर मिटवून दिले आहे ते संत स्वयम् अविगत आहे त्यांना भेटण्यास उशीर करु नका.।।४।।

**जन सुखदेवजी क्हे सांभळो अे हेली ।। कर सतगुरा की सेव ।।**
**पुंछावे निजधाम कूं अे हेली ।। ज्याँ हे निरंजन देव ।।५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की हे हेली(सुरत)ऐक.अश्या सतगुरुंची सेवा करा ते तुम्हाला जेथे निरंजन देवा आहे त्या निजधामास पोहचवून देतील. ।।५।।

११९

।। पदराग बिलावल ।।

**अेक घड़ी आधी घड़ी**

**अेक घड़ी आधी घड़ी ।। हर को ध्यान धर हे ।।**
**वां सरभर जिग जोग जप ।। कोऊ नही कर हे ।।टेर।।**

परापरीपासून दोन पद आहेत.

१.सतस्वरुप पद–कुद्रती अनंत महासुख देणारे पद.जिथे जीवाला पाहिजे ती सुख उपलब्ध आहेत.

२.होणकाळपद– १. ब्रम्हपद २.मायापद

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो कोणी मनुष्य सुख प्राप्त करण्या करीता सृष्टीतील अश्वमेध यज्ञ धरुन एकही यज्ञ न सोड्ता सर्व यज्ञ यज्ञाच्या नियमात एकही चुक न करता साधेल त्याचप्रमाणे सृष्टीतील ब्रम्हा,विष्णू,महादेव व शक्ती ने दाखविलेले पवन योग,सांख्य योग सारखे सर्व योग साधेल त्याचप्रमाणे सृष्टीतील ब्रम्हा,विष्णू, महादेव,शक्ती यांनी दाखविलेले सर्व जप जपेल व सुख प्राप्त करेल तर आदि सतगुरु

सुखरामजी महाराज म्हणतात जो संत एक तास किंवा त्याहीपेक्षा कमी असा अर्धा तास जरी हरचे म्हणजे सतस्वरुप रामजीचे ध्यान धरेल अशा संताला प्रगट होणारे सुख हे सर्व यज्ञ,सर्व योग,सर्व जाप साधणाऱ्या मनुष्याच्या सुखापेक्षा खूप अधिक राहील.
आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात हे सर्व यज्ञ,योग,जप साधण्यात अनंत कष्ट पडतात.परंतु सतगुरुने दाखविलेल्या सतस्वरुप हरचे ध्यान साधण्यात जरासेही कष्ट पडत नाही.सहजपणे साधता येते.आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात अर्धा तास किंवा एक तास ध्यान करणारा हंस हा लवकरात लवकर अमरलोकाच्या देशात जाईल व तेथे सदाकरीता महासुख भोगेल परंतु सर्व यज्ञ साधणारा,सर्व योग साधणारा, सर्व जप साधणारा कधीही अमरलोकात जाणार नाही.येथेच स्वर्गादिकाचे सुख भोगेल व सुकृत संपल्यावर वारंवार गर्भात पडून चौऱ्यांशी लक्ष योनीचे महादुःख भोगेल व सदाकरीता काळाच्या जबड्यात पडला राहील.सुख कोणते मिळेल ज्यात चिंता आहे, फिकीर आहे,काळाचे भय आहे,हे सर्व सुख अतृप्त आहे.कितीही घेतले तरी तृप्त होत नाही.यज्ञ,योग,जप केल्याने जे सुकृत(पुण्य)जमा झाले.त्याच्याने सुख मिळेल ते सुख कमी असतात व ज्याने अर्धातास किंवा एक तास हरचे म्हणजे रामनामाचे स्मरण केले, ध्यान केले त्याच्याने जे सुकृत होतात.त्या सुकृतापासून जे सुख मिळतात ते यांच्या सुखापेक्षा जास्त,खूप अधिक असतात.हे ने:अक्षर मायेतही सुख देतो व अमर लोकातही सुख देतो.।।टेर।।

**अड़सट तीरथ न्हाईये ।। नित्त न्यात जिमावे ।।**
**तोई छिन भर ध्यान के ।। कोई जोड़े न आवे ।।१।।**

जो कोणी स्त्री-पुरुष सुख प्राप्तीकरीता अडुसष्ट तीर्थात स्नान करेल व जाती-वाल्यांना नियमित प्रेमप्रितीने व आदराने भोजन प्रसाद देवून सुख प्राप्त करेल अशा सुखापेक्षा जो कोण संत सतस्वरुप रामजीचे ध्यान फक्त क्षणभराकरीता करेल व त्यापासून त्याला जे सुख मिळेल हे सुख अडुसष्ट तिर्थात केलेल्या स्नानापासून प्राप्त झालेल्या सुखापेक्षा अधिक राहिल.
आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की,हे अडुसष्ट तीर्थ स्नान करण्यात व जातीवाल्यांना नियमित प्रेमप्रितीने व आदराने भोजन प्रसाद देण्यात अनंत कष्ट पडतात परंतु सतगुरुने दाखविलेल्या सतस्वरुप हरचे ध्यान साधण्यात जरासेही कष्ट पडत नाही.ते सहजपणे साधता येते.
त्याचप्रमाणे आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की,फक्त क्षणभराकरीता सतस्वरुप रामजीचे ध्यान करणारा हंस हा लवकरात लवकर अमरलोकात जाईल व तेथे सदाकरीता कुद्रती महासुख भोगेल परंतु सर्व अडुसष्ट तीर्थ साधणारा व जाती-

वाल्यांना नियमित प्रेमप्रितीने व आदराने भोजन प्रसाद देणारा कधीही अनंत महासुखाच्या अमरदेशात जाणार नाही.हा तीन लोकाचे सुख भोगेल व ८४ लक्ष योनीचे दु:ख भोगेल. ।।१।।

**लाख बरस लग तपसूं ।। पंच इंद्रि मारे ।।**
**तांसू इधको नाव हे ।। जे जन हिरदे धारे ।।२।।**

जो संत आपल्या हंसाच्या हृदयात सतगुरुने दाखविलेले ध्यान फक्त धारण करेल परंतु ध्यान जरासेही करणार नाही.यावर आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात अशा संताला जे सुख प्राप्त होईल ते सुख लक्ष वर्षापर्यंत पचून पचून पाची इंद्रिये मारण्याची कठिण तपश्चर्या करणाऱ्या तपस्वीला प्राप्त झालेल्या सुखापेक्षा अधिक राहील.
आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की,लक्ष वर्षापर्यंत पचून पचून पाची इंद्रिये मारण्याची कठिण तपश्चर्या साधण्यात अनंत कष्ट पडतात परंतु सतगुरुने दाखविलेल्या सतस्वरुप हरचे ध्यान साधण्यात जरासेही कष्ट पडत नाही.ते सहजपणे साधता येते.
आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात जो संत हंसाच्या हृदयात सतगुरुने दाखविलेले ध्यान फक्त धारण करेल तो लवकरात लवकर अनंत महासुखाच्या देशात जाईल व तेथे सदाकरीता महासुख भोगेल परंतु लक्ष वर्षापर्यंत पचून पचून पाची इंद्रिये मारण्याची कठिण तपश्चर्या करणारा अमरलोकात कधीही जाणार नाही.येथेच तीन लोकात मायेचे सुख भोगेल व गर्भाचे कठिण दु:ख भोगेल. ।।२।।

**क्रोड जतन करणी करे ।। बिंद राखे मांही ।।**
**के सुखदेव तोई नाव की ।। चितवन सम नाही ।।३।।**

जो कोणी जती कठिण करणी व कोट्यावधी जतन करुन आपले विर्य शरीरातून बाहेर पडू देणार नाही,घटातच रोखून ठेवेल.अशा करणी पासून त्या जतीला ते सुख प्राप्त होईल त्याऐवजी जो कोणी संत सहजपणे सतगुरुने दाखविल्याप्रमाणे हरचे ध्यान न करता ध्यान करावे असे मनात(ही भक्ती निश्चय करतो,भक्ती करावी असे चिंततो) चिंतेल व सुख प्राप्त करेल त्या सुखाच्या बरोबरीचे सुध्दा जतीचे सुख राहणार नाही, कमी राहील.
आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात की,कठिण करणी व कोट्यावधी जतन करुन आपले विर्य शरीरातून बाहेर पडू देणार नाही घटातच रोखून ठेवेल अशा जतीला जत साधण्यात अनंत कष्ट पडतात परंतु सतगुरुने दाखविलेल्या सतस्वरुप परमात्म्याचे ध्यान मनात चिंतनात जरासेही कष्ट पडत नाही.ते सहजपणे चिंतता येते.
आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात जो कोणी संत सहजपणे सतगुरुने दाखविल्या प्रमाणे हरचे ध्यान न करता ध्यान करावे असे मनात चिंतेल तो लवकरात लवकर

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

अमरलोकात जाईल व तेथे सदाकरीता अनंत कुद्रती महासुख भोगेल परंतु जो कोट्यावधी वर्षापर्यत जत पाळतो तो कधीही अमर देशाला जाणार नाही.येथेच स्वर्गादिकाचे सुख भोगेल.सुख भोगल्यावर व सुकृत संपल्यावर वारंवार गर्भात पडून ८४ लक्ष योनीचे महादु:ख भोगेल व सदाकरीता काळाच्या जबड्यात पडला राहील.।।३।।

१९०

।। पदराग बसन्त ।।

## कहे गीता हो सुण बेद च्यार

**कहे गीता हो सुण बेद च्यार ।। हर नाँव तत्त सुई तत्त सार ।।टेर।।**

गीता पण सांगते आणि चारी वेद पण सांगतात की रामनाम होणकाळ पारब्रम्ह तत्तसाराचे ही तत्त सार आहे. ।।टेर।।

**पुराण अठारे भरत साख ।। शिव सेंस संत सो केहे भाख ।।**
**ग्रंथ ओर सब जोय जोय ।। सब माँहि बीज कण नाँव होय ।।१।।**

वेद व्यास आपल्या अठराह पुराणात रामनाम तत्तसार आहे ही साक्ष भरतात.शंकर, शेषनाग व सर्व संत रामनाम तत्त साराचे सार आहे म्हणून जपतात.असे बोलतात सर्व मोठ्याहून मोठे ग्रंथ बघून घ्या त्या सर्वात तत्तसाराचे तत्तसार रामनाम हे बीज शब्द आहे हे सांगीतले आहे. ।।१।।

**आन धरम सब मिटे हे सोय ।। सुण राम नाम जुग अटळ जोय ।।**
**परा परी लग संत क्‍याय ।। सत्त राम नाम जन केत जाय ।।२।।**

रामनाम सोडून सर्व अन्य धर्म वेळो वेळी मिटून जातात परंतु हा रामनामाचा धर्म अटळ राहतो कधी ही मिटत नाही असा हा सर्व धर्मांचा तत्त सार आहे.परापरी पासून म्हणजे आधीपासून आतापर्यंत जे ही संत बनले ते सर्व संत रामनाम ही सर्व धर्मांमध्ये सत्तधर्म आहे असे सांगून गेले आहे ।।२।।

**चवदे पुरब कथा जोय ।। हर रामायण सा ग्रंथ होय ।।**
**सब बाँच बाँच सो केहे धाम ।। सतस्वरूप सम नहिं किसन राम ।।३।।**

चौदा पुरब ची गोष्ट बघा किंवा रामायण ग्रंथची गोष्ट बघा असे मोठ मोठे ग्रंथ वाचून वाचून बघा सर्व ग्रंथ सत्तधामाचीच गोष्ट सांगतात व सतस्वरुप रामासारखे रामचंद्र व कृष्ण अवतार ही नाही असे सांगतात ।।३।।

**म्रत लोक सुर सेंस माँय ।। जिग ज्याग जप तप क्‍याय ।।**
**केत देव सुखदेव पेख ।। निजनाँव सम नही अवर देख ।।४।।**

या मृत्युलोक,स्वर्गलोक,शेषलोक म्हणजे पाताळात या निजनामासारखे यज्ञ,योग,जप, काही नाही असे ब्रम्हा,विष्णू,महादेव इ.सर्व देव सांगतात.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।४।।

३१८

।। पदराग बसन्त ।।

**मन भजिये हो नित राम नाम**

**मन भजिये हो नित राम नाम ।। जाँसे सकळ मनोरथ सजे काम ।।टेर।।**

अरे मन,नित्य रामनाम भज रामनाम नित्य भजल्याने तुझे मोक्ष प्राप्त करण्याचे व संसाराच्या सुखाचे सर्व मनोरथ पुर्ण होतील.सर्व काम पूर्ण होतील. ।।टेर।।

**ब्यास किसन रूघनाथ जाण ।। ध्रुव नारद सिनकादक आण ।।**

**ब्रम्हा बिसन महेश देव ।। नित्त पारब्रम्ह की लगे सेव ।।१।।**

व्यास,कृष्ण,रघुनाथ,ध्रृव,नारद,सनकादिक,ब्रम्हा,विष्णू,महेश नित्य पारब्रम्हची भक्ती करतात. ।।१।।

**रूषमांगद अर्जुन जन जाण ।। भिष्म द्रोण सुख संजय बखाण ।।**

**प्रहलाद पंडव अमरिष होय ।। अेभी भजे नित्त राम जोय ।।२।।**

रुखमानंद,अर्जुन,भिष्म,द्रोणाचार्य,शुक्राचार्य आणि संजय,प्रल्हाद,पांड्व,अमरीष हे सर्व नित्य रामनामाचे भजन करतात ।।२।।

**पारासर रिष रूम जाण ।। प्रथु साळ जन भ्रथ मान ।।**

**हंस ध्वज जुग रूप सूर ।। हर गाय परसीया ब्रम्ह नूर ।।३।।**

पाराशर,लोमेश,ऋषी,पृथू,शालीभद्र ,भरत ,ऋषभदेवाचा पुत्र जडभरत,रहू राजाचा गुरु, रामचंद्रचा सावत्र भाऊ,भरतखंड बसवणारा हंसध्वज,जगरुप हे सर्व ब्रम्हा,विष्णू,महादेव इ. देवता हर नामाचे स्मरण करुन सतस्वरुप ब्रम्हचे तेज समजले. ।।३।।

**पिपळाद हरी किबलाद होय ।। रिष रिषभ देव अवतार जोय ।।**

**जन केत देव सुखदेव जान ।। सब समजवान भये लीन आन ।।४।।**

पीपलाद,हरी,किंवलाद आणि ऋषभदेव चोवीस अवतार असे जे ही समजवान झाले (समजदार झाले)ज्याला काळाचे दु:ख समजले ते सर्व रामजीच्या भजनात लीन होऊन गेले असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।४।।

३९९

।। पदराग बसन्त ।।

**तो भी नही हो इण नांव सम**

**तो भी नही हो इण नांव सम ।। बिना गुरू भेद न पावे गम ।।टेर।।**

त्रिगुणी मायेची कोणती ही करणी,क्रिया,जप,हरीनामा सारखे नाही.ही हरीनामाची समज सतगुरुंपासून भेद प्राप्त केल्याने मिळते.।।टेर।।

**बन मध जाय कर ध्रत ध्यान ।। छोडे जक्त गोत कुळ सरब आण ।।**

**आसण साजे अनेका खूंद ।। नव द्वार रखे श्रब बूंद ।।१।।**

सर्व संसार,गोत्र व कुळ त्यागून वनात जातो.तेथे अनेक प्रकारचे आसन,साधना,डोळे, कान,नाक,मुख,गुदा,लिंग हे नऊ दरवाजे बंद करुन भृगुटीचे ध्यान करतात व भृगुटीत लाखो वर्षापर्यंत बसतो तरी ही हया सर्व करण्या हरीच्या नावासारख्या नाहीत. ।।१।।

**करोत झाँप देहे कंवळा चाड़ ।। प्रबत बिचे गुफा तन बाड़ ।।**
**कठण तप देहे अंग गाळ ।। फोडे भ्रम भ्रांत सो अग्यान पाळ ।।२।।**

खोल पाण्यात डुबकी घेतो,काशीमध्ये जाऊ करवत घेतो आपले शिर(डोके)उतरवून देवतांना चढवून देतो,निरमनुष्य पर्वताच्या गुफेत जाऊन राहतो,कठिण तपस्या करतात, आपले शरीर अग्नी सारखे तापवून जाळतो.सर्व भ्रम,सर्व भ्रांत्या व अज्ञानाला त्यागतो तरीही ह्या सर्व करण्या हरीच्या नामा समान नाहीत. ।।२।।

**पढे चहूँ बेद सो पिंडत होय ।। सरोधा साझ अगम केहे कोय ।।**
**करले मांड बिनासे आय ।। जो सुणई सकळ ऊर माय ।।३।।**

चारी वेदांची कळी कळी शिकून जातो.शिकून प्रविण पंडीत बनून जातो.स्वरोदयाची साधना करतात व कोणाला उमजणार नाही.अश्या अगमच्या गोष्टी सांगतात.पलात(क्षणात) सृष्टीला मिटवून पुनः सृष्टी जशीच्या तशी बनवून देतात तरीही ह्या सर्व करण्या हरीच्या नामा सारख्या नाहीत. ।।३।।

**जब तप करे अनेका कोय ।। पुन धर दया अलेखे होय ।।**
**के सुखराम कहां कहुं झोड़ ।। बिना हरि नांव नही कहू ठोड ।।४।।**

जप,तप अनेक प्रकारचे करतात.पुण्य करतात,दया बेहीशोबी ठेवतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की मी तुम्हाला कोठपर्यंत समजाऊ.इतक्या सर्व करण्या साधल्या वर ही बिना हरीनाम हरीच्या देशात जागा मिळत नाही.।।४।।

१५२

।। पदराग जेतश्री ।।

## हांती हे झुटो हे झुटो

**हांती हे झुटो हे झुटो ।। कोइ फेरे संत अफूटो ।। हाती हे झुटो हे झुटो ।।टेर।।**

यातील एक जीवपद आहे.त्या जीवपदाच्या प्रत्येक जीवासोबत आधीपासूनच मदोन्नत हत्ती सारखे कामी मन आहे.हे कामी मन जीवाला काम विकारात ढकलते जीव काम विकारात फसल्याने काळाचे महादुःख भोगतो असे महादुःख आमच्यावर आमचेच हत्ती सारखे मदोन्नत्त मन जे आधीपासून आमच्या सोबत आहे तो करतो म्हणून हे आमचे मन खोटे आहे किंवा आमच्या करीता धोखा आहे.हा मनरुपी हत्ती काम मस्तीत खुप चूर(मस्त)राहतो.त्याला काम मस्तीतून काढून वैराग्यात ठेवणे खुप कठिण आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज जगातील लोकांना तसेच ज्ञानींना सांगत आहेत की,अश्या कामी हत्तीला जगातील सर्व साधु,संत,देवता संतांमध्ये जे बंकनाळेने चढतो असे अनंत

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

साधु संतांमध्ये जे बिरला संत आहे तेच त्या हत्तीवर स्वार होऊन त्याला वैराग्यात ठेवतात.अन्य होणकाळाच्या कोणत्या साधकाने तो मनरुपी हत्ती वैराग्यात राहत नाही. ।।टेर।।

**मोरो बदेन आकस माने ।। साँकळ गिणे न खूंटो ।।**
**ब्रम्हा बिस्न महेसर खसीया ।। नेकन फिऱ्यो अफूटो ।।१।।**

जगातील हत्ती हा प्राणी कितीही मदमस्तीत राहीला तरी तो म्होरक्याने बांधला जातो. म्होरक्याने दाखविलेल्या अंकुशने घाबरतो.लोखंडाच्या साखळीने बांधून खुट्याला बांधला जातो.परंतु हा कामी मनरुपी हत्ती हा कसा ही मायेचा ज्ञानी जीव राहो त्याच्या ज्ञानाने कोणत्याही प्रकारच्या अंकुशाला धरत नाही.त्याच कारणाने मनरुपी हत्तीला ज्ञानी जीव ज्ञान खुटीला बांधू शकत नाही.ब्रम्हा,विष्णू,महादेव हे कामी मनरुपी हत्तीला बैरागी बनविण्यात मेहनत करुन-करुन हारुन गेले परंतु यांच्याने हा कामी मनरुपी हत्ती थोडाही कामातून वैराग्यात बदलला नाही. ।।१।।

**षट सो जती दत्त की मईया ।। ऊण सूंई कियो चपेटो ।।**
**मुन्याँ रिषा घेर घेर राख्यो ।। तोई रेगयो छुटो ।।२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात या मनरुपी हत्तीने पुरुषांमध्ये लक्ष्मण, गोरखनाथ,हनुमान,सुखदेव,बाद्रायणी,कार्तिक स्वामी,गरुड या सहा यतींना तसेच स्त्री मध्ये दत्तची माता अनुसयेला कामच्या चपेटमध्ये घेतले होते.या मनरुपी कामी हत्तीला मुनी,ऋषींनी घेरुन-घेरुन कामापासून दूर ठेवले होते तरी ही यांचे कामरुपी मन कामक्रिडे मध्ये सुटलेलेच राहीले म्हणजे खुल्ले राहीले. ।।२।।

**त्यागी तपी सुर्वा ऊपर ।। कोप करे कर तूटो ।।**
**जुग तो सकळ देखतां भागो ।। अड़बड़ बासण फूटो ।।३।।**

शूरवीर त्यागी,तसेच शूरवीर तपस्वीनी युगानुयुग त्यांचे मनरुपी कामी हत्तीला कामा-पासून दूर ठेवले परंतु तो मनरुपी हत्ती उलट शूरवीर त्यागी,तपस्वी वर कोप करुन सुटून पड्ला.देवता,सती,स्त्री,ऋषी,मुनी,तपी,त्यागी सोडून अन्य जगातील सर्व लोक या कामी मनरुपी हत्तीला जसे मातीचे भांडे तिरपे पडून फुटून जाते तसे फुटून त्याला कामातून वैराग्यात आणण्याच्या आधीच दूर पळतात.।।३।।

**ऊलटा होय गिगन में चडीया ।। ज्याँ काटो कर पिटयो ।।**
**जन सुखराम समाधी पूंता ।। ज्यांहां आपल मर खूटो ।।४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,जे संत उलटून ब्रम्हांडात चढून गेले त्यांनीच या मनरुपी हत्तीवर कठोरतेने हावी होऊन विज्ञान वैराग्याने ठोकले.असे संत दहाव्याद्वारी ब्रम्हाडांत समाधीत पोहचतात तेंव्हा त्यांचा मनरुपी कामी हत्ती आपोआप मरुन समाप्त

होऊन जातो. ।।४।।

१८२

।। पदराग मंगल ।।

जुग बडाई छाड

जुग बडाई छाड ।। नाव निज गावसी ।।
जांके आ सिध्ध पेल ।। सुणो सब आवसी ।।१।।

संसारात मिळालेली शोभा मोठेपण त्यागुन निजनामाला कोणी संत गाईल(भजन करेल) त्याला अटकविण्याकरीता सिध्दांपासून ब्रम्हा,विष्णू,महादेव हे ही येतील.सर्वात प्रथम सिध्दाई अटकविण्याकरीता येईल हे सर्व ऐकून घ्या ।।१।।

अणभे होय उच्चार ।। अग्या बोहो लेत हे ।।
यां राखे अे घेर ।। चलण नही देत हे ।। २ ।।

असे निजनामाने स्मरण करणाऱ्या संतांमध्ये अणभै म्हणजे पद,साखी,बोलणे सुरु होईल असे अणभै जागृत होताच अटकविण्यासाठी शिष्य,चेले खूप बनतील.ते शब्दात व प्रश्नां मध्ये येथेच घेरुन ठेवतील.पुढे जाऊ देणार नाही. ।।२।।

सिष चेला सब छाड ।। नांव सूं लागसी ।।
ज्यां देवत चल आय ।। सिध्ध ब्हो जागसी ।।३।।

शिष्य चेले त्यागून नामात लागला तर त्या दिवशी संतांपासून नाम सोडविण्याकरीता सर्व देव चालत येतील व अनेक सिध्दाईया जागृत होऊन जातील.देवता काम करु लागतील व जे मुखाने सांगतील ते व्हायला लागून जाईल ।।३।।?

सिध सूं रीजे नाय ।। देवां कूं फेरसी ।।
तां दिन ब्रम्हा महेस ।। बिस्न सो घेरसी ।।४।।

सिध्दाई तसेच देवांच्या चमत्कारांत खुश होऊन अटकला नाही.त्यांना परत फिरवून तो त्या दिवशी ब्रम्हा,विष्णू,महादेव घेऊन नाम सोडण्यास घेरुन घेतील. ।।४।।

यां इतना की रीज ।। मान छिटकाईये ।।
तां दिन केहे सूखदेव ।। ब्रम्ह लग जाईये ।।५।।

या सर्व ब्रम्हा,विष्णू,महादेवाची मेहेर बाणी मानने ज्या दिवशी धुड्कवून लावेल त्या दिवशी आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात तो संत सतस्वरुप ब्रम्हमध्ये पोहचेल.।।५।।

२०३

।। पदराग जोगारंभी ।।

किस बिध मिलीये हो राम सूं

किस बिध मिलीये हो राम सूं ।। आडा बेरी अपार ।।
जब चालूं हर मिलण कूं ।। ल्हे बिचे मुज मार ।।टेर।।

मी रामजीसी कशे जाऊन मिळू?मी रामजीला भेटण्यास जातो तर रस्त्यात अपार वैरी आड्वे येतात व ते मला रस्त्यातच मारतात,चेंगरुन टाकतात.।। टेर ।।

**लोभ नदी भारी बहे ।। पींदे सांसा सूळ ।।**
**पांच पोरायत तीरपे ।। ऊभा कर कर झूल ।।१।।**

रामजीच्या रस्त्यांत भारी वाहणारी लोभ नदी लागते.त्या नदीच्या तळात चिंतारुपी मोठ मोठे काटे आहे.नदी पार करु नये म्हणून नदीच्या किनाऱ्यांवर हे पाच इंद्रियांचे पाच विषय पहारा देतात म्हणजे विषयात अड्कविण्यासाठी उभे आहेत.ते रामजीची भक्ती करण्यात अड्थळे टाकतात. ।।१।।

**मोहो का बंधण साबळा ।। सबळी कर्मा की फोज ।।**
**काम कटक भारी घणो ।। करड़ी नारी दी मोज ।।२।।**

मला कुटुंब परिवाराच्या मोह बंधनाने मजबूत बांधून ठेवले आहे.मी केलेल्या पाप कर्मांची फौज माझ्या मनात कुबुध्द्या प्रगट करते.माझ्या घटात कामदेवाची खुप मोठी फौज आहे व स्त्री मौज खुप कड्क आहे.हे सर्व मला रामजीच्या देशास जाऊ देत नाही.।।२।।

**भ्रम अंधारा बन मे ।। गेलो सूझे नई कोय ।।**
**सिंघ अग्यान धड़ कियो ।। मे ते न्हारी दोय ।।३।।**

माझ्यात भ्रम रुपी अंधार घनघोर बनला आहे.त्याच्यात मला रामजीच्या देशाचा रस्ता सुचत नाही.माझ्या घटात अज्ञान रुपी सिंह गर्जना करतो आहे.त्या अज्ञानरुपी सिंहाच्या सोबत माझी,तुझी ह्या दोन वाधिण्या राहतात.असे-असे वैरी रामजीला भेटण्यास जातो तेव्हा रस्त्यात लागतात.।।३।।

**दुर्मत दासी बोहो रे वे ।। नित पित मुज कुं आय ।।**
**डीग पच दाणू दायली ।। बेठो गेले माय ।।४।।**

माझ्यात विषय विकारांची अनेक प्रकारची दुर्मती वेश्या राहतात.ह्या दुर्मती वेश्या माझी रामजीकडे जाण्याची मती पिऊन घेते.हरी मिळण्याच्या रस्त्यांत डिगपिच(संकल्प विकल्प करणारा)राक्षस बसला आहे.ते डिगपिच(संकल्प विकल्प)मत हरीच्या रस्त्यात पोहचविणाऱ्या मताला मारुन टाकतो.।।४।।

**सेंस अठयांसी घाट हे ।। बेरी अंनत अपार ।।**
**बिषम गेला साहिब दीस ।। ब्हो अंतर उर मार ।।५।।**

हरी मिळण्याच्या मताच्या रस्त्यात अठ्ठाशी हजार ऋषीमुनींचे वेगवेगळे मत मोठमोठ्या घाटासारखे आहे.आणखीही वैरी खुप(अनंत)आहे,अपार आहे हा साहेबाकडे जाणारा रस्ता खुपच विषम म्हणजे बिकट(कठिण)आहे ते अंतरात(ह्रदयात)खूप मार देतात.

।।५।।

जन सुख देवकी बीणती ।। सुणज्यो सतगुरू स्याम ।।
तुम ऊपर नित राखज्यो ।। ज्यूँ पूंतुं निजधाम ।।६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज विनंती करतात की,हे सतगुरु स्वामी आपण माझ्यावर लक्ष ठेवा.आपले माझ्यावर लक्ष राहील्याने मी निजधामास पोहचून जाईल.।।६।।

२११
।। पदराग गोडी ।।

माधोजी भक्त कोण बिध धारूं ।।
ओ जुग सेंग फिरे मन आडो ।। किण किण कूं के मारूं ।।टेर।।

येथे माधोजी म्हणजे कृष्ण किंवा विष्णू नाही आहे.कृष्ण किंवा विष्णु हे ज्या मालकाला भजता आहेत असे सर्व सृष्टी व आत्म्याचे मालक केवली भगवंताला संबोधले आहे. आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी या पदात माधोजी म्हणजे परमात्म्याची भक्ती करण्यात कश्या कश्या अडचणी येतात हे माधोजी म्हणजे केवली भगवंताला दु:खी होवून सांगितले आहे.हे माधोजी,हे केवळ भगवंत मी तुझी भक्ती कोणत्या विधीने धारण करु?हा सर्व संसार,हे माझे मन तुझी भक्ती धारण करण्याच्या आड्वे येत आहे मी कोणाकोणास मारु? ।।टेर।।

काम क्रोध लोभ मन लालच ।। पल पल आण सतावे ।।
जे म्हे भजन भगवत को थांपू ।। तो दुणा होय होय आवे ।।१।।

हे माझे काम, क्रोध, लोभ, लालुच, मोह, ममता,मत्सर,अहंकार मला पळापळात येवून सतावतात.हे भगवंत,जेव्हा मी तुझे भजन ध्यान करतो तर हे माझे काम,क्रोध,लोभ, लालुच,मोह,ममता,मत्सर,अहंकार नेहमी पेक्षा दुप्पट होवून होवून मला घेरतात व सतावतात.हे माधोजी, मी कोणा कोणाला मारु? ।।१।।

घर घर गांव हताया माही ।। निंद्या करे सब लोई ।।
आ सुण ताप करारी कहीये ।। धारी धरे न कोई ।।२।।

चौका चौकात,घरा घरात,गावा गावात माझी लहाणांपासून मोठ्यांपर्यंत सर्व स्त्री,पुरुष निंदा करतात.या निंदेचा ताप म्हणजे कष्ट खूपच कठोर(कठीण)आहे.अशा कठोर तापाच्या समोर तुझी भक्ती धारण्यात माझे मन टिकू नाही शकत आहे.।।२।।

ब्रम्हा विस्न महेसर देवा ।। अे सब पाले आई ।।
केवळ भक्त ब्होत हे दोरी ।। सो कुण निभे मन भाई ।।३।।

ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती यांचे ज्ञानी,ध्यानी,साधू,सिध्द हे सर्व मला मायेच्या सुखांचे पर्चे चमत्कार पुन्हा पुन्हा दाखवून तुझी भक्ती करण्यापासून अटकवितात.अशी ही तुझी भक्ती केवळ भक्ती खूप दोरी(कठिण)आहे.ही भक्ती निभवणे खूप मुश्किल

आहे.ही कोणाच्याने निभली जाईल?असा जीव मनाला प्रश्न करतो आहे.।।३।।

**बेरी घणा सेण नहि कोई ।। बरजत हे कुळ सारो ।।**
**के सुखराम गुरां बिन जुग मे ।। सब सूं दुस्मण चारो ।।४।।**

हे माझे कुटुंब परीवाराचे लोक तुझी भक्ती धारण करण्यास मनाई करतात.असे हे सर्व संसार,माझे मन,माझा काम,क्रोध,लोभ,लालुच,मोह,ममता,अहंकार,निंद्यक,ब्रम्हा,विष्णु, महादेवचे साधू,सिध्द,कुटूंब परिवार असे असे इत्यादि सर्व तुझी भक्ती धारण न करु देणारे वैरी खूप आहेत. ।।४।।

२५०
।। पदराग मंगल ।।

**नाव न केवळ कोय**

**नाव न केवळ कोय ।। संभावे आय के ।।**
**तां पर अे समसेर ।। गहे हे जाय के ।।१।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे न केवळ नाम कोणी येऊन धारण करेल,तर त्याच्यावर(न केवळ नाम धारण करणाऱ्यावर हे खाली लिहीले गेले)तलवार उचलुन धरतात. ।।१।।

**ब्रम्हा बिसन महेस के ।। सगत बोलावसी ।।**
**धमराय की फोज ।। उमंग सिर आवसी ।।२।।**

ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ति(मायेला)घेऊन येतात आणि धर्मरायाची फौज(उल्हासने) शिरावर येतील.।।२।।

**अठ सिध नव निध जोय ।। आण अे घेरसी ।।**
**अे सब गूंथे डाव ।। आप दिस फेरसी ।।३।।**

अष्ठ सिद्धी आणि नऊ निद्धी यांना एकत्र घेऊन(न केवळ नाम धारण करणाऱ्याला यांच्या पासून)पहा,आणून घेरा देते.हे सर्व आपआपले दाव लावून(नकेवळ नाम धारण करणाऱ्याला,आपल्या पेचमध्ये घेऊन आपल्याकडे घुमवतील. ।।३।।

**याँ पाँचा की म्हेर ।। केर सम जाणिये ।।**
**सतगुरू के बिन ग्यान ।। धाड़ा सब ठाणि ये ।।४।।**

या पाचींनी (ब्रम्हा, विष्णु, महादेव, शक्ति आणि धर्मराय, यांनी आपल्यावर) मेहेर केली, (म्हणजे आपल्या आत)पुष्कळ कसर पडून गेली.(आमची खूप हानी होवून गेली.)असे समजा. सतगुरुच्या ज्ञानाच्या शिवाय या सर्वांना धाडायती म्हणजे डाकू समजा. ।।४।।

**सुख दुख दोनू जीतं ।। रटे निज नांव कूं ।।**
**से पूंचे सुखराम ।। ब्रम्ह के गांव कूं ।।५।।**

जर कोणी सुख आणि दु:ख या दोघांना जिंकुन(सुखात आंनदी होवु नका आणि दु:खात नाराज होवु नका.)रामनाम हे निजनाव आहे या निजनामाचे रटण करेल तर तो,आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,ते सतस्वरुप ब्रम्हच्या गावाला पोहचेल.।।५।।

३१४

।। पदराग कल्याण ।।

**साधो भाई मै तो शीश ऊकरडी कीया ।।**

**भावे नंदो बंदो कोइ जुग मे ।। सब तज निजपद लीया ।।टेर।।**

साधू बंधू,मी तर माझे डोके उकिरड्या सारखे बनवून घेतले आहे.(उकिरडा म्हणजे जेथे प्रत्येक प्रकारचा कुडा-कचरा फेकला जातो,त्याला धूरा पण म्हणतात.जसे उकिरड्यावर कसाही कूडा-कचरा किंवा वाईट पदार्थ काही टाका तरीही तो उकिरडा काही म्हणत नाही.)तर त्याच्यासारखे मी पण माझे डोके उकिरड्या सारखे बनवून घेतले आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व साधु बंधूंना सांगत आहे की जगाचे लोक माझी निंदा करोत वा महिमा करोत मी ही निंदा वा महीमा ऐकणे सर्व सोडून दिले तसेच मी काळाच्या पलिकडील महासुखाचे निजपद घेतले आहे.।। टेर।।

**भूंडो भलो केहे सो केलो ।। मै दोनुं बिध छाडी ।।**

**सुभ सो असुभ सकळ तजि रीता ।। सुरत साहेब दिस गाडी ।।१।।**

मला चांगले म्हणा किंवा वाईट मी दोन्ही विध्या त्यागल्या आहे मी त्रिगुणी मायेच्या शुभ देवतांची विधी तसेच नरकाची अशुभ राक्षसी देवतांच्या विध्या त्यागून दिल्या आहे आणि माझी निज सुरत फक्त साहेबाच्या दिशेत गाडून दिली आहे.(लावून दिली आहे.) ।।१।।

**लाज सरम जुग मरजादा ।। अे मो मन नहि भावे ।।**

**साहेब साध ग्यान की लज्या ।। उलट बोहोत घट आवे ।।२।।**

साहेब तसेच साधूंच्या ज्ञानामध्ये लागल्याने जगातील स्त्री-पुरुष कोणी निंदा करेल, वाईट बोलेल ही काळाच्या मुखात टाकणारी जगाची लाज,शरम,तसेच मर्यादा माझ्या निजमनास आवडत नाही उलट काळाच्या मुखातून काढणारी साहेब व साहेबाच्या साधूंच्या ज्ञानात कोणती कसर न पडो ही लाज माझ्या हंसाच्या घटात नेहमी खुप येते. ।।२।।

**तीन लोक का नंदत बंदत ।। अेक न मानु काई ।।**

**के सुखराम गुरू सत्त म्हाने ।। अेसी चीज बताई ।।३।।**

३ लोक १४ भवनचे सर्व जीव मला निंदो किंवा वंदो ही एक ही वस्तू मी मानीत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की मला माझ्या गुरुने अशी सत्त वस्तू सांगीतली आहे ज्या कारणाने माझी निंदा होण्याने दु:ख व महिमा होण्याने आनंद हे मला थोडे ही

होत नाही.।।३।।

२०

।। पदराग जोग धनाश्री ।।

अेसे क्हे जुग दाय न आवे

अेसे क्हे जुग दाय न आवे ।। केई साव चोक बतावे रे लो ।।टेर।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज या पदात सांगतात की ज्याने मन जिंकले त्याला हे जग चांगले वाटत नाही असे मुर्ख लोक म्हणतात तसेच मन जिंकले यावर अनेक हुशारीच्या गोष्टी सांगतात ।। टेर।।

मन जीते तो अेसा व्हे हे ।। हाले न ड़ोले न चाले रे ।।

भोग बिलास करे नही कबहूँ ।। साच न झुट न पाले रे लो ।।१।।

जसे ज्यांनी मन जिंकले आहे.तो शरीराने हालत नाही,डोलत नाही,चालत नाही तो पाच इंद्रीयांचे भोग विलास कधी करत नाही.तो सत्य,असत्य,दया,क्रुर अश्या सर्व विषयांचे परे राहतो. ।।१।।

माया की क्हे चाय न उनके ।। न सिष साखाँ जोड़े रे ।।

अणभे क्है नही ग्यान बतावे ।। काहूँ सूं हेत न तोड़े रे लो ।।२।।

ज्याने मन जिंकले त्याला स्थुल माया जसे धन,राज,कुल,पत्नी,पुत्र इं.ची चाहणा राहत नाही.तसेच तो शिष्य शाखा पण जोड्त नाही.तो साहेबाचे अनुभव सांगत नाही आणि कोणाला साईचे ज्ञान ही सांगत नाही तो कोणाशी प्रितीही करीत नाही,कोणाशी वैर ही ठेवत नाही असे सर्व मुर्ख लोक सांगतात.।।२।।

स्हेर नगर ना बस्ती रेहे ।। नाँ कोई झूँपा बांधे रे ।।

सुणे नही सीखे केहे नही काई ।। सुरत नाँव दिस सांधे रे लो ।।३।।

ज्याने मन जिंकले तो मोठ्या शहरातही राहत नाही.छोट्या वस्तीत कधी राहत नाही. तसेच तो राहण्यांकरीता घर तर काय झोपडी सुध्दा बांधीत नाही.ज्याने मन जिंकले तो कोणा कड्नही ज्ञान ऐकत नाही.कोणापासून ज्ञान शिकत नाही.तसेच कोणाला ज्ञान शिकवत नाही.तो अश्या मायेच्या कोणत्या चरित्रात पड्त नाही फक्त आपली सुरत सतनामात साधतो.।३।

के सुखराम कोई नही जीता ।। प्रालबद दु:ख देवे रे ।।

बिना भजन सब पळे जासी ।। जीतर युं क्या लेवे रे लो ।।४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असे जो करतो त्याने काही मन जिंकले नाही.ते मनुष्य देहांच्या १०० वर्षांकरीता भोगण्याकरीता आणलेले प्रारब्ध कर्म आहे.जसे तो भोगतो,शरीराने हालत नाही,डोलत नाही,चालत नाही,वस्तीत राहत नाही,नगरात राहत नाही,झोपडी बनवत नाही,संसार बनवत नाही इ.आणलेल्या प्रारब्ध कर्मांमुळे

दु:ख भोगतो.समजा याप्रकारे दु:ख भोगून मन जिंकून ही घेतले तरी परमात्म्याच्या भजना शिवाय असे सर्व दु:ख कर्म भोगल्याने त्याचा होणकाळ कसा सुटेल?जो पर्यंत त्याचे मुळ मन मरत नाही व संचित कर्म नष्ट होत नाही तोपर्यंत(करणारे)सर्व होणकाळाच्या मुखात पडून प्रलयातच जातील. ।।४।।

४१३

वे जन जीता तां कूं मारी

**वे जन जीता तां कूं मारी ।। ओर हट दिन च्यारी रे लो ।।टेर।।**

ज्या जनांनी(संताने)मनाला मारले आहे आणि मनाला जिंकले आहे.दुसरे तर हे(मनाला जिंकण्याचा)हठ करतात.ते चार दिवसाचा यांचा हट्ट आहे.(जास्त यांचा हट्ट चालत नाही.) ।।टेर।।

**काया जीत चडया जन ऊँचा ।। त्रगुटी आसण किया रे ।।**
**ध्यान समाध लगी ज्याँ जिनके ।। वाँ मन जीतर लिया रे लो ।।१।।**

त्याच संतानी(मनाला जिंकले आहे)की,जो काया(शरीराला)जिंकून,ते संत ब्रम्हांडात चढून गेले आहे आणि त्यांनी त्रिगुटीत जाऊन आसन केले आहे.त्यांचे ध्यान लागुन समाधी लागुन गेली आहे.त्यांनीच आपल्या मनाला जिंकून घेतले आहे. ।।१।।

**जंत्र मंत्र अेक न सीखे ।। साजे नाय सरो धारे ।।**
**केवल राम रटे अे राती ।। सो जीता मन जोधारे लो ।।२।।**

(ज्यांनी मनाला जिंकून घेतले आहे)ते यंत्र व मंत्र एकही शिकत नाही आणि स्वरोदयाची साधनाही करीत नाही.ते रात्रंदिवस फक्त एक कैवल्य राम नामाचे रटन करतात. त्यांनीच या मनासारख्या योध्याला जिंकले आहे. ।।२।।

**सुख दु:ख दोनो झूटा जाणे ।। आनदेव नही माने रे ।।**
**साचा सांम ब्रम्ह हे केवळ ।। दूजा हट बखाणे रे लो ।।३।।**

(ज्यांनी मनाला जिंकून घेतले आहे)ते सुख आणि दु:ख,या दोघांनी खोटे समजतात आणि कोणत्याही दुसऱ्या अन्य देवाला मानत नाही.खारा(सत्य)स्वामी,तर कैवल्य ब्रम्ह आहे आणि त्याच्या शिवाय दुसरे सर्व हठ आहे,असे लोकही सांगतात. ।।३।।

**सुरत निरत मन ऊँचा चाड्या ।। आद जाग घर आया रे ।।**
**वां मन जाय बंधाणो सेजाँ ।। डोल न सक्के भाया रे लो ।।४।।**

त्यांनी आपली सुरत आणि निरत व मनाला वर(गगनात)चढून दिले आहे.ते आदि घरी घेऊन गेले.तेथे जाऊन हे मन सहजच बांधले आहे.(तेथे वर जाऊन बांधलेले मन) इकडे तिकडे हलू शकत नाही.(त्रिगुटीच्या पुढे गेलेले मन,त्रिगुटीत बांधले गेल्याने, आपल्या आपणच मारले जाते.) ।।४।।

**देहे बोहार सो देख ना भूलो ।। हरजी आप बणाया रे ।।**
**के सुखराम मन बिध जीतण ।। सुणो इसी बिध भाया रे लो ।।५।।**

संताच्या देहीचा व्यवहाराने कोणी भुलू नका.(की हे वाईट चालीचे आहे,असे जाणून भुलू नका.)या संताचे स्वभाव चांगले किंवा वाईट खुद्द आपण रामजीने केले आहे.तर मनाला जिंकण्याची ही विधी आहे.ते ऐकून घ्या,असे आदि सत्गुरु सुखरामजी महाराज सांगतात. ।।५।।

४२४

।। पदराग जोग धनाश्री ।।

**या पारख बिन भ्रम न तुटे**

**या पारख बिन भ्रम न तुटे ।। दुजी करे सो झुटी रेलो ।। टेर ।।**


या सतस्वरुप आनंदपदाच्या ज्ञान परीक्षेच्या आधाराच्या पारख शिवाय मन जिंकले किंवा मेले हा भ्रम सुटत नाही.दूसरी परीक्षा म्हणजे त्रिगुणी मायेच्या आधारे मन जिंकले किंवा मारले ही परीक्षा करतात ती परीक्षा खोटी आहे ।।टेर।।

**मन जीते का अंग बताऊँ ।। सुणो जक्त संत सारा रे ।।**
**आठ पोहोर मुख राम रटत हे ।। वाँ जन मन कूं मान्या रेलो ।।१।।**

मनास जिंकणाऱ्याचा स्वभाव मी दाखवितो.ते सर्वही जगत व संत ऐका,ते मनास जिंकणारे रात्रंदिवस,अष्टौप्रहर तोंडाने रामनाम रटतात.त्याच जनाने(संताने)मनास मारला आहे.।१।


आदिपासून दोन पद आहेत.

१.सतस्वरुप पद २.होणकाळ पारब्रम्हचे पद ३.इच्छा त्रिगुणी मायापद ४.जीवब्रम्हपद





हंस मनाला वश आहे. मन

मन म्हणजे हंसाचे मन जिवंत आहे.




त्रिगुणी मायेचा संत आठोप्रहर म्हणजे चोवीस तास मुखात त्रिगुणी माया म्हणजे रजोगुण ब्रम्हा,सतोगुणी विष्णु,तमोगुणी महादेव यांना जपत राहतो. म्हणजे वासनेत लिप राहतो.

हंसाने मनाला जिंकले आहे म्हणजे हंसाने मनाला मारले आहे.




तो संत आठोप्रहर म्हणजे चोवीस तास मुखाने राम रटतो म्हणजे विज्ञान वैराग्यात राहतो.

खाँवत पीवत बोलत चालत ।। धंदे माँय पुकारे रे लो ।।
फोगट बात मंढी कूं त्यागे ।। सो जन मन कूं मारे रे लो ।।२।।

खातांना,पितांना,बोलतांना,चालतांना किंवा धंद्यात त्रिगुणी मायाला म्हणजे विकारी माया किंवा अवतारांना बोलावतो किंवा मढीत जाऊन त्रिगुणी मायाचे विकारी विषयात रस घेतो.

खातांना,पितांना,बोलतांना,चालतांना किंवा धंद्यात सतशब्दला बोलावतो.खोटी मायाचा विषयात किंवा साँई सोडून अन्य विषय जेथे चालतात अशा मढीला त्यागतो.

।।२।।

देहे बोहार गिरे मे बेठा ।। प्रेम करक लिव भारी रे ।।
दोनु होट चले बहु रसना ।। वां जन ममता मारी रे लो ।।३।।

देहाचा प्रारब्धातून आणलेले संसारी व्यवहार त्यागुन वनात जातो व त्रिगुणी मायाचा जपात, तपात तनाचे व मनाचे हट करुन त्रिगुणी माया पेक्षा भारी लीव लावतो,दोन्ही होठ व जीभ ममता मध्ये भारी चालवतो म्हणजे दोन्ही होठ व जीभ माझे घर,माझे राज,माझा धंदा,माझी पत्नी, माझे पुत्र इ. मायावी वस्तुचे माझेपणचे लगावात भरपूर चालवतो.

गृहस्थी बनून देहाचे संसारी व्यवहार पूर्ण करतो म्हणजे कर्माचे घेने देण्याचे बदले पूर्ण करतो सतस्वरुप साँईचा प्रती अकबक प्रेम करतो व भारी लीव लावतो.दोन्ही होठ व जीभ साँईचा नामात,जपात भारी चालवतो व माझा साँई,माझा सतस्वरुप,माझा परमात्मा,माझा सतगुरु याप्रकारे होठ व जीभ सतस्वरुपचा माझेपणाचा लगावात चालवतो.अशाप्रकारे मायाची ममता मारतो.

।।३।।

जोत्यो बेल जुँवाड़े लागो ।। सुध गेल संभावे रे ।।
मूरख कहे चरे क्युँ चारो ।। जे ये नगरां जावे रेलो ।।४।।

(कोणी म्हणतात,यांनी ममता व मनास मारले आहे. तर भाकर का खातात,घरचा धंदा का करतात,असे मुर्ख लोक म्हणत असतात.)तर गाडीस बैल जुतलेला आहे व सरक्या रस्त्याने गाडी जुतलेला बैल चालुन राहिला आहे.त्या बैलाने गाडीस जुंपलेला चालता चालता बाजूस असलेल्या चाऱ्याने तोंड भरुन घेतला.तर त्यास कोणता मुर्ख म्हणेल की हा बैल तर चारा चरतो.(अरे या बैलाने धावता धावता तोंडात चारा घेऊन घेतला तर याने काय चालणे सोडले किंवा बाजूस चालला गेला व उबजून दिला.जू खांदिचा टाकून दिला काय.या रस्त्याने हा तर धावत आहे.मग चालता चालता चारा खाण्यात काय हरकत आहे.याच तऱ्हेने हे घरात राहून भजन तर करतात व भजन करता करताच देहीची क्रिया खाणे,पिणे वगैरे करुन घेतली व रात्रंदिवस भजन करतात.

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

तर यांना मुर्ख लोक जसा बैलास चारा का चरतो म्हणणारे,यांनाही शरीराची क्रिया का करतात म्हणून म्हणतात.)मूर्ख लोक बैलास म्हणतात,जर हा नगरास(गावास)जातो तर चारा का चरतो.(असेच हे परलोकास जातात,तर घरचा धंदा का करतात असे म्हणतात.) ।।४।।

**जीतां बिना भजे नही कोई ।। पल पल बीसर जावे रे ।।**

**क्हे सुखराम इण मन की पारख ।। रटणा से गम पावे रे लो ।।५।।**

याप्रकारे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मनाला जिंकल्याशिवाय सतस्वरुप रामाचे भजन कोणी करीत नाही आणि कोणाकडून होत नाही.जर एखादा कोणी स्मरण ही करेल तो क्षणा–क्षणात स्मरण करणे विसरुन जाईल आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,ही मन जिंकण्याची तसेच मरण्याची परीक्षा या रामनामाच्या रटल्याने समजते.जे रामनाम रटत नाही व त्रिगुणी माया रटतात त्यांना मन त्रिगुटीत कसे मरते हे समजत नाही.जे रामनाम जपतात त्याला रामनाम रटण्याच्या आधी हे मन जीवावर कसे हावी व जीवाला वशमध्ये(ताब्यात)ठेवून त्रिगुणी मायेचे तसेच ५ वासनांच्या विकारात ठेवते किंवा तेंव्हा जीवाला त्रिगुणी माया कशी खरी व पूर्ण वाटत होती.तसेच ५ सुख हेच पूर्ण व खरे वाटतात.परंतु जेंव्हा मन मेले व सतस्वरुप तसेच ५ आत्म्यांचे ५ सुख खोटे विकारी तसेच भ्रम वाटतात(दिसतात)।।५।।

१०२

।। पदराग बसन्त ।।

**धिन धिन हो धिन राम नाम**

**धिन धिन हो धिन राम नाम ।। तासे अखंड अर्ध पर सेज धाम ।।टेर।।**

धन्य आहे,धन्य आहे या रामनामास धन्य आहे.या रामनामाच्या रटण्याने पूर्ण घटात (शरीरात)अखंडीत अर्धनाव प्रगट झाले आहे.त्या अर्धनावाच्या धामात मी वास करतो.(राहतो.)रामजी प्रगट होण्याआधी माझ्या घटात(शरीरात)विषय वासनेचे धाम होते.मी अश्या (विषारी)धामात निरंतर राहीलो परंतु रामजीने विषय वासनेला भस्म करुन राम नामाचे धाम बनवून दिले म्हणून रामनामाला पुन्हा–पुन्हा धन्य आहे,धन्य आहे.।।टेर।।

**प्रथम धिन सत्त संग होय ।। ज्याँ गुरूदेव मिलिया मोय ।।**

**भाँज भाँज सो भरम जाण ।। निरभे ग्यान दिया उर आण ।।१।।**

प्रथम धन्य सतसंगताला आहे.त्या सतसंगतच्या कृपेने मला गुरुदेव मिळाले आहे. गुरुदेवांच्या कृपेने माझे सर्व भ्रम तुटून पळून गेले आहे.माझ्या सतगुरुंनी माझ्यामध्ये काळाच्या पलिकडील निर्भय देशाचे ज्ञान प्रगट करुन दिले. ।।१।।

**पूरब जनम हमारो धिन ।। सुखरत सुभ किया इण मन ।।**

**ताँ की बिध अब मिली आय ।। राम धुन लागी उर माँय ।।२।।**

।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

माझ्या पूर्व जन्मात माझ्या मनात रामजीच्या देशाचे काही चांगले कर्म केले आहे.या कारणाने घटात अर्धनाम म्हणजे ररंकार प्रकट करण्याची विधी मला मिळाली आहे व या विधीने माझ्या ह्रदयात आर्धनामाची धुन लागून गेली आहे.।।२।।

**धिन धिन भाग हमारो जान ।। ताँके मित रामसा हुवा आन ।।**

**दुख सुख भरम मिटाया दोय ।। सुरग नरक साँसो नहिं कोय ।।३।।**

माझे भाग्य धन्य आहे,या कारणाने माझे रामजी माझे मित्र बनले.माझे मित्र रामजीने माझे सर्व होणकाळाचे दोन्ही दु:ख सुख व त्रिगुणी मायेला सत्य समजून तिच्यात तृप्त सुख शोधण्याचा भार भ्रम मिटवून दिला आहे.आता मला स्वर्गाचे सुख व नरकाचे दु:ख या दोघांची फिकीर(चिंता)राहीली नाही.रामजीने मला स्वर्गाचे सुख व नरकाचे दु:खाच्या पलिकडील दु:ख रहीत अखंडीत महासुखाच्या देशात पाठवून दिले आहे.।।३।।

**धिन धिन मन हमारो होय ।। जिन हर भगत संभाई जोय ।।**

**आठ पोहोर रटयो निज नाँव ।। के सुखराम सरे सब काम ।।४।।**

माझे मन धन्य आहे,धन्य आहे.याने विषय वासनेचे सुख त्यागून रामजीची भक्ती धारण केली आहे.या माझ्या मनाने आठ प्रहर चोवीस तास निजनाम धारोधार रटले आहे. ज्याच्याने माझे काळापासून सुटण्याचे सर्व कार्य पूर्ण होऊन गेले आहे.।।४।।

१०५

।। पदराग भेरू (प्रभाती) ।।

**धिन धिन सो नर नारी जुग मे**

**धिन धिन सो नर नारी जुग मे ।। धिन धिन सो नर नारी ।।**

**साहेब काज झुरे निस वासर ।। कुबुध्द प्रित सो टारी ।।टेर।।**

हे स्त्री पुरुष साहेब प्राप्त करण्याकरीता रात्रंदिवस झुरतात व ज्या त्रिगुणी मायेच्या ब्रम्हा, विष्णू,महादेवाच्या मायेच्या भक्तीने साहेब प्राप्त करणे होऊ शकत नाही अश्या कुबुध्दी प्रीती करणे टाळतात ते धन्य आहे,धन्य आहे.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।टेर।।

**भक्त करण को लग्यो ऊमावो ।। ओ मन चडीयो आड़े ।।**

**राम राम क्हैता दिन बिते ।। मुख मे जीभ न बाड़े ।।१।।**

ज्या स्त्री–पुरुषांना साहेबाची भक्ती करण्यात उल्हास येतो व जे स्त्री–पुरुष हट्ट वर चढून आपल्या मनास ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती या त्रिगुणी मायेच्या भक्तीशी प्रिती होऊ देत नाहीत ते धन्य आहे,धन्य आहे व स्त्री–पुरुष जीभ निमीषमात्र ही मुखात रामनाम बोलण्यात बंद राहत नाही व ज्या स्त्री–पुरुषांचे दिवस राम राम म्हणण्यात व्यतीत होतात ते धन्य आहे,धन्य आहे.।।१।।

**गुरू द्रसण कूं जां दिन चाले ।। पाँव गुंघरीयाँ बांदा ।।**

द्रसण किया अणंद ब्हो ऊपजे ।। जाणे द्रब कोई लादा ।।२।।

माझे सतगुरु मला साहेब प्रगट करुन देतील या समजने जेंव्हा ते सतगुरुच्या दर्शनाला निघण्याचा विचार करतात त्या दिवशी त्यांच्या पायात घुंघरु बांधल्या सारखे होते.म्हणजे पाय जागेवर राहत नाही.असे उत्सुक होऊन जातात व जाऊन गुरुंचे दर्शन घेताच जसे काही दरिद्री मनुष्याला मोठे धन प्राप्त झाल्यावर आनंद होतो याही पेक्षा जास्त आनंदीत होतात.।।२।।

मिलियाँ साध हँसे रग रग रे ।। खिण फुले खिण रोवे ।।
आसा सकळ तजी कुटलाई ।। बाट साहेब की जोवे ।।३।।

सतगुरु किंवा साधू मिळाल्याने ज्या स्त्री–पुरुषांची रग रग म्हणजे नाडी नाडी आनंदित होते ते धन्य आहे,धन्य आहे.जे स्त्री–पुरुष साहेब प्राप्त करुन देणारे सतगुरु मिळण्याचा आनंदाच्या क्षणातच हंसतात तर कोणत्या क्षणात रडतात ते स्त्री–पुरुष धन्य आहे, धन्य आहे.जे स्त्री–पुरुष त्रिगुणी मायेचे म्हणजे ब्रम्हा,विष्णू,महादेव, शक्तीच्या सुखाची आशा सोडतात ते धन्य आहे,धन्य आहे व जे स्त्री–पुरुष त्रिगुणी मायेचे म्हणजे ब्रम्हा, विष्णू,महादेव,शक्ती यांच्या सुख प्राप्त करण्याच्या कुटलाया म्हणजे काळ कपट कर्म त्यागतात ते धन्य आहे,धन्य आहे.जे स्त्री–पुरुष रात्रंदिवस सतगुरु साहेबाची आपल्या घरी येण्याची वाट पाहतात ते धन्य आहे,धन्य आहे.।।३।।

तन क्षिणा मन रहे ऊन मुना ।। बोले सबदसुं प्यारा ।।
के सुखराम तके जन जुग मे ।। ऊतर गया भवपारा ।।४।।

ज्या स्त्री–पुरुषांचे शरीर मायेचे कर्मकांड करण्यात थकलेले असते आणि मन उदास राहते ते धन्य आहे,धन्य आहे.ज्या स्त्री–पुरुषांना सतगुरु,केवली साधु,संत व जगाचे स्त्री–पुरुष प्रिय वाटतात ते धन्य आहे,धन्य आहे.जे स्त्री–पुरुष सतगुरु,केवली साधु संत तसेच जगाचे स्त्री–पुरुषांशी गोड बोलतात ते धन्य आहे,धन्य आहे.असे स्त्री–पुरुष भवसागरातून पार उतरुन गेले असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।४।।

१०६
।। पदराग जोग धनाश्री ।।

धिन सोई हे धिन सोई
धिन सोई हे धिन सोई हे ।। ज्याँ सत्त संगत पाई रे ।।
नर नारी को कारण नाही ।। ज्याँहा उर एसी आई रे लो ।।टेर।।

ज्याला सत–संगती मिळाली ते धन्य आहे,धन्य आहे.ज्याच्या ह्रदयात हरी प्राप्त करण्याची चाहणा लागली आहे ते सर्व नर नारी धन्य आहे.यात स्त्री–पुरुषाचे काही कारण नाही.(स्त्री असो वा पुरुष असो) ।।टेर।।

ग्रेह में रहे साच नर बोले ।। भजन रात दिन होई रे ।।
आतम चीन संता कूं माने ।। तां सम ओर न कोई रे लो ।।१।।

गृहस्थ जीवनात राहून नेहमी सत्य बोलतात व रात्र-दिवस हरीचे भजन करतात, आत्म्यात परमात्मा जाणला अश्या संतांना मानतात त्याच्या सारखे संसारात ब्रम्हा,विष्णू, महादेव, शक्ती,अवतार इ.कोणी नाही.।।१।।

तन सो जगत मन बैरागी ।। करे सकळ रेहे न्यारो रे ।।
अंतर मांही अखंड लिव लागी ।। सोई हरि को प्यारो रे लो ।।२।।

शरीराने जगात राहता परंतु मन जगापासून उदास राहते संसार सर्व करतात.परंतु संसारापासून वेगळे राहतात व त्यांची हरीशी अखंड लीव लागली आहे असे संत हरीला प्रिय आहेत.।।२।।

नारी पुरूष से जोडे. दोनुं ।। हर की भगत संभावे रे ।।
तो सुण तिरता बार न कोई ।। जे एसी उर आवे रे लो ।।३।।

पती पत्नी जोडीने हरी भक्ती करतात असे ज्या पती-पत्नीच्या हृदयात राहते त्यांना भवसागर तरण्यास वेळ लागत नाही.।।३।।

ग्रह का त्याग कहा घर बन हे ।। फेर फार नहीं कोई रे ।।
के सुखराम साची लिव लागी ।। ताहि मुगत नर होई रे लो ।।४।।

गृहस्थी असो वा त्यागी,घरात राहो या वनात राहोत ज्याची लीव हरीशी लागली आहे. त्याची तेथे सतस्वरुप(सतस्वरुपात)मुक्ती होऊन जाते.याच्यात काही अंतर नाही.असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले.।।४।।

१०७

।। पदराग काफी ।।

धिंन धिंन सो नर जाणी ये हो ।।
ज्यांरे हो ज्यांरे आठ पोहोर लिव ध्यान ।। धिंन धिंन सो नर जाणी ये हो ।।टेर।।

ज्यांची आठो प्रहर चोवीस तास रामनामाशी लीव लागलेली असते,ध्यान लागलेले असते ते मनुष्य धन्य आहे,धन्य आहे.।। टेर ।।

नांव रटे नर बोत सपीड़ा ।। राम मिलण बोहो प्यास ।।
तन धन बिसऱ्या कामना हो ।। मोख मिलण की आस ।।१।।

रामजी मिळण्याची तहान लागलेली आहे व त्या तहानेने पिडीत होऊन रामजीचे रटण करतो आहे व रामनाम रटण्यामध्ये शरीराची शुध्द राहत नाही,धनाची सुध राहत नाही, संसाराची सर्व गरज विसरुन जातो व फक्त मोक्ष मिळण्याची आशा राहते ते धन्य आहे. ।।१।।

खिण रोवे खिण हँसत हे हो ।। युं मन लेऱ्याँ खाय ।।

साध संगत गुरूदेव बिना हो ।। पलक रहयो नही जाय ।।२।।

तो क्षणात रडतो व क्षणात हसतो याप्रकारे त्याच्या मनात हसण्याची व रडण्याची लहर येते.तो साधुच्या संगत शिवाय गुरुदेवाच्या संगत शिवाय एक क्षण ही राहू शकत नाही. तो धन्य आहे,धन्य आहे. ।।२।।

जिण जन जलम भलाई धाऱ्यो ।। लगी हे ब्रम्ह सूं डोर ।।
अेक न: केवळ ध्यान हे हो ।। चित्त रहयो निज ठोड ।।३।।

ज्या संतांची सतस्वरुप ब्रम्हशी डोर लागली अश्या संतांचे मनुष्य जन्म घेणे सफल आहे.हे संत फक्त एक नि केवळ ब्रम्ह म्हणजे ज्याच्यात मन,पाच आत्मा व रजोगुण, तमोगुण,सतोगुण अशी कोणतीही माया नाही त्याचे ध्यान करतात व त्यांचे चित्त सदैव निजधामास आहे अश्या संताचा जन्म धन्य आहे,धन्य आहे.।।३।।

जक्त चाव सब छाड़ दिया हो ।। राम कोड नित होय ।।
के सुखराम मुक्त का ग्रामी ।। ता मे फेर न कोय ।।४।।

त्यांनी संसाराचे सर्व चोचले सोडून दिले व त्यांना नेहमी रामनाम रटण्याचा उत्साह येतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,असे संत सतस्वरुप मुक्ती गावाचे वासी आहे यात काही फरक नाही.।।४।।

३१२

।। पदराग बिहगडो ।।

साधो भाई धिन जिण चोळा किया
ताग ताग सब ही हम सोध्या ।। मर्म ईसी का लिया ।।टेर।।

संत बंधु ज्याने माझे शरीर रुपी चोळा बनविला त्यांना माझे धन्यवाद आहे या शरीररुपी चोळ्याचे तार तार सर्व शोधून याचे मर्म जाणले. ।।टेर।।

बस्तर सात अेकठा किया ।। नव जागा सु कापी ।।
तागो अेक भऱ्यो सब मांही ।। अेसी गुदड़ी आपी ।।१।।

हे शरीर बनविण्यात सात वस्त्र एकत्र लागले.त्याला दोन कान,दोन डोळे,दोन नाक, एक तोंड,लिंग,गुदा अश्या नऊ जागी कापावे लागले.या शरीररुपी गोदडीत श्वासरुपी एक धागा जोडला.।।१।।

अेक साठ तीन से टूकड़ा ।। जोड़ जोड़ के कीवी ।।
नवसे तार बोहोतर फूलड़ी ।। भाँत भाँत कर दीवी ।।२।।

या शरीररुपी गोदडीला तीनशे साठ तुकडे जोडून जोडून बनविले याच्यात तऱ्हे तऱ्हेच्या नऊशे नाड्यारुपी तार व बहात्तर फुलड्या जोडल्या.।।२।।

इण कंथा को भेद न पायो ।। सो नर मुढ गिवारा ।।
के सुखराम घणी मै क्या कहूँ ।। बेग्यो काळी धारा ।।३।।

या शरीररुपी कथेचा हरी प्राप्त करण्याचा भेद जो जाणत नाही ते नर मुर्ख आहे,गवार आहे.मी अश्या मुर्खांच्या बाबतीत जास्त काय सांगू हे काळ्या धारेत वाहून गेले.(सप्त पाताळात वाहून गेले)म्हणजे अगणित दु:खात पडून गेले असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.।।३।।